CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक १६ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



हिंदू धर्मासोबत त्याची व्याप्ती वैश्विक आहे, संस्कृतीसोबत त्याची व्याप्ती राष्ट्रीय आहे आणि समाजासोबत त्याची व्याप्ती, त्या मानव समूहासोबत आहे, जो स्वतःला हिंदू म्हणवतो, हिंदू मानतो, हिंदू धर्मानुसार आचरण करतो. हिंदू हा शब्द एक असला तरी त्याची व्याप्ती वेगवेगळी आहे. हे आपण योग्य प्रकारे समजून घेतले पाहिजे.

**- कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

## महत्त्वाचे

### अरुणाचलमध्ये ट्रक दरीत कोसळून २२ मजूर ठार

**इटानगर :** अरुणाचल प्रदेशातील अंजाव जिल्ह्यात ट्रक दरीत कोसळून झालेल्या भीषण अपघातात २२ मजूर ठार झाले. हैयुलियांग-चगलागाम भारत-चीन सीमावर्ती भागात चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रक दरीत कोसळला. केवळ एका मजुराला जिवंत बाहेर काढण्यात यश आले. बुधवारी झालेल्या या अपघाताची माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने घटनास्थळी शोध व बचाव मोहीम सुरू केली.

# आनंद वार्ता : सोलापुरातील आयटी पार्कला शासनाची मंजुरी

### होटगी रोडवरच साकारणार उच्चाधिकार समितीचा 'हिरवा कंदील', सोमवारपर्यंत अधिसूचना होणार जारी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

सोलापूर शहर विकासासाठी मैलाचा दगड ठरणाऱ्या होटगी येथील नियोजित आयटी पार्कला मुंबई येथील उच्चाधिकार समितीने मंगळवार, दि.९ डिसेंबर रोजी मंजुरी दिली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ दि.१५ डिसेंबर २०२५ च्या आत याबाबत अधिसूचना जारी करणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

आयटी पार्क करण्यासाठी सुमारे ४० कोटी रुपये खर्च येणार आहे. होटगी येथील तलावाशेजारील जलसंपदा विभागाच्या ५० एकर जागेवर हा पार्क उभारला जाणार आहे. या आयटी पार्कमुळे सुमारे ४० हजार अभियंत्यांना सोलापुरात नोकरीची संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जलसंपदा विभागाच्या मालकीची होटगी येथील ५० एकर जागा ही लॉजिस्टिक पार्कसाठी देण्यात आली. तीच जागा आयटी पार्कसाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडे सुपूर्द करण्यात करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या पार्कसाठी एनटीपीसीकडून प्रति युनिट केवळ तीन रुपयापर्यंत वीजपुरवठा करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. येत्या दीड वर्षांत सदर आयटी पार्कची इमारत पूर्ण करण्याकामी कसोशीने प्रयत्न केले जाणार आहे. विमानतळावरुन उडणाऱ्या विमानसेवेच्या फनेलमध्ये प्रस्तावित आयटी पार्क इमारतीचा समावेश होत नाही. ६० मीटर उंचीपर्यंत बांधकाम करता येते. याबाबत होटगी रोडवरील विमानतळ प्रशासनाचा अभिप्राय घेण्यात आला आहे. होटगी येथील प्रस्तावित आयटी पार्क जागेच्या ५० एकरावर सुमारे ४० ते ४५ हजार जण बसून काम करतील इतकी क्षमता असणार आहे. पुण्याच्या हिंजवडीपेक्षा कमी किमतीने स्वस्तात होटगी येथे जागा उपलब्ध होणार आहे. यामुळे आता आयटी पार्कचे सोलापूरकरांचे स्वप्नही लवकरच साकार होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

**होटगी रोड विमानतळाचे विस्तारीकरणही होणार?**

होटगी रोडवरून मुंबई-सोलापूर विमानसेवेच्या शुभारंभाप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केले होते की, बोरामणी येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ होण्याबाबत माळढोकची अडचण आहे. परंतु होटगी रोड विमानतळाचे विस्तारीकरण होवून येथूनच नाईट लॅन्डिगची सुविधा शक्य आहे. यावरून हेच स्पष्ट होते की, येत्या काळात होटगी रोड विमानतळाचे विस्तारीकरण शक्य होणार आहे. मग त्यासाठी शेजारीला साखर कारखाना शहर हद्दीबाहेर पुर्नस्थापित करून शासन होटगी रोड विमानतळाचे विस्तारीकरण करू शकते. असे झाल्यास साखर कारखाना नवीन जागेत स्थलांतरीत होवू शकतो. होटगी रोडवरील विमानतळावरून दिवस-रात्र विमानसेवा सुरु होवू शकते आणि होटगी रोड ते अक्कलकोट या रोडवरील विस्तारीत जागेत आयटी कंपन्या मोठ्या प्रमाणात येवू शकतात. सोलापूरचा विकास आता गतीने शक्य आहे कारण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता सोलापूरच्या विकासात लक्ष घातले आहे. कारखान्याची अडथळा ठरणारी अनधिकृत चिमणी पाडून सोलापूरची विमानसेवा सुरु केली, सोलापुरात आयटी पार्कची घोषणा करून शासकीय मंजुरी दिली, सोलापूरला दररोज पाणीपुरवठ्यासाठी उजनी ते सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण करून आता ९०० कोटींची अंतर्गत पाणीपुरवठा वितरण व्यवस्था प्रस्ताव मंजुरीवर आहे. भैय्या चौक येथील रेल्वे पूलाचे रुंदीकरण होत आहे, ५४ मीटरचा रस्ता रहदारीसाठी सुरु होतो आहे. आसरा रेल्वे पूलाचे काम लवकरच पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे.

### विनामुल्य स्वरुपात मिळावी जागा

रेडीरेकनर दराप्रमाणे ५० एकर भुसंपादनासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून जलसंपदा विभागाला सुमारे ३ कोटी २० लाख रुपये द्यावे लागणार आहे. परंतु एमआयडीसीने विनामुल्य स्वरुपात जागा द्यावी, अशी मागणी जलसंपदा विभागाकडे केली आहे. याबाबत सकारात्मक निर्णय होण्याची शक्यता आहे, असेही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापुरात आल्यानंतर आयटी पार्कची घोषणा केली होती. आयटी पार्कसाठी तत्काळ जागा पाहणीचे आदेश जिल्हा प्रशासनाला दिले होते. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनीही त्याचगतीने आयटी पार्कसाठी सुरुवातीला हिरज, कुंभारी, जुनी मिल, होटगी येथील जागेची पाहणी केली. यात होटगी येथील जलसंपदा विभागाची जागा निश्चित करण्यात आली. तातडीने परिपूर्ण प्रस्ताव शासन दरबारी पाठविला होता. त्यास उच्चाधिकार समितीची मंजुरी मिळाली.



# इथेनॉलमिश्रित पेट्रोलने वाहनांचे नुकसान नाही







### १ लाख ४० हजार कोटींचे परकीय चलन वाचले

◆ **नवी दिल्ली, ११ डिसेंबर**

पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळल्यास वाहनाचे कोणतेही नुकसान होत नाही, असे केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज लोकसभेत स्पष्ट केले. इथेनॉलमुळे १ लाख ४० हजार कोटींच्या परकीय चलनाची बचत झाल्याचे त्यांनी सांगितले.



लोकसभेत आज प्रश्नोत्तराच्या तासात एका प्रश्नाच्या उत्तरात गडकरी म्हणाले की, पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळल्याने वाहनाचे काही नुकसान होते की नाही, याचा नुकताच अभ्यास करण्यात आला, त्यात वाहनाचे कोणतेच नुकसान होत नसल्याचे आढळून आले.

पेट्रोलमध्ये इथेनॉलच्या मिश्रणाने म्हणजे ई२० इंधनाचा शेतकऱ्यांना चांगला आर्थिक फायदा मिळत असून अन्नदाता शेतकरी ऊर्जादाता झाला, असे गडकरी यांनी सांगितले.

ई२० पेट्रोल ही स्वच्छ आणि हरित भविष्याची सुरुवात असून ईथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे प्रदूषणही कमी होत आहे, याकडे लक्ष वेधत गडकरी म्हणाले की, ईथेनॉलमुळे महागड्या इंधनाची आयातही कमी होत आहे, त्यामुळे परकीय चलनाची मोठ्या प्रमाणात बचत होत आहे. यामुळे आतापर्यंत १ लाख ४० हजार कोटींच्या परकीय चलनाची बचत झाली आहे. इथेनॉलच्या निर्मितीसाठी उस आणि मका यांची गरज भासते. इथेनॉलच्या उत्पादनामुळे शेतकऱ्यांचा ४० हजार कोटींचा फायदा झाला आहे, असे गडकरी म्हणाले.

आपले वाहन ई २० ईंधनाच्या दृष्टीने अनुकूल आहे की नाही, हे जाहीर करण्याची जबाबदारी वाहन उत्पादक कंपन्यांची आहे, असे स्पष्ट करत गडकरी म्हणाले की, अशा आशयाचे स्टिकर वाहनांवर लावण्याचे निर्देश त्यांना देण्यात आले आहे. दरम्यान, ई२० इंधनामुळे कच्च्या तेलाची आयात कमी झाली असून यामुळे परकीय चलनाचीही मोठ्या प्रमाणात बचत झाली, असे एका अन्य प्रश्नावर पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी सांगितले. ◀*(तभा वृत्तसेवा)*





# ऊस दराबाबत गव्हाणीत उड्या टाकून वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ डिसेंबर-**

उसाला प्रतिटन ३ हजार ५०० रुपये दर मिळालाच पाहिजे या मागणीसाठी वाखरी (ता. पंढरपूर) येथील पालखी तळावर गेल्या चार दिवसांपासून शेतकरी संघटनेचे पदाधिकारी आंदोलन करीत आहेत.

दरम्यान, येथील सीताराम कारखान्यावरील उसाच्या गव्हाणीत शेतकरी संघटनेच्या आंदोलकांनी उड्या घेत साखरसम्राटांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. आमदार अभिजीत पाटील यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करुन वाखरी येथे सुरु असलेल्या आंदोलनाकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. सोलापुरात सर्वात जास्त साखर कारखाने आहेत. मात्र एकाही साखर कारखान्यांनी अद्याप उसाचा दर जाहीर केलेला नाही. याउलट शेजारील सातारा जिल्ह्यातील कारखान्यांना आपल्याच जिल्ह्यातील काही भागातून उस पुरवठा होत आहे. या उसाला ३ हजार ५०० रुपयांचा दर मिळत आहे. गुरुवारी (ता.११) आंदोलनकर्ते, शेतकऱ्यांनी वाखरी येथे रास्तारोको आंदोलन केले. यावेळी सातारा व पुणेकडे जाणारी वाहतूक ठप्प झाली होती. तर इकडे दीपक भोसले, सचिन पाटील, दीपक पवार यांनी सीताराम कारखान्यावर आंदोलन केले. यावेळी पोलिस आणि शेतकरी संघटनेचे पदाधिकारी यांच्यामध्ये तू तू मैं मैं झाले होते. एक-दोन दिवसात ऊस दराची कोंडी फोडली नाहीतर सोलापूर जिल्ह्यातील एकही कारखाना सुरु ठेवला जाणार नाही, असा इशारा समाधान फाटे यांनी दिला.

# दुसऱ्या टी-२० मध्ये आफ्रिका विजयी

**चंदीगड :** भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा दुसरा टी-२० सामना ५१ धावांनी गमावला. यामुळे पाच सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी झाली.

तिसरा सामना १४ डिसेंबर रोजी धर्मशाला येथे खेळला जाईल. गुरुवारी, भारताने मुल्लांपूर येथे नाणेफेक जिंकली आणि गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु गोलंदाजांना त्याचा फायदा उठवता आला नाही. अर्शदीप आणि बुमराह यांनी खूप धावा दिल्या. दक्षिण आफ्रिकेने २१३ धावा केल्या. क्विंटन डी कॉकने ४६ चेंडूत ९० धावा केल्या. शेवटी, फरेरा (नाबाद ३०) ने डेव्हिड मिलर (नाबाद २०) सोबत अर्धशतक करत धावसंख्या २०० च्या पुढे नेली.

# इंडिगो देणार प्रवाशांना भरपाई

### १० हजार रुपयांचे ट्रॅव्हल व्हाऊचर देणार

◆ **नवी दिल्ली, ११ डिसेंबर**

३ ते ५ डिसेंबरदरम्यान गोंधळामुळे उड्डाण रद्द करावे लागलेले किंवा विलंबाचा फटका बसलेल्या प्रवाशांसाठी भरपाई म्हणून इंडिगोने १० हजार रुपयांचे ट्रॅव्हल व्हाऊचर देण्याचा निर्णय घेतला आहे. ही भरपाई डीजीसीएच्या नियमांनुसार विमान रद्द झाल्यामुळे प्रवाशांना द्याव्या लागणाऱ्या रकमेव्यतिरिक्त असेल.

३, ४ आणि ५ डिसेंबर रोजी प्रवास करणारे आमचे काही ग्राहक काही विमानतळांवर अनेक तास अडकून पडले होते आणि त्यापैकी अनेकांना गर्दीमुळे मोठा त्रास झाला, हे आम्ही खेदाने मान्य करतो, असे इंडिगोने एका निवेदनात म्हटले आहे.

गंभीरपणे प्रभावित झालेल्या ग्राहकांना १० हजार रुपयांचे ट्रॅव्हल व्हाऊचर देऊ. हे ट्रॅव्हल व्हाऊचर पुढील १२ महिन्यांत इंडिगोच्या कोणत्याही भविष्यातील प्रवासासाठी वापरता येतील, असे त्यात म्हटले आहे. ही भरपाई सध्याच्या सरकारी मार्गदर्शक तत्त्वांनुसार असलेल्या वचनबद्धतेच्या व्यतिरिक्त आहे. यानुसार ज्या ग्राहकांची विमाने उड्डाणाच्या २४ तासांच्या आत रद्द झाली, त्यांना इंडिगो विमानाचा ब्लॉक टाईम लक्षात घेऊन पाच ते दहा हजार रुपयांची भरपाई मिळेल. ◀*(वृत्तसंस्था)*






# राम मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावर होणार नाममंडप

**अयोध्या, ११ डिसेंबर**

अयोध्या येथील श्रीराम मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावर नाममंडपाची स्थापना होणार आहे. विविध भाषांमध्ये रचलेल्या रामचरितमानसची हस्तलिखिते आणि मूळ ग्रंथोचे येथे जतन करण्यात येणार आहे.

कांची कामकोटी पीठाचे जगद्गुरू शंकराचार्य स्वामी विजयेंद्र सरस्वती यांनी पुजलेले सुवर्ण श्रीराम यंत्रदेखील स्थापित केले जाईल. ते अयोध्येत आणले गेले आहे. दुसऱ्या मजल्याचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. पंचांगानुसार श्रीराम मंदिराच्या प्रतिष्ठापनेची द्वादशी या वर्षीही ३१ डिसेंबरला आहे. हा प्राणप्रतिष्ठापनेचा दुसरा वर्धापन दिन आहे. संतजनांचा आग्रह आहे, की नाममंडपाचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते व्हावे. यामुळे महासचिव चंपतराय यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना मुख्य आतिथ्य स्वीकारण्याचा आग्रह केला आहे.



# बोगस जातप्रमाणपत्र प्रकरणात दोन अधिकारी निलंबित

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**नागपूर, दि. ११ डिसेंबर-**

बुलढाणा जिल्ह्यात विमुक्त जाती (अ) प्रवर्गातील बोगस जात वैधता प्रमाणपत्र संदर्भात आधारे मिळालेल्या चौकशीत दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात येत असल्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी विधानपरिषदेत सांगितले.







आ. राजेश राठोड यांनी बुलढाणा जिल्ह्यात विमुक्त जाती (अ) प्रवर्गातील बोगस जात वैधता प्रमाणपत्रांविषयी कारवाईची लक्षवेधी सूचना मांडली. यावर उत्तर देतांना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट बोलत होते. यावेळी सदस्य सतेज पाटील आणि अड. अनिल परब यांनीही चर्चेत सहभाग घेतला. शिरसाट म्हणाले की, बुलढाणा जात पडताळणी समितीने २०११-१२ मध्ये अनेक गंभीर त्रुटी केल्या, तपासणी न करता प्रमाणपत्रे दिल्याचे स्पष्ट दिसत आहे. बोगस जात प्रमाणपत्र विषयी शासन गंभीर असून भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी काळजी घेतली जाईल. तसेच चुकीचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले.

**आमदारांवरील हल्ल्याबाबत चौकशी :** या प्रकरणात अन्याय उघड करणाऱ्या आमदार राजेश राठोड यांच्या संरक्षणासंदर्भात पोलिसांना सखोल चौकशीचे आदेश दिल्याचे त्यांनी सांगितले.

अतिरिक्त जिल्हाधिकारी २०१९ मध्ये निवृत्त झाल्याने त्यांच्यावर सेवा शिस्तभंगाची कारवाई करता येत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र, निवृत्त असले तरी प्रकरणातील त्यांची भूमिका तपासली जाईल, असे शिरसाट यांनी सांगितले.

# देवस्थानांच्या जमिनी लाटणाऱ्यांना आश्रयासाठी हे विधेयक आहे का?

## जयंत पाटील यांचा सरकारला सवाल

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ डिसेंबर-**



अनेकांनी मराठवाड्यात देवस्थानच्या जमिनी लाटण्याचे काम केले आहे. वर्ग दोनच्या वर्ग एक करून, विक्री करून, त्या विकसित करून विल्हेवाट लावली आहे. त्यांच्यासाठी हे बिल आहे अशी मला शंका आहे.

राजा किती उदार व्हावा त्याला काही मर्यादा राहिलेल्या नाहीत, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे विधिमंडळ पक्षनेते जयंत पाटील यांनी गुरुवारी विधासभेत केली. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व विधीग्राह्यीकरण) विधेयक २०२५ या शासकीय विधेयकावरील चर्चेत सहभाग घेताना ते म्हणाले की, नगरपालिका, नागरी वस्ती, मूळ गावठाण यापुरते ही विधेयक मर्यादित असेल तर मी पण पाठिंबा देतो. पण अलीकडच्या काळात ज्यांनी देवस्थानच्या जमिनी लाटलेल्या आहेत, त्यासाठी हे लागू नसावे. यासाठी अनेक लोकं कोर्टात गेलेली आहेत. त्यांना जीवे मारण्यापर्यंतचे प्रसंग झालेले आहेत. त्यामुळे यावर स्पष्टीकरण करावे, असे पाटील यांनी सांगितले.

# मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी व ज्ञानपत्र योजना लवकरच अंमलात

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ डिसेंबर-**

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान-तंत्रज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी राज्य शासनाने प्रस्तावित केलेल्या मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी योजना मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर अंमलात आणली जाईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य मुरजी पटेल यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विचारलेल्या प्रश्नाला मंत्री भुसे यांनी उत्तर देताना सांगितले. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नावीन्यपूर्ण प्रयोगांना प्रोत्साहन देण्यासाठी 'मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी' या योजनेचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. यात तालुका स्तरावरील विज्ञान प्रदर्शनांमधून निवड झालेल्या २१ विद्यार्थ्यांना नागपूर, पुणे, मुंबई येथील सायन्स सेंटरमध्ये तसेच जिल्हा स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ५१ विद्यार्थ्यांना इसरो, बेंगळुरू येथे अभ्यास भेटीस पाठविण्याचा प्रस्ताव आहे.



त्याचप्रमाणे, राज्यस्तरीय ५१ उत्कृष्ट विद्यार्थ्यांना नासा, अमेरिका येथे पाठविण्यात येणार आहे. त्याचबरोबर, विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रस्तावित मुख्यमंत्री ज्ञानपत्र योजना देखील लवकरच सुरू होणार असल्याचे मंत्री भुसे यांनी सांगितले. या शाळांत वापरलेली पुस्तके गोळा करून त्यांचे पुनर्वापर करण्याचा उद्देश योजनेमागे आहे. या उपक्रमामुळे शासनाचा २५ टक्के खर्चही वाचणार असून विद्यार्थ्यांना कमी दरात पुस्तके उपलब्ध होतील.यावेळी सदस्य अमित साटम, देवयानी फरांदे, नमिता मुंदडा, प्रवीण स्वामी, नानाभाऊ पटोले, योगेश सागर, वरुण सरदेसाई यांनीही उपप्रश्न विचारले

# जमीन तुकडेबंदीबाबतचे विधेयक विधानसभेत मंजूर

## सर्वसामान्य नागरिकांना मिळाला दिलासा

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

राज्यातील नागरी वस्त्यांमध्ये गुंठेवारी किंवा लहान भूखंडांवर राहणाऱ्या सुमारे ६० लाख कुटुंबांना, म्हणजेच सुमारे तीन कोटी नागरिकांना दिलासा देणारे 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५' विधानसभेत मंजूर करण्यात आले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे विधेयक विधानसभेत मांडले. या विधेयकामुळे आता लहान भूखंडांची खरेदी-विक्री सुलभ होणार असून, संबंधित मालकांचे नाव स्वतंत्रपणे सातबारा उताऱ्यावर लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या तांत्रिक अडचणी दूर होतील. राज्यातील नागरी भागांमध्ये गुंठेवारी किंवा लहान भूखंडांवर राहत असलेल्या लाखो कुटुंबांसाठी मंगळवारचा दिवस दिलासादायक ठरला. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या तुकडेबंदी कायद्यातील जाचक तरतुदींना शिथिल करणारे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानसभेत बहुमताने मंजूर करण्यात आले.



या निर्णयामुळे राज्यातील सुमारे ६० लाख कुटुंबे, म्हणजेच जवळपास तीन कोटी नागरिकांना थेट लाभ होणार आहे. अनेक वर्षांपासून नागरी भागात ५-१० गुंठे किंवा त्यापेक्षा कमी जागेत घरे बांधून राहणाऱ्या नागरिकांना मालकी हक्काच्या तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत होते. तसेच, जमिनीच्या अकृषिक (एनए) वापरासाठी वारंवार जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानग्या घ्याव्या लागत होत्या. या नवीन विधेयकामुळे आता विकास आराखडा किंवा प्रादेशिक आराखडा मंजूर असलेल्या क्षेत्रात वेगळ्या 'एनए' परवानगीची गरज भासणार नाही. त्याऐवजी 'एक वेळचे अधिमूल्य' भरून ही प्रक्रिया पूर्ण करता येईल, असे विधेयकात स्पष्ट करण्यात आले आहे. या विधेयकावर चर्चा करताना शिवसेनेचे (उबाठा) आमदार भास्कर जाधव यांनी, 'आमचा विधेयकाला तूर्त पाठिंबा नाही, याचा फायदा गरिबांऐवजी बिल्डर लॉबीला अधिक होण्याची शक्यता आहे', असे म्हटले. काँग्रेसचे पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी, 'शहरांचे डीपी प्लॅन तयार नसताना केवळ जागा नियमित करून चालणार नाही, तर ९ मीटरचे रस्ते आणि गटारांची सोय कशी होणार, याचाही विचार व्हावा', अशी सूचना मांडली.

आमदार नाना पटोले, सुरेश धस, प्रवीण दटके, अमित देशमुख, राहुल कूल, कृष्णा खोपडे, हिरामन खोसकर, प्रशांत सोळंखे, अभिजीत पाटील, संजय गायकवाड आणि रवी राणा यांनी बिलाबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे कौतुक करत विधेयकाला पाठिंबा दिला. चर्चेदरम्यान आमदार चंद्रदीप नरके, विक्रम पाचपुते आणि रमेश बोरनारे यांनी हा निर्णय केवळ शहरांपुरता मर्यादित न ठेवता ग्रामीण भागासाठीही लागू करावा, अशी मागणी केली.

# शिक्षक बदली धोरणात महिलांना प्राधान्य देण्यासाठी ग्रामविकास विभागासमवेत बैठक

**नागपूर, दि. ११ डिसेंबर-**

राज्यात जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांच्या बदल्यांमध्ये महिला शिक्षकांना प्राधान्य द्यावे, विशेषतः मुलींची संख्या अधिक असलेल्या शाळांमध्ये त्यांची नियुक्ती करावी, या संदर्भात ग्रामविकास विभागासोबत बैठक घेतली जाईल, असे शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत लक्षवेधीच्या उत्तरात सांगितले.

सदस्य अरुण लाड यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून या विषयी उपस्थित केलेल्या चर्चेत सदस्य चित्रा वाघ, जयंत आसगावकर, ज.मो.अभ्यंकर, विक्रम काळे यांनी सहभाग घेतला.राज्यमंत्री भोयर यांनी सांगितले, सध्याच्या बदली धोरणात महिलांसाठी वेगळे प्राधान्य नसून दुर्धर आजार, पती-पत्नी एकत्रीकरण, उमेदवारांची पसंती यांसारखे घटकच लागू आहेत. भविष्यात मुलींच्या संख्येनुसार महिला शिक्षकांना प्राधान्य देण्याचा विचार सकारात्मकपणे केला जाईल. मुलींच्या सुरक्षेसाठी पोक्सो समिती, युवा गट, तक्रार निवारण प्रणाली तसेच इतर उपाययोजना शाळांमध्ये राबवण्यात येत आहेत. ज्या शाळांमध्ये महिला समुपदेशक किंवा महिला शिक्षकांची कमतरता आहे, तिथे संबंधित विभागाशी चर्चा करून महिला समुपदेशकाची व्यवस्था करण्यावरही भर देण्यात येईल.

राज्यमंत्री भोयर यांनी सांगितले, २००८ नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शाळांना वेतनेतर अनुदान देण्याबाबत वित्त विभागाशी चर्चा केली जाईल. तसेच २००८ पूर्वीच्या शाळांना मिळणारे वेतनेतर अनुदान वेळेवर देण्यासाठीही विभागाला आवश्यक निर्देश देण्यात येतील, राज्यात समग्र शिक्षा अभियान, पीएमश्री शाळा व सीएमश्री शाळा उपक्रम द्वारे मोठ्या प्रमाणात शाळांची बांधकामे सुरू आहेत. तसेच जिल्हा नियोजन समितीद्वारेही मोठा निधी उपलब्ध करून दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

# देशातील सर्वात मोठे शिपयार्ड महाराष्ट्रात उभारावे : फडणवीस



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ डिसेंबर**

राज्याला लाभलेला ७२० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा, निर्माणाधीन वाढवण बंदर आणि सागरी क्षेत्रातील अपार संधी लक्षात घेता २०२६ मध्ये देशातील सर्वात मोठे शिपयार्ड महाराष्ट्रात उभारावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी दिले.

विधान भवन स्थित मंत्रीपरिषद सभागृहात आयोजित बंदरे विकास विभागाचा आढावा बैठकीत या सूचना दिल्या. यावेळी मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे उपस्थित होते. मुख्यमंत्रीफडणवीस म्हणाले, देशातील सर्वात मोठे शिपयार्ड करण्यासाठी विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करावा. यासाठी जागेची निश्चिती करण्यात यावी. जयगड, आंग्रे, रेडी व विजयवाडा बंदरांचा विकास करण्यासाठी वैभववाडी ते कोल्हापूर रेल्वेमार्ग तयार करावा. या मार्गासाठी राज्य शासनाच्या आर्थिक सहभागाची तरतूद करण्यात यावी. वाढवण बंदर ते नाशिकपर्यंत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ महामार्ग करीत आहे. या महामार्गाच्या दोन्ही बाजूला प्रभावित क्षेत्र लक्षात घेऊन विकासाचे नियोजन करावे. बंदर असलेल्या परिसराच्या विकासाचे महत्त्व लक्षात घेता या ठिकाणी उद्योग करण्यास गुंतवणूकदारांना आकर्षित करावे.

**कोल्हापूर ते वैभववाडी रेल्वे मार्गासाठी भूसंपादन**

या परिसरात औद्योगिक विकास करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व बंदरे विभाग यांच्या समन्वयातून कंपनी स्थापन करावी. निर्माण होत असलेले वाढवण बंदर लक्षात घेता मोठी बंदरे आणि संबंधित परिसराचा विकास करण्यासाठी विशेष नियोजन प्राधिकरण निर्माण करावे. मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पासाठी बोटी पूर्णपणे इलेक्ट्रिकवर असाव्यात. सुरुवातीला हायब्रीड मॉडेल उपयोगात आणावे, नवीन बोटिंची खरेदी करावी. कोचीपेक्षाही मोठा मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्प असला पाहिजे, या पद्धतीने प्रकल्प पूर्णत्वास न्यावा, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, परिवहन व बंदरे विभागाचे अप्पर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी आदींसह अधिकारी उपस्थित होते.



# नगर विकास, पाणी पुरवठा व गृहनिर्माण विभागाच्या पुरवणी मागण्या मान्य

**नागपूर दि. ११ डिसेंबर-**

विधानसभेत नगरविकास, पाणी पुरवठा व गृहनिर्माण विभागाच्या सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत पुरवणी मागण्या मांडल्या.

विधानसभेत नगरविकास विभागाच्या सन २०२५-२६ या वर्षाच्या एकूण ९ हजार १९५ कोटी ७६ लाख ५८ हजार रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या १९६ कोटी ५७ लाख १७ हजार रुपयांच्या मागण्याना मंजुरी देण्यात आली.गृहनिर्माण विभागाच्या ९१.९ कोटींच्या मागण्या यावेळी मंजूर करण्यात आल्या. पुरवणी मागण्याच्या चर्चेत विधानसभेतील विविध सदस्य सहभागी झाले होते.

# सोयाबीन, कापूस प्रश्नावरून सभागृहात गोंधळ

## ●शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचा आरोप करत विरोधकांचा सभात्याग
## ●यंदा १९ लाख टन सोयाबीन हमीभावाने खरेदीचे उद्दिष्ट : पणन मंत्री

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ डिसेंबर-**





नाफेडच्या माध्यमातून यंदाच्या हंगामामध्ये १९ लाख टन सोयाबीन हमीभावाने खरेदीचे उद्दिष्ट असून हमीभावाने कापसाची खरेदी करण्यासाठी सीसीआयच्या केंद्रांमध्ये वाढ करण्यात येणार असल्याची माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी गुरुवारी विधानसभेत दिली.मात्र सरकार शेतकऱ्यांची फसवणूक करीत असून मंत्री थातूरमातुर उत्तरे देऊन वेळ काढीत आहे, असा आरोप करीत विरोधकांनी आक्रमक भूमिका घेत सरकारची कोंडी केली.याबाबत अधिक चर्चा करण्यासाठी वेलमध्ये उतरून अध्यक्षासमोर घोषणाबाजी केली. ती मान्य न केल्याने सभात्याग केला.

**सरकार सोयाबीनची सरसकट खरेदी करणार का?**

सोयाबीनला हमीभाव का देत नाही,? अशी याबाबत विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली. मंत्र्यांनी समाधानकारक उत्तर न दिल्याने विरोधकांनी सरकारचा निषेध केला. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्र्यांचा बचाव करीत ते योग्य माहिती देत असल्याचे सांगितले. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या प्रश्नावर आपल्या दालनात बैठक घेण्याचे निर्देश दिले.मात्र त्यावर समाधान न झाल्याने विरोधकांनी सभात्याग केला.

नाफेड, सीसीआयची हमीभाव केंद्र सुरु करणे व शेतमालाला व कापसाला हमीभाव मिळणेबाबत आमदार संतोष दानवे यांनी प्रश्न उपस्थित केला. त्याला उत्तर देताना मंत्री रावल म्हणाले की, गेल्या वर्षी ११.२५ लाख टन सोयाबीन खरेदी केल्यानंतर यंदा १९ लाख टन खरेदीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. पूर्ण खरेदी प्रक्रिया केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार डिजिटल व बायोमेट्रिक पद्धतीने केली जाते. बारदानाच्या कमतरतेचा प्रश्न येऊ नये म्हणून नाफेड व एनसीसीएफला १२० कोटींचे आगाऊ देयक दिले असून राज्यात पुरेसा साठा उपलब्ध आहे. कापूस खरेदीबाबत मागील हंगामात १०,७१४ कोटी रुपयांची खरेदी झाल्याची नोंद आहे. यंदा १६८ खरेदी केंद्रे स्थापन करण्यात आली असून १५६ केंद्रे कार्यरत आहेत. केंद्राच्या निकषांनुसार खरेदी सुरू असून मुख्यमंत्री यांनी अलिकडेच हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी चर्चा केली, असून सध्या एफएक्यू दर्जाच्या कापसाची खरेदी ५,३२८ रुपये हमीभावाने सुरू आहे. मागील वर्षापेक्षा ५० अतिरिक्त केंद्रे यंदा उघडण्यात आली आहेत. राज्यातील अंदाजे ८० लाख मेट्रिक टन सोयाबीनपैकी सुमारे २५ टक्के सोयाबीन 'इंटरव्हेन्शन स्कीम'अंतर्गत खरेदी होणार असून बाजारभाव कोसळू नयेत हा या योजनेचा मुख्य उद्देश रावल म्हणाले. मात्र, काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार, नाना पटोले, रोहित पवार यांनी त्याला आक्षेप घेत मंत्री सभागृहाची दिशाभूल करत असल्याचे सांगितले. वडेट्टीवार यांनी शेतकऱ्यांची दयनीय अवस्था मांडून सीसीआयने कापूस खरेदीसाठी टाकलेल्या अटीमुळे कापूस खरेदी केला जात नाही. कापसावर जो आयात कर १२ टक्के होता तो आता शून्य टक्के झाला आहे. परदेशातून भारतात कापूस आल्यावर कापसाचे भाव पडणार.कापसाच्या ५० पैकीळ ४० गाड्या परत पाठवल्या जातात. शेतकरी काय करणार? दुसरीकडे सोयाबीन खरेदी केंद्रावर ५३०० रुपयाने सोयाबीनची खरेद होत नाही. मंत्री बिल्डिंग मध्ये बसतात आमच्याबरोबर शेतकऱ्यांच्या बांधावर या म्हणजे खरी परिस्थिती कळेल अशी टीका केली.

# म्हैसाळ उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत सांगोल्यातील ८ गावांना मिळणार पाणी

## आ. बाबासाहेब देशमुखांच्या प्रश्नावर सरकारचे उत्तर

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ डिसेंबर-**

सांगोला (जि.सोलापूर) तालुका दुष्काळग्रस्त असून या ठिकाणची ११ गावे म्हैसाळ उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत असूनही त्याचे काम संथगतीने सुरु आहे. त्यामुळे ग्रामस्थ,जनावराना पाणी टंचाईबरोबरच शेतजमिनीचे अतोनात नुकसान होत आहे, त्यामुळे हा तालुका दुष्काळमुक्त कधी करणार, अशी विचारणा असून सांगोल्याचे आ. बाबासाहेब देशमुख यांनी विधानसभेत गुरुवारी केली. त्यावर सरकारने या प्रकल्पतर्गत तालुक्यातील ८ गावांना पाणी पुरवठा केला जाणार असून त्यातून ४ हजार हेक्टर क्षेत्र सिचनाखाली येणार असल्याचे सरकारकडून लिखित उत्तर देण्यात आले.

तारांकित प्रश्नोत्तराच्या कालावधीत आ. देशमुख यांनी सांगोल्यात दुष्काळग्रस्त परिस्थिती विषद केली. ते म्हणाले, हा तालुका राज्यातील



कायम दुष्काळग्रस्त व पाणीटंचाईचा सामना करणारा तालुका असून येथे पर्जन्यमान कमी असल्याने शेती व पिण्याच्या पाण्यासाठी उपयुक्त स्रोतांचा नेहमीच अभाव आहे , म्हैसाळ योजनेद्वारे कोरडा नदी व त्यावरील बंधारे भरून देण्याकरीता अंदाजित ३.०० दशलक्ष् घनफूट पाण्याची आवश्यकता असून जत कालव्यातून पाणी बंदिस्त नालिकेद्वारे देण्याची तरतूद झाल्यास तेथील गावांना पिण्याचे पाणी, शेतीसाठी व पशुधनासाठी लागणाऱ्या पाण्याची कमतरता नष्ट होऊ शकते, सदर योजनेतून कोरडा नदीवरील १५ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बंदिस्त पाईपलाईनद्वारे म्हैसाळ योजनेच्या जत कालव्यावरून पाणी देण्याची तरतूद केली असली तरी मौजे डिकसळ येथील काही भाग अजूनही पाणीटंचाईने त्रस्त आहे.तसेच, नरळे, हंगेरगी व पारे येथील साठवण तलावात पाणी सोडण्यासाठी असलेल्या बंदिस्त नलिक अतिशय छोट्या असल्याने साठवण तलाव भरण्यासाठी अधिक काळ लागत असून ग्रामस्थांना व जनावरांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता होत नसल्याने सर्व गावांना पाणी पुरवठा करणाऱ्यासह कोरडा नदीवरील १५ कोल्हापूर पद्धतीचे बंध बंदिस्त पाईपलाईनद्वारे म्हैसाळ योजनेच्या जत कालव्यावरून पाणी देण्याची तरतूद करण्याचाबत तसेच नरक हंगेरगी व पारे येथील साठवण तलावात मुख्य कालव्यातून थेट बंदिस्त नलिकांद्वारे वाढीव पाईपलाईन टाकून दाब व प्रवाहामध्ये वाढ करून अधिक कार्यक्षम आणि समतोल पाणी वाट करण्याकरिता शासनाने तातडीने करावी. अशी मागणी केली.



त्याचवेळी विधानसभा अध्यक्षानी प्रश्नोत्तराची वेळ संपल्याचे जाहीर केले. त्यामुळे मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे लिखित उत्तर टेबल करण्यात आले. त्यांनी त्यात म्हटले आहे की, म्हैसाळ उपसा सिंचन योजनेची कामे टप्प्या-टप्प्याने पूर्ण करणेत येवून लाभक्षेत्र डिसेंबर, २०२३ मध्ये निर्मित झाले आहे, तालुक्यातील आगलावेवाडी को.प. बंधारे पासून वाडेगाव पर्यंत कोरड्या नाल्यातील एकूण १५ को. प. बंधाऱ्यामध्ये जत मुख्य कालव्यामधून थेट बंदिस्त नलिका वितरण करुन पाणी सोडण्याच्या प्राथमिक अहवालाची कार्यवाही करण्यात येत आहे.या योजनेद्वारे सांगोल्यातील ८ गावांतील ४००० हे. क्षेत्रास संचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे. मौजे डिकसळ येथील ६२७ हे. इतके क्षेत्र लाभक्षेत्रात समाविष्ट आहे.

कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेच्या पाचव्या सुप्रमा अहवालात सांगली व सोलापूर जिल्ह्यातील साठवण नलाव / ल.पा. तलावात अंशतः पाणी देणेसाठी १ अघफू पाण्याची तरतूद केली आहे. त्याद्वारे नरळे, हंगेरगी व बारे येथील साठवण तलावात अंशतः (१५ ते २०%) पाणी सोडण्याचे प्रस्तावित असून कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु असल्याचे सांगण्यात आले.

# पुण्यातील मलनि:सारणाच्या १२०९ कोटींच्या कामांना मान्यता

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ डिसेंबर-**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील नागरी विकास केंद्रात मलनिसा:रण योजनांच्या २७ गावांमधील १२०९.८ कोटींच्या कामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सभेत सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. कामांमुळे संबंधित गावातील ३९ लाख ४२ हजार लोकसंख्येला लाभ होणार आहे.

प्राधिकरणाने अग्निशमन सेवा शुल्कापोटी जमा झालेल्या निधीच्या विनियोगासाठी पुणे शहराचा अग्नी प्रतिबंधक उपाययोजना आराखडा तयार करावा, असे निर्देश यावेळी फडणवीस यांनी दिले. विधानभवनातील मंत्री परिषद सभागृहात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १३ वी सभा झाली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, प्राधिकरणाकडे अग्निशमन सेवा शुल्कापोटी शिल्लक ३०० कोटी रुपयांचा निधीचा उपयोग पुणे महानगरात अग्नि प्रतिबंधक आराखड्यानुसार विविध उपाययोजनांसाठी करण्यात यावा. पुणे महानगरातून जाणाऱ्या नद्यांचे पुनरुज्जीवन करून नद्यांचे प्रदूषण रोखावे. नद्यांमधून प्रदूषित पाणी जाणार नाही, याची यंत्रणांनी काळजी घ्यावी. नवले पुलावरील अपघात कमी करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ व राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डीडी या महामार्गाच्या सेवा रस्त्याचे काम सुरू करावे. यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वय ठेवून कार्यवाही करावी.

# चीन-बांगलादेश-पाकिस्तान भारताविरोधात आले एकत्र

## 'सार्क' सारखी संघटना करणार स्थापन

◆ **नवी दिल्ली, ११ डिसेंबर**

पाकिस्तानकडून होणाऱ्या अत्याचारापासून मुक्ती देत भारतीय लष्करामुळे जगाच्या नकाशावर स्वतंत्र बांगलादेश अस्तित्वात आला आहे. पण, वर्षभरापूर्वी प्रचंड हिंसाचारानंतर शेख हसिना यांचे सरकार उलथून टाकण्यात आले. सध्या मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्त्वातील हंगामी सरकारकडे कारभार आहे. या हंगामी सरकारने आता उघडपणे भारताविरोधात भूमिका घेणे सुरू केले असून चीन आणि पाकिस्तान यांच्या गटात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे.

इंडो-पॅसिफिक क्षेत्रात आपला प्रभाव वाढविण्यासाठी चीन,पाकिस्तान आणि बांगलादेश एक संघटना स्थापन करीत असल्याचे बांगलादेशच्या परराष्ट्रविषयक विभागाचे सल्लागार तौहिद हुसेन यांनी मान्य केले आहे. काही दिवसांपूर्वी पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री इसाक दार यांनी यासंदर्भात बोलताना तीन देशांचा समावेश असलेल्या ब्लॉक तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे सांगितले आहे. या ब्लॉकमध्ये बांगलादेश सहभागी होणार असल्याचे हुसेन यांनी सांगितले आहे. तथापि, नेपाळ आणि भुटान या दोन देशांना भारताला सोडून आमच्या गटात सहभागी होता येणार नाही, असेही हुसेन यांनी सांगितले. शेख हसिना यांनी भारत आणि चीनसोबत संबंध ठेवताना संतुलन राखण्याची भूमिका घेतली होती. सत्ता बदलानंतर या भूमिकेत आमुलाग्र बदल होताना दिसून येत असून बांगलादेश पूर्णपणे चीन आणि पाकिस्तानकडे झुकत असल्याचे दिसत आहे. या संघात आशियातील काही देशांना सहभागी करून घेण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. सोबतच तिन्ही देशांदरम्यान व्यापार, गुंतवणूक, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि कर्ज व्यवस्थापन या मुद्यांवरही व्यापक चर्चा झाली आहे. (वृत्तसंस्था)



### 'सार्क' झाली मृतप्राय

२०१६ मध्ये उरी येथे झालेल्या हल्ल्यानंतर भारताने आक्रमक पवित्रा घेतल्याने पाकिस्तानसोबतचे संबंध दुरावले. तेव्हापासून 'सार्क' संघटना जणू मृतप्राय झाली असून आतापर्यंत एकही बैठक झाली नाही. भारताचा प्रभाव असलेल्या या संघटनेला पर्याय म्हणून नवा संघ स्थापन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

### चीन-पाकिस्तानकडे बांगलादेशचा कल

ऑगस्ट २०२४ मध्ये बांगलादेशात उठाव झाल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान शेख हसिना वाजेद यांना भारतात आश्रय घ्यावा लागला. त्यानंतर बांगलादेशचा पाकिस्तान आणि चीनकडे कल वाढला आहे. स्वतंत्र संघटना स्थापन करण्याबाबत चीनमधील कुनमिंग शहरात तिन्ही देशांची बैठक होऊन त्यात प्राथमिक स्वरूपाची चर्चा झाली आहे. भारताला शह देण्यासाठी हा संघ तयार करण्यात येत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# थायलंडवर कंबोडियाचे हल्ले; ५ ठार

## शांतता करार पाळण्याचा ट्रम्प यांचा इशारा

◆ **बँकॉक, ११ डिसेंबर**

थायलंड आणि कंबोडियामध्ये सीमा वादावरून पुन्हा संघर्ष उफाळला असून, दोन्ही देशांच्या सीमेवर तणावाची परिस्थिती आहे. कंबोडियाच्या लष्कराने गरुवारी पहाटे थायलंडच्या सीमा भागात तोफगोळ्याचा मारा केला. यात पाच नागरिकांचा मृत्यू झाला तर १५ पेक्षा अधिक जण गंभीर जखमी झाले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जुलैमध्ये झालेल्या शांतता कराराचे पालन करण्यास सांगितले आहे.

थायलंडच्या लष्कराने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, गुरुवार पहाटेच्या सुमारास कंबोडियाच्या सुरक्षा दलाने त्यांच्या हद्दीतील गावांवर तोफगोळ्यांचा मारा आणि गोळीबार केला. यात तीन महिलांसह पाच नागरिक ठार झाले, तर १५ पेक्षा अधिक जण गंभीर आहे. कंबोडियाने आमच्या सार्वभौमत्वाचे आणि कराराच्या अटीचे उल्लंघन केले असून, त्यांना ताकदीने प्रत्युत्तर दिले जाईल. निवासी भागावर केलेले हल्ले आम्ही खपवून घेणार नाही. हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून थाई लष्कराने तोफांचा मारा केला, त्यात कंबोडियन लष्करी तळे उद्ध्वस्त करण्यात आले. तसेच त्यांच्या लष्करी वाहनांचे नुकसान झाले. यापूर्वी रविवारी झालेल्या संघर्षात दोन थाई सैनिक जखमी झाले होते, तर कंबोडियाच्या दहापेक्षा अधिक नागरिकांचा मृत्यू झाला होता. दरम्यान जुलै महिन्यात दोन्ही देशांत झालेल्या पाच दिवसांच्या रक्तरंजित लढाईनंतर ट्रम्प यांच्या मध्यस्थीने युद्धबंदी करार झाला. सध्या उफाळलेल्या संघर्षावर तीव्र आक्षेप घेत ट्रम्प यांनी दोन्ही देशांना संयम बाळगण्याचा निर्वाणीचा इशारा दिला आणि शांतता कराराचे पालन करण्याचे निर्देश दिले. (वृत्तसंस्था)



# ४५ कोटी रुपयांचे ड्रग्ज, सोने, हिरे जप्त

◆ **मुंबई, ११ डिसेंबर**

मुंबई सीमाशुल्क विभागाने येथील विमानतळावरून तस्करी होत असलेला, एकूण ४५ कोटी रुपये किमतीचे हायड्रोपोनिक ड्रग्ज, सोने आणि हिरे जप्त केले. याप्रकरणी १२ प्रवाशांना अटक केली आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. ही कारवाई ३ ते १० डिसेंबर दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर केलेल्या मोहिमांदरम्यान करण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे, सीमाशुल्क कर्मचाऱ्यांनी नऊ प्रवाशांना ताब्यात घेतले आणि त्यांच्याकडून ३७.२६ कोटी रुपये किमतीचा हायड्रोपोनिक ड्रग्ज जप्त केले, असे एका अधिकाऱ्याने बुधवारी सांगितले. काही प्रकरणांमध्ये, हे ड्रग्ज दुसऱ्या विमानाचे बॅगेज टॅग लावलेल्या ट्रॉली बॅगमध्ये लपवण्यात आले होते, तर इतर प्रकरणांमध्ये, हा अंमली पदार्थ चिंचेच्या गोळ्यांमध्ये लपवण्यात आला होता, असे त्यांनी सांगितले. बँकॉकमधून विविध विमानांनी आलेल्या या सर्व प्रवाशांना अटक करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

# पाकच्या माजी आयएसआय प्रमुखांना १४ वर्षांची शिक्षा

◆ **इस्लामाबाद, ११ डिसेंबर**

माजी पंतप्रधान इम्रान खान यांचे सहकारी आणि माजी आयएसआय महासंचालक लेफ्टनंट जनरल फैज हमीद यांना गुप्तता कायद्याचे उल्लंघन केल्याच्या आरोपात १४ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. पाकिस्तानच्या इतिहासात पहिल्यांदाच आयएसआय प्रमुखांना तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्याचा प्रकार समोर आला.





हमीद यांनी आयएसआयचे महासंचालकपदासह पेशावरचे कॉर्प्स कमांडर पदही भूषवले होते. पाकिस्तान लष्कराने गुरुवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, पाकिस्तान लष्कर कायद्याअंतर्गत ऑगस्ट २०२४ मध्ये फील्ड जनरल कोर्ट मार्शलद्वारे फैजविरुद्ध कारवाई सुरू करण्यात आली होती. हा खटला १५ महिने चालला, त्यादरम्यान फैज दोषी आढळले, त्यानंतर न्यायालयाने गुरुवारी त्यांना १४ वर्षांची शिक्षा सुनावली. राजकीय कार्यात सहभाग, गुप्तता कायद्याचे उल्लंघन, अधिकार आणि सरकारी संसाधनांचा गैरवापर आणि सरकारला आर्थिक नुकसान पोहोचविणे, असे आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले. प्रदीर्घ कायदेशीर प्रक्रियेनंतर, फैज दोषी आढळून आले आणि १४ वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आली. ही शिक्षा ११ डिसेंबर रोजी लागू झाली. खटल्यात सर्व कायदेशीर तरतुदींचे पालन करण्यात आले. (वृत्तसंस्था)

# एनआयएचे ११ माओवाद्यांवर आरोपपत्र

### ओडिशातील स्फोटकांची लूट प्रकरण

◆ **भुवनेश्वर, ११ डिसेंबर**

ओडिशाच्या सुंदरगडमधील दगडाच्या खाणीत जाणारी चार हजार किलो स्फोटकांची लूट झाल्याच्या प्रकरणात राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने ११ माओवाद्यांच्या विरोधात आरोपपत्र दाखल केले, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली.

सर्व आरोपींवर बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायदा, भारतीय न्याय संहिता, शस्त्रास्त्र आणि स्फोटके प्रतिबंधक कायद्यातील विविध तरतुदींच्या आधारे एनआयएने गुरुवारी विशेष न्यायालयात हे आरोपपत्र दाखल करण्यात आले. तपासामध्ये हे ११ माओवादी गुन्हेगारी कट रचणे, त्याची अंमलबजावणी करीत प्रत्येकी २० किलो स्फोटकांची २०० पाकिटांची लूट करण्यात सहभागी असल्याचे निष्पन्न झाले. या स्फोटकांची वाहतूक ईतमा एक्स्प्लोजिव्ह स्टेशनवरून बानको येथील दगडांच्या खाणीकडे केली जात होती. १० ते १५ सशस्त्र माओवाद्यांनी स्फोटकांचा ट्रक बळजबरीने थांबवला आणि तो शेजारचे राज्य झारखंडमधील सारंडा जंगलात नेला. या वर्षी जूनमध्ये एनआयएने स्थानिक पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास हाती घेतला. पोलिस आणि सुरक्षा दलांसह सरकारी यंत्रणेविरुद्ध दहशतवादी कृत्येकरण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्फोटकांचा साठा लुटण्यात आला होता. (वृत्तसंस्था)

# माओवादी नेता आझादवरील खटल्यांसाठी विशेष न्यायालय

◆ **भुवनेश्वर, ११ डिसेंबर**

२०११ पासून न्यायालयीन कोठडीत असलेला माओवादी नेता दुन्ना केशव राव उर्फ आझादच्या विरोधातील खटल्यांवर वेगाने सुनावणी व्हावी, यासाठी ओडिशा सरकारने विशेष न्यायालय स्थापन केले, असे गृहविभागाने गुरुवारी जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आणि उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून ओडिशा सरकार गजपती न्यायक्षेत्रातील सध्याच्या न्यायालयांव्यतिरिक्त,परालखेमुंडी येथे अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीशांचे न्यायालय स्थापन करीत आहे. हे न्यायालय संपूर्ण ओडिशा राज्यात स्थानिक अधिकारक्षेत्रासह ज्या तारखेपासून कार्यरत होईल, त्या तारखेपासून हा आदेश लागू होईल आणि डी. केशव रावच्या विरुद्ध प्रलंबित खटस्यांच्या जलद सुनावणीसाठी सदर न्यायालयाचे कामकाज करण्याचे ठिकाण परलाखेमुंडी येथे निश्चित करण्यात येत आहे, असे राज्य सरकारने अधिसूचनेत म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### रेमोच्या चित्रपटात दिसणार जितेंद्र कुमार



**मुंबई :** अभिनेता जितेंद्र कुमार आता एका नवीन भूमिकेत दिसणार आहेत. त्यांच्या आगामी रोमँटिक कॉमेडी चित्रपट 'टेढी हैं पर मेरी हैं'चा टीझर प्रदर्शित झाला आहे. यात ते गुलाब हकीमची भूमिका साकारत आहेत. रेमो डिसूझा हा चित्रपट सादर करत आहेत. ही एक मजेदार आणि सुंदर प्रेमकथा आहे. चित्रपटात जितेंद्र कुमारच्या विरुद्ध आरजे महवश दिसणार आहे. या रोमँटिक कॉमेडी चित्रपटाचे दिग्दर्शन जयेश प्रधान करत आहेत आणि प्रदीप सिंह यांनी तो लिहिला आहे. इशान शिल्पी वर्मा, विशाल त्यागी आणि अन्वर अली खान या चित्रपटाची निर्मिती करत आहेत, तर संगीत इस्माईल दरबार देणार आहेत.

### 'धुरंधर'ने सहाव्या दिवशीही केली तुफान कमाई

**मुंबई :** 'धुरंधर' चित्रपट प्रदर्शनापासूनच बॉक्स ऑफिसवर जोरदार धुमाकूळ घालत आहे. रणवीर सिंहचा चित्रपट धुरंधरने सहाव्या दिवशीही चित्रपटाने कमाई केली आहे. हा चित्रपट ५ डिसेंबर रोजी प्रदर्शित झाला होता. पण एका आठवड्यानंतरही बॉक्स ऑफिसवर यशस्वी घोडदौड सुरूच आहे. कमाईचा जबरदस्त आकडा समोर आला आहे. देशांतर्गत बॉक्स ऑफिस कलेक्शनमध्ये सहा दिवसात हा आकडा २०० कोटी पर्यंत पोहोचला आहे. धुरंधरच्या वर्ल्डवाईड कलेक्शनमध्ये चित्रपटाने पाच दिवसात ग्लोबल बॉक्स ऑफिसवर २३३.५० कोटी कमावले. आता सहाव्या दिवसाचा आकडा समोर आला असून २७४ कोटी रुपये वर्ल्डवाईड ग्रॉस कलेक्शन केले आहे. चित्रपटाने चार दिवसात विदेशात जवळपास ५८ कोटी रुपयांहून अधिक ग्रॉस बिझिनेस केला.



### आलिया भट्टला ग्लोब्स होरायझन पुरस्कार



**मुंबई :** बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्टला रेड सी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये गोल्डन ग्लोब्स होरायझन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. रेड सी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलची पाचवी आवृत्ती सौदी अरेबियातील जेद्दाह येथे आयोजित करण्यात आली. या प्रसंगी, आम्हाला आलिया भट्टला गोल्डन ग्लोब्स होरायझन पुरस्काराने सन्मानित करताना आनंद होत आहे. हा पुरस्कार आंतरराष्ट्रीय चित्रपटसृष्टीतील तिच्या असाधारण योगदानाची दखल घेत आहे. हा पुरस्कार तिच्या चांगल्या कामाची पावती असल्याचे गोल्डन ग्लोब्सच्या अध्यक्षा हेलेन होहन म्हणाल्या.

# हायड्रोजन इंधनावरील पहिल्या नौकेला हिरवा झेंडा

## वाराणसीतील नमो घाटावर उद्घाटन



◆ **वाराणसी, ११ डिसेंबर**

केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी गुरुवारी वाराणसीमध्ये भारताच्या पहिल्या स्वदेशी हायड्रोजन इंधन-सेल नौकेला हिरवा झेंडा दाखवला. यामुळे देशाच्या स्वच्छ आणि शाश्वत अंतर्गत जलवाहतुकीच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे.

नमो घाटावर आयोजित एका समारंभात बंदरे-जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्र्यांनी या नौकेच्या व्यावसायिक कार्याचे उद्घाटन केले. हायड्रोजनवर चालणारी ही नौका भारताची वाढती तांत्रिक क्षमता आणि शाश्वत ऊर्जेप्रती असलेली सरकारची बांधिलकी दर्शवते, असे सोनोवाल म्हणाले.

ही केवळ तंत्रज्ञानावर आधारित प्रगती नाही. पण, आपण हरित ऊर्जा आणि स्वदेशी उपायांच्या दिशेने आत्मविश्वासाने पुढे जात आहोत याचे हे एक प्रतीक आहे, असे सोनोवाल यांनी सांगितले. चीन, नॉर्वे, नेदरलॅण्ड्स आणि जपानसारख्या हायड्रोजनवर चालणाऱ्या नौका वापरणाऱ्या देशांच्या यादीत भारताचा समावेश झाला, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यातील तांत्रिक क्षमतांसाठी आपण सज्ज आहोत, हे यावरून सिद्ध झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे हे शक्य झाले आहे. प्रत्येक क्षेत्र ज्या गतीने आणि ज्या दृष्टिकोनाने प्रगीत करीत आहे, ज्यामुळे आता भारताच्या विकास प्रवासात अंतर्गत जलमार्गांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असे सोनोवाल म्हणाले. (वृत्तसंस्था)

# ईडी-एटीएसची पडघ्यात छापेमारी

### दहशतवाद निधी प्रकरण

◆ **मुंबई, ११ डिसेंबर**

दहशतवाद निधी प्रकरणात कारवाई करीत महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथक (एटीएस) आणि अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) ठाणे जिल्ह्यातील पडघा येथे गुरुवारी छापेमारी केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. भिवंडीतील पडघा परिसरात गुरुवारी पहाटेपासूनच ही छापेमारी सुरू करण्यात आली, असे अधिकाऱ्याने सांगितले. पडघ्यातील बोरिवली गावात यापूर्वी एटीएसने राबवलेल्या मोहिमेच्या आधारावर ही कारवाई करण्यात आली. काही संशयितांच्या घरांची झडती घेण्यात आली तसेच संशयास्पद व्यवहारांबाबत ईडीने चौकशी केली. या कारवाईत एटीएसने ईडीला सहकार्य केले, असे अधिकाऱ्याने सांगितले. या वर्षी जूनमध्ये ग्रामीण पोलिसांची मदत घेत एटीएसने बोरिवली आणि पडघा येथे २२ जणांवर छापेमारी केली होती. यात सिमीचा माजी पदाधिकारी साकिब नाचन आणि या प्रतिबंधित संघटनेचे काही इतर सदस्य तसेच समर्थकांचा समावेश होता.

त्या कारवाईत एटीएसने १९ मोबाईल आणि कट्टरवादाशी संबंधित दस्तावेज जप्त केले होते. दहशतवादाशी संबंधित कारवायांच्या मुद्यावर दोन वर्षांपूर्वी राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) छापेमारी केली होती. (वृत्तसंस्था)




अवैधरीत्या भारतात घुसखोरी केलेला एक चिनी नागरिक आढळल्याने सुरक्षा दलांनी काश्मीर खोऱ्यात तपासणी मोहीम सुरू केली आहे. श्रीनगर येथे तैनात असताना लहान मुलांशी प्रेमळ संवाद साधताना जवान

# स्वदेशी बनावटीची हायड्रोजन ट्रेन तयार

## केंद्रीय रेल मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती

◆ **नवी दिल्ली, ११ डिसेंबर**

भारतीय रेल्वेने हायड्रोजनवर चालणारी आणि स्वदेशी बनावटीची देशातील पहिली ट्रेन तयार झाली असून, ती लवकरच प्रवाशांच्या सेवेत येणार असल्याची माहिती केंद्रीय रेल मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत लेखी उत्तरात दिली.

वैष्णव यांनी सांगितले की, देशाची पहिली हायड्रोजन ट्रेन रिसर्च, डिझाईन अँड स्टँडर्ड्स ऑर्गनायझेशनच्या मानकांनुसार पूर्णतः स्वदेशी पद्धतीने तयार करण्यात आली आहे. ही ट्रेन सर्वात शक्तिशाली आणि सर्वात अधिक लांबीची असून, भारताचे अभियांत्रिकीचे सामर्थ्य दर्शवते. ट्रेन चालवण्यासाठी आवश्यक असलेल्या ग्रीन हायड्रोजनच्या उत्पादनासाठी हरियाणातील जींद येथे इलेक्ट्रोलिसिस आधारित हायड्रोजन उत्पादन प्रकल्प उभारला जात आहे. रेल्वेसाठी ही एक महत्त्वाची पायाभूत सुविधा ठरणार आहे. स्वदेशी बनावटीच्या या ट्रेनमुळे 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेलाही चालना मिळाली आहे. (वृत्तसंस्था)




### कशी असेल ट्रेन?

रेल्वेमंत्री वैष्णव यांनी सांगितल्यानुसार, ही जगातील सर्वात लांब असलेल्या हायड्रोजन ट्रेनला १० डबे असेल. ही ट्रेन ब्रॉड गेजवर चालेल आणि ट्रेनमध्ये दोन ड्रायव्हिंग पॉवर कार अर्थात् डीपीसी असून, प्रत्येकाची क्षमता १२०० किलोवॅट, तर एकूण क्षमता २४०० किलोवॅट असेल. या ट्रेनमध्ये ८ प्रवासी डबे जोडण्यात आले आहेत. या ट्रेनचे एकमेव उत्सर्जन जलवाष्प असल्याने ती पूर्णपणे शून्य कार्बन उत्सर्जन तंत्रज्ञानावर आधारित राहील. हायड्रोजन ट्रॅक्शन हे नेक्स्ट-जनरेशन फ्यूल तंत्रज्ञान असून, हा प्रकल्प भारतीय रेल्वेसाठी मोठा टप्पा ठरेल.

# रेल्वेच्या धडकेत वाघाचा मृत्यू

◆ **रायसेन, ११ डिसेंबर**

मध्य प्रदेशातील रायसेन जिल्ह्यातील रातापानी व्याघ्र प्रकल्पात, शिकारीचा पाठलाग करत असताना एक वाघ रेल्वेच्या धडकेने मरण पावला आणि इंजिनसोबत काही अंतरापर्यंत फरफटत गेला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी गुरुवारी दिली.

ही घटना मंगळवारी रात्री जिल्हा मुख्यालयापासून ९५ किलोमीटर अंतरावर असलेल्या व्याघ्र प्रकल्पाच्या ओबैदुल्लागंज रेंजमधील बुधनी आणि मिडघाट दरम्यान घडली. या परिसरात आठवडाभरात हा दुसरा वाघाचा मृत्यू आहे आणि मागील वर्षभरातील रातापानी प्रकल्पातील ही पाचवी घटना आहे. बुधनी-मिडघाट रेल्वे मार्ग वन्यजीवांसाठी धोकादायक ठरत आहे, असे वनविभागाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. विशेष गाडी क्रमांक ०१४१० ने वाघाला धडक दिल्यानंतर, तो इंजिनमध्ये अडकला आणि २५ फूट अंतरापर्यंत फरफटत गेला, असे रातापानी प्रकल्पाचे अधीक्षक मयंक राज यांच्या हवाल्याने विभागीय वन अधिकारी हेमंत रायकवार यांनी सांगितले. प्राथमिक तपासानुसार, वाघ आपल्या शिकारीचा पाठलाग करत असताना रेल्वेच्या धडकेत सापडला, असे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# हवा गेलेल्यांची 'हवा' पुन्हा काढली जाते तेव्हा...

निवडणूक सुधारणा आणि एसआयआर या विषयावर लोकसभेत झालेल्या चर्चेला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जसे आक्रमक, मुद्देसूद आणि घणाघाती उत्तर दिले, ते पाहता कुठून आपण या विषयावर चर्चेची मागणी केली, असे काँग्रेसला आता वाटत असेल. या विषयावर चर्चेची मागणी करीत काँग्रेसने 'आ बैल मुझे मार' करून घेतले, असे म्हणायला हरकत नाही. अमित शाह यांच्या बिनतोड युक्तिवादाचे सत्ताधारी स्वागत करत होते, तर विरोधी पक्षांच्या सदस्यांचे चेहरे पडले होते. बुधवारी लोकसभेत अमित शाह यांनी केलेले भाषण हे त्यांच्या संसदीय कारकीर्दीतील अनेक चांगल्या भाषणांतील एक होते. त्यामुळे त्यांच्या भाषणाचे कौतुक करण्यापासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही स्वतःला रोखता आले नाही. गेल्या काही महिन्यांपासून काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी मतदार यादीच्या पुनरीक्षणाच्या (एसआयआर) मुद्यावरून आकाशपाताळ एक करीत आहेत. मतचोरीचा आरोप करीत निवडणूक आयोग आणि भाजपाला घेरण्याचा प्रयत्न करीत आहेत. बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीच्या आधी एसआयआर म्हणजे मतदार यादीचे पुनरीक्षण करण्यात आले आणि मतदारयादीत अवैधरीत्या घुसखोरी केलेल्यांची नावे मतदारयादीतून वगळण्यात आली. मुस्लिम तुष्टीकरणाची आणि घराणेशाहीतून वारसा हक्काची परंपरा लाभलेल्या राहुल गांधींनी या मुद्यावरून निवडणूक आयोगाला आणि पर्यायाने मोदी सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला. पण बिहारच्या सुजाण आणि प्रगल्भ मतदारांनी भाजपाच्या नेतृत्वातील रालोआला दोन तृतीयांश बहुमत देत हा प्रयत्न हाणून पाडला. तरीही राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाचे डोळे उघडत नाहीत, याचे आश्चर्य वाटते.

आता पश्चिम बंगालमध्येही याच मुद्यावरून काँग्रेस नव्हे, तर ममतादीदींची तृणमूल काँग्रेस रान उठवत आहे. एसआयआरविरोधी प्रचार करण्यात राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाने जेवढी मेहनत घेतली, त्याच्या एकदशांश मेहनत पक्ष मजबूत करण्यात घेतली असती तर एसआयआरवरून आकांडतांडव करण्याची वेळ त्यांच्यावर आली नसती. पक्षाची दुर्दशा झाली नसती. पण, विवेकाचा स्वर ऐकतील ते राहुल गांधी कसले! ते बोललेच. नको तेच बोलण्यात ते पटाईत आहेत. अमित शाह यांनी लोकसभेत निवडणूक सुधारणा आणि एसआयआर या मुद्यावर झालेल्या चर्चेत विरोधी पक्षांनी केलेले सर्व आरोप खोडून काढले. विशेषतः राहुल गांधी यांचे दात त्यांनी त्यांच्याच घशात घातले. भाजपाला निवडणूक सुधारणा या विषयावर चर्चा अपेक्षित होती, तर काँग्रेसने ही चर्चा फक्त एसआयआरवर केंद्रित करण्याचा प्रयत्न केला. मुळात एसआयआरची प्रक्रिया देशात यावेळी पहिल्यांदाच राबविण्यात आली, असे नाही. यापूर्वी अनेक वेळा ती राबविण्यात आली आहे. काँग्रेसच्या शासनकाळातही एसआयआर अभियान राबविण्यात आले. यावेळी काँग्रेसने त्यावर आक्षेप घेण्याचे कारण नव्हते. एसआयआरला काँग्रेस करीत असलेला विरोध हा मुस्लिम तुष्टीकरणातून आहे, असे अमित शाह यांनी आपल्या भाषणात पुराव्यानिशी सिद्ध केले. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे राहुल गांधींच्या मतचोरीच्या आरोपातील हवा त्यांनी एकापाठोपाठ तीन बॉम्ब टाकत काढून टाकली. देशातील सर्वांत पहिली मतचोरी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केली, दुसरी इंदिरा गांधींनी तर तिसरी सोनिया गांधी यांनी, हा अमित शाह याचा आरोप राहुल गांधी यांच्या मतचोरीच्या आरोपावरचा 'नहले पे दहला' होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचा पहिला पंतप्रधान कोण होणार, याचा निर्णय प्रदेश काँग्रेस अध्यक्षांच्या मतदानातून घेतला जाणार होता. पंतप्रधानपदासाठी सरदार वल्लभभाई पटेल यांना २८ प्रदेश काँग्रेस अध्यक्षांची पसंती होती, तर नेहरू यांना फक्त दोन प्रदेश काँग्रेस अध्यक्षांची. म्हणजे बहुमत पटेलांच्या बाजूला होते. मात्र, मतचोरी करीत म्हणजे बहुमताचा निर्णय डावलून नेहरू देशाचे पहिले पंतप्रधान झाले, असे म्हणण्यापेक्षा त्यांनी पंतप्रधानपद बळकावले, असे म्हणणे जास्त योग्य राहील. दुसरी मतचोरी इंदिरा गांधी यांनी केली. अलाहाबाद उच्च न्यायालयाने त्यांची निवडणूक बेकायदेशीर ठरवली असता, इंदिरा गांधी यांनी घटनादुरुस्ती करत न्यायालयाचा निर्णय रद्द ठरवला. तिसरी धक्कादायक मतचोरी सोनिया गांधी यांची होती. देशाचे नागरिकत्व स्वीकारण्याआधी सोनिया गांधी मतदार झाल्या होत्या आणि मतदार यादीत त्यांचे नाव होते, हा अमित शाह यांनी टाकलेला तिसरा बॉम्ब काँग्रेसच्या सदस्यांना दिल्लीच्या कडाक्याच्या थंडीत घाम फोडणारा होता. मतचोरीसाठी नेहरू-गांधी घराण्यातील तीन सर्वोच्च नेत्यांना जबाबदार धरत शाह यांनी राहुल गांधी यांचे अवसान एकदम जमिनीवर आणले. आपल्या घराण्यातील तीन नेत्यांनी पणजोबा, आजी आणि आईने मतचोरी केली, हे काँग्रेसच्या अन्य ज्येष्ठ नेत्यांनी राहुल गांधींच्या कानावर आधीच घातले असते, तर मतचोरीचा आरोपच त्यांनी केला नसता. राहुल गांधी पत्रपरिषद घेऊन बॉम्ब, अणुबॉम्ब आणि हायड्रोजन बॉम्ब टाकण्याच्या गोष्टी करीत होते. पण एकाच वेळी तीन हायड्रोजन बॉम्ब अमित शाह टाकू शकतात, याचा त्यांना किंवा त्यांच्या पक्षातील नेत्यांना अंदाजच नव्हता. अमित शाह यांच्या आरोपांनी काँग्रेसवाल्यांनाच नव्हे, तर अन्य विरोधकांनाही पळता भुई थोडी झाली. त्यामुळे त्यांनी सभात्याग केला, असे म्हणण्यापेक्षा सभागृहातून पळ काढला, असे म्हणणे योग्य होईल.

निवडणूक सुधारणांवर भाषण करताना अनेक विरोधी नेत्यांनी ईव्हीएमला विरोध करताना पुन्हा मतपत्रिकेद्वारे मतदानाची मागणी केली. ही मागणी म्हणजे घड्याळाचे काटे उलटे फिरवण्याचा प्रयत्न होय. कधीतरी विरोधकांनी आपल्या पराभवासाठी ईव्हीएमवर ठपका ठेवण्याऐवजी आत्मपरीक्षण केले पाहिजे. विरोधकांची जनतेशी असलेली नाळ तुटली आहे. त्यामुळे जनता त्यांना सतत नाकारत आहे. पण विरोधक आपल्या वर्तनात सुधारणा करण्याऐवजी पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडत आहेत. सर्व विषयांत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याने अभ्यास करण्याऐवजी शिक्षक बदलण्याची मागणी आणि मतपत्रिकांवर निवडणूक घेण्याची मागणी हे समान पातळीवरील बौद्धिक दिवाळखोरीचे लक्षण आहे.

पूर्वी वयाच्या २१ व्या वर्षी मतदानाचा अधिकार मिळायचा. तो कमी करीत १८ वर आणला गेला. आता निवडणूक लढविण्यासाठी असलेली २५ वर्षांची मर्यादा २१ वर्षे करण्याची गरज आहे. सरकारने यादृष्टीने विचार केला पाहिजे. लोकप्रतिनिधीला परत बोलविण्याचा अधिकारही मतदारांना मिळाला पाहिजे. मात्र, तशी मागणी संसदेत कोणत्याच राजकीय पक्षाने केली नाही. सर्व जण एसआयआरचे तुणतुणे वाजवत राहिले. एसआयआर ही काळाची गरज आहे. एसआयआर म्हणजे मतदारयादीचे आणि पर्यायाने निवडणूक प्रणालीचे शुद्धीकरण आहे. मतदारयादीतील घुसखोरी हुडकून काढण्यासाठी एसआयआरची प्रक्रिया राबविली जात आहे. या प्रक्रियेत कोणत्याही भारतीय नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळले जाणार नाही, याची दक्षता घेताना मतदार यादीत कोणताही घुसखोर आणि परकीय नागरिक राहणार नाही, हे पाहण्याची जबाबदारी सरकार, निवडणूक आयोगाएवढीच राजकीय पक्षांची आहे. या देशाचा पंतप्रधान आणि मुख्यमंत्री कोण होणार, हे बाहेरचे लोक म्हणजे घुसखोर नव्हे तर या देशातील नागरिकांना ठरविता आले पाहिजे. एसआयआर आम्हा सर्वांना तोच अधिकार पूर्णपणे शुद्ध स्वरूपात देणार आहे. त्यामुळे ज्या राजकीय नेत्यांच्या आणि राजकीय पक्षांच्या निष्ठा या देशाच्या मातीशी नाहीत, या देशातील जनतेला जे आपले समजत नाहीत, तेच एसआयआरला विरोध करीत आहेत, असा अर्थ काढला गेला तर वावगे होणार नाही. राहुल गांधींनी एसआयआरला विरोध करण्याचा ढोंगीपणा सोडला पाहिजे. या प्रक्रियेत राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने काही बदल हवे असतील तर तशी मागणी ते करू शकतात. सरसकट या प्रक्रियेला विरोध करणे राष्ट्रहिताचे नाही. जनता प्रत्येक निवडणुकीत आपल्याला का नाकारते, याचे भान आता तरी त्यांना आले पाहिजे. जनतेच्या कौलरूपी विवेकाने त्यांच्या पक्षाचे पानदान कधीचेच वाजविले आहे. आता संधी मिळाली आहे तर सभागृहात तरी नीट वागावे, बोलावे म्हणजे लोकशाहीसोबत त्यांचे आणि काँग्रेस पक्षाचेही भले होईल. अन्यथा, आपली हवा कधीचीच गेली असली तरी ती पुनःपुन्हा कुणीतरी काढून घ्यावी, यासाठीच्या आट्यापिट्याची कीवच येत राहील.

## प्रासंगिक

विजय पांढरीपांडे

# शिक्षण क्षेत्रात नेमका बदल हवा

महाराष्टात काही भागात बोली भाषेत 'या ठिकाणी, त्या ठिकाणी' अशा निरर्थक शब्दाचा वापर काही लोक बोलताना करतात. हा खरे तर सवयीचा भाग असतो. वारंवार येणाऱ्या अशा शब्दांना तसा काही अर्थ नसतो. उलट ते ऐकताना विचित्र वाटते. हास्यास्पद वाटते. आता याच धर्तीवर ठिकाण म्हणजे स्पेस वापरण्याऐवजी टाईम म्हणजे वेळ ही संज्ञा वापरून काही लिहावे, असा विचार मनात आला. या दोन टाईम झोनमध्ये शिक्षण क्षेत्रात नेमका काय बदल झाला, यावर विचार करणे मनोरंजक ठरेल. त्यावेळी-यावेळी अशी शिक्षण क्षेत्रासंबंधी तुलना करताना त्यावेळी म्हणजे १९६० चे दशक अन् यावेळी म्हणजे २०२०-२०२५ हे चालू दशक असे परिमाण घेतले आहे. कारण या काळातून माझा स्वतःचा शिक्षण क्षेत्रातला प्रवास झालाय. त्यावेळी म्हणजे ६० च्या दशकात शाळेत महिला शिक्षिका फारशा नव्हत्या. महाविद्यालयातही महिला प्राध्यापकांची संख्या त्या मानाने तुरळक होती. सायन्स कॉलेजला आमच्या वर्गात एकही मुलगी नव्हती तर इंजिनीअरिंग कॉलेज वर्गात फक्त एकमेव मुलगी होती. सांगितले तर आश्चर्य वाटेल, पण आयआयटीमध्ये देखील एम.टेक.ला एखाददुसरी मुलगी. मी पुढे १० वर्षे आयआयटीत शिकवले. त्या काळात ५० संख्या असलेल्या वर्गात दोन-तीन मुली असायच्या. आयआयटीत महिला प्राध्यापिका नव्हत्या शिकवायला.. असल्याच तर पाच-दहा टक्के पूर्ण कॉलेजात!

शिक्षक-विद्यार्थी यांचे त्या काळात जवळचे, जिव्हाळ्याचे नाते होते. भावनिक संबंध होते. शिक्षक मन लावून शिकवत त्यावेळी. आता सारखा पाट्या टाकण्याचा, शिक्षणाला ओझे समजण्याचा प्रकार नव्हता. त्यावेळी हुशार (मेरिट) विद्यार्थ्यांच्या यादीत मुलेच जास्त असायची. आता यावेळी चित्र एकदम उलटे झाले आहे. शाळेत, कॉलेजात मुलीची संख्या कितीतरी प्रमाणात वाढली आहे. इंजिनीयरिंगमध्ये पूर्वी आठ-दहा मुली असायच्या ५० च्या वर्गात. आता मुलीची संख्या ६० टक्के झाली. शिकविणाऱ्या महिला प्राध्यापकाची संख्या दुपटी-तिपटीने वाढली आहे. त्यावेळी विभाग प्रमुख, प्राचार्य महिला हे दृश्य क्वचितच दिसायचे. आता याही पदावर महिला जबाबदारी समर्थपणे पार पाडताना दिसतात. मेरिटमध्ये, सुवर्ण पदकाच्या यादीत मुलीच आजकाल जास्त असतात. आमच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागात तर ८० टक्के सुवर्ण पदक मिळविणाऱ्या विद्यार्थिनीच.. महिला विभाग प्रमुख, प्राचार्य, कुलगुरू यांची संख्या बरीच वाढली आहे. उच्च शिक्षण क्षेत्रात कोणत्याही विभागात मुली हिरीरीने मुलांशी समर्थपणे स्पर्धा करताना, जिंकताना दिसतात. पण त्यावेळसारखे लळा-जिव्हाळ्याचे भावनिक नाते आता राहिलेले नाही. विद्यार्थी-शिक्षक नात्यात कृत्रिमता आली आहे. कामापुरता मामा असा स्वार्थी व्यवहार उरला आहे. विद्यार्थी वर्गात बेशिस्तपणा प्रमाणाबाहेर वाढला आहे. शिक्षक, प्राध्यापक, पालक कुणाचीच भीती राहिली नाही. नियम, कायदे याविषयी वचक राहिला नाही. सगळीकडे शिथिलता आलेली दिसते. 'चलता है' ही बेफिकीर वृत्ती दिसते. या सगळ्याचा परिणाम म्हणजे त्यावेळच्या तुलनेत शालेय म्हणा, महाविद्यालयीन उच्च शिक्षण म्हणा, सगळीकडे गुणवत्तेचा दर्जा यावेळी पार ढासळला आहे. सर्वच क्षेत्रात तांत्रिक प्रगती भरपूर प्रमाणात झाली. शाळा-कॉलेजेसची, विद्यापीठांची संख्या तर भूमिती श्रेणीने वाढली गेल्या काही दशकात.



अभ्यासक्रम बदलले, नवे कोर्सेस, नवे विषय, नवी माध्यमे, नव्या पद्धती, नवी आव्हाने असे सगळेच नावीन्याने भारलेले, सजलेले. पण आतून पोकळ असलेले. वरून कीर्तन आतून तमाशा असा काहीसा प्रकार. पूर्वीच्या परीक्षा, पूर्वीचे गुणदान सगळेच विश्वसनीय होते. कडक धोरण राबविले जायचे त्यावेळी. आता पदवी दान केली जाते. मार्क्स उधळले जातात. परीक्षेचा दर्जादेखील सुमार असतो. पदवी, पदव्युत्तरपासून तर पीएचडीपर्यंत असाच दुधात पाणी टाकण्याचा प्रकार, गुण उधळून खुश करण्याचा प्रकार. गुणपत्रिकेत तथ्य ना पदवीला अर्थ.. सगळा देखावा. मोठमोठ्या संस्था, देखण्या इमारती, विस्तीर्ण परिसर, लाखो रुपयांचे शुल्क अन् शेवटी हातात पदवीचा चिटोरा! ज्याचे नोकरीच्या क्षेत्रातले बाजार मूल्य शून्य! त्यावेळी नोकरीची सोय करणे ही विद्यापीठाची जबाबदारी नव्हती. प्लेसमेंट सेल वगैरे प्रकार नव्हता. आता रोजगाराभिमुख शिक्षण, स्कील डेव्हलपमेंट, काळाची, भविष्याची गरज अशा परिमाणावर कॉलेजचे, विद्यापीठाचे मानांकन ठरते. नाटकी संशोधन, रिसर्च पब्लिकेशन यावर शिक्षकाचे मोल ठरते. आता तर कॉलेजेस, विद्यापीठांचीदेखील परीक्षा होते, त्यांनाही गुण दान केले जाते. तिथेही कॉपी, फसवणूक होते! खोटेनाटे सर्टिफिकेट मिळते. त्यावेळी प्रमाणपत्र नसूनही दर्जा होता. तांत्रिक तयार केलेले अहवाल नसले, तरी एंड रिझल्ट उत्तम होता. आता सगळेच गणित उलटे झाले आहे. भपका, नाटक पण वाढले. पैशाचा खेळ झालाय आता शिक्षण म्हणजे! ठवेळी हे असे असले तरी पुढे काय होईल देवच जाणे! कारण आतापर्यंत माणूस आपली बुद्धिमत्ता वापरत होता. आता आपली बुद्धी गहाण ठेवून संगणकाची कृत्रिम बुद्धिमत्ता वापरत आहेत. तेव्हा उद्याचे जग, उद्याचे शिक्षण कसे असेल याचा विचार न केलेलाच बरा. जे जे होईल ते ते पाहावे हे धोरण उत्तम!

७६५९०८४५५५

## वेध

रेवती जोशी-अंधारे

# शहाणी जीवनशैली... हारा हाचि बू!

यंदा देशाने आपला ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा केला. त्या दिवशी लाल किल्ल्यावरून देशबांधवांना संबोधित करताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीयांनी आहारात तेलाचे प्रमाण कमी करण्याचे आवाहन केले होते. भारतीय कुटुंबांनी स्वयंपाकातील तेलाचा वापर किमान १० टक्क्यांनी कमी करायला हवा; जेणेकरून वाढता लठ्ठपणा आणि त्यातून येणारे मधुमेह किंवा उच्च रक्तदाबासारखे विकार टाळता येतील. वर्ष २०१९ मध्ये पंतप्रधान मोदी यांनीच फिट इंडिया चळवळीची सुरुवात केली होती. हे सगळे विषय आज पुन्हा चर्चेला येण्याचे कारण 'हारा हाचि बू'ची वाढती लोकप्रियता हे ठरले आहे.

आपल्या देशात मध्येच केव्हातरी लोकांमध्ये डायटचे फॅड येते. किटो डायट, ऋतुजा दिवेकरांचे डायट, योगगुरू रामदेव बाबांचे डायट, मेडीटेरेनियन डायट, डॅश डायट, लो कार्ब डयट, ॲटकिन्स डायट... अजून बरेच! पण, पारंपरिक भारतीय आहारशास्त्राच्या सर्वाधिक जवळचा डायट प्लान म्हणजे हारा हाचि बू! जपानी मूळ असलेला हा डायट प्लान आपल्या लोकांना प्रचंड आवडतो आहे. याचे खरे कारण म्हणजे त्याच्या अंमलबजावणीतील सोपेपणा! तांदूळ-डाळी बंद, भाज्या बंद, कर्बोदके बंद-प्रथिने सुरू, अमुक अंतराने जेवण, तमुक धान्याचा नाश्ता, दिवसभर १० लिटर पाणी अशा भन्नाट कल्पना ऐकून आणि वाचून, 'आज कुछ तूफानी करते हैं' म्हणत नवीन पिढी असे डायट प्लॅन डोळे झाकून 'फॉलो' करते.

मग, 'हारा हाचि बू' वेगळा कसा? तर, निवडक पदार्थ न खाता जे खाताय ते खा पण, पोट ८० टक्केच भरू द्या. 'हारा हाचि बू' या जपानी शब्दांचा अर्थच असा आहे की, घशापर्यंत खाऊ नका. अन्नावर पचनक्रिया होण्यासाठी, त्यातील वायू निघण्यासाठी, पाण्यासाठी पोटाचा २० टक्के भाग रिकामा ठेवावा. रोजचे जेवण वरण-भात, भाजी-पोळी, कढी-कोशिंबीर, लोणचं-चटणी हे सगळे खा पण, पोट ८० टक्के भरताच थांबा! प्राचीन चीनमध्ये कन्फुशियस या विचारवंताने 'हारा हाचि बू'ची संकल्पना सर्वप्रथम मांडली. त्याचे फायदे लक्षात घेऊन लोकांनी हीच आहार पद्धती अवलंबिली. जपानच्या ओकिनावा प्रांतातील लोक दीर्घायुषी होतात. ओकिनावाला जगाचा 'ब्ल्यू झोन' म्हटले जाते. या निरामय दीर्घायुष्यामागच्या कारणांपैकी एक महत्त्वाचे म्हणजे 'हारा हाचि बू'! या भागातील लोक इतरांपेक्षा सरासरी २० ते २५ टक्के कमी कॅलरीज खातात आणि दैनंदिन जीवनात अगदी बालपणापासून मरेपर्यंत 'हारा हाचि बू' डायटनुसारच आहार घेतात. ओकिनावा सेंटेनरियन स्टडी या सलग ४० वर्षे चाललेल्या अभ्यासातून कॅलरी कमी करण्यासाठी 'हारा हाचि बू' ही सर्वाधिक सोपी आणि नैसर्गिक पद्धत असल्याचे स्पष्ट झाले आहे. रोजचा आहार घेण्याची ही पद्धत म्हणजे वैद्यकीय भाषेत 'कॅलरिक रिस्ट्रिक्शन' होय. मुळात आहारच कमी केल्यास साहजिकच कॅलरीज कमी, पेशींवरचा ऑक्सिडेटिव्ह ताण कमी, मधुमेह-हृदयरोग, अल्झायमर आणि स्ट्रोकचा धोका कमी परिणामी, वृद्धत्वाची गती कमी होते. हे निष्कर्ष जगभरातील संशोधकांनी वेगवेगळ्या काळात आपापल्या संशोधनातून नोंदविले. अन्न हळूहळू आणि चावून खाल्ल्यास, घ्रेलिन नावाचा हार्मोन मंदावतो आणि पोट भरल्याची भावना निर्माण होते. पोट भरल्यानंतर लेप्टिन हार्मोन कार्यान्वित होऊन, मेंदूला 'आता पुरे' असा संदेश देतो. 'हारा हाचि बू' अंमलात आणणे इतर डायटच्या तुलनेने सोपे वाटते. ताटात वाढून घेतानाच कमी घ्या, प्रत्येक घास २० ते ३० वेळा चावावा, जेवणाची प्रक्रिया किमान २० मिनिटे चालते, 'माईंडलेस इटींग' म्हणजे टीव्ही-मोबाईल बघत जेवण करणे टाळून 'माईंडफुल इटींग' करा, जेवण सुरू करण्यापूर्वी पाणी किंवा सूप प्या आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'आता पुरे' हा क्षण ओळखून, ढेकर येईपर्यंत खाऊ नका, असे 'हारा हाचि बू'चे सूत्र आहे. बाकी तांत्रिक बाबी सोडल्या तर, 'हारा हाचि बू' रोजच्या जीवनात करणे सहजशक्य आहे. 'सर सलामत तो पगडी पचास' हे सूत्र लक्षात ठेवून, हा नवा ट्रेंड भारतीयांनी अंमलात आणायला हवा. फक्त आपला 'हारा हाचि बू' कुठे म्हणजेच आपल्याला 'कुठे थांबायचंय' एवढे प्रत्येकाच्या लक्षात येणे महत्त्वाचे!

९८५०३३९२४०

## दखल

मोरेश्वर बडगे

# तेव्हा कुठे जाते मराठी अस्मिता?



१० वर्षांपूर्वीचे दिवस आठवा. विधानसभा अधिवेशनासाठी मायबाप सरकार नागपुरात येई तेव्हा त्याचे स्वागत कसे होत असे? कडकडीत 'विदर्भ बंद'चे आवाहन केले जात असे. वेगळ्या विदर्भ राज्याच्या मागणीसाठी विदर्भवाद्यांचा लाखालाखांचा मोर्चा विधानसभेवर येत असे. पोलिसांना लाठीमार करावा लागे. प्रसंगी अश्रुधूरही. विदर्भाचा बॅकलॉग कसा वाढतोय हे विरोधी नेते हिरीरीने सांगत. जांबुवंतराव धोटे मैदानात असेपर्यंत विदर्भ राज्यासाठीचे आंदोलन जोरात होते. नंतरचे नेते हा दबाव टिकवू शकले नाहीत. विदर्भवादी संपले अशातला भाग नाही. विदर्भाचा संपूर्ण विकास झाला अशीही परिस्थिती नाही. तरीही विदर्भ राज्याचा आवाज कुठेतरी क्षीण झाला आहे. याला कारण आहे. वेगळे राज्य घेऊन जे मिळायचे ते महाराष्ट्रात राहून मिळत असेल तर फुटून निघण्याची भाषा का करायची? असा व्यवहारी विचार विदर्भाची जनता करू लागली आहे.

लोकांना विकास हवा आहे. भाजपा आणि महायुतीचे सरकार तो देत आहे. वेगळ्या राज्याची मागणी देशभर आहे. आज ना उद्या केंद्र सरकारला झुकावे लागेल. काही नवी राज्ये द्यावी लागतील. तेव्हा विदर्भ राज्य मिळाले तर विदर्भाच्या जनतेला आनंदच होईल. पण आज त्यासाठी रस्त्यावर यायची जनतेची मानसिकता नाही. नागपूर अधिवेशनानिमित्ताने सरकार नागपुरात मुक्कामाने असताना हेच चित्र पाहायला मिळते. २०१४ पूर्वीचा विदर्भ आठवा आणि आताच विदर्भ पहा. खूप काही बदलले आहे. पूर्वी नागपुरात काही घडत नसे. अधिवेशनापुरतं नागपूर जागत असे. अधिवेशन संपलं की ११ महिने नागपूर झोपून जात असे. आज नागपूर २४ तास जागं असताना दिसते आहे. मोठमोठ्या संस्था इथे आल्या आहेत. पुण्याच्या आधी नागपुरात मेट्रो रेल्वे आली. लहान-मोठे उद्योग आले. नागपूर झपाट्याने बदलतं आहे. सर्वाधिक विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे. मुंबईत नवे विमानतळ आले, कोस्टल रोड झाला, मेट्रो ३ धावू लागली. केंद्रात भाजपाचे सरकार आहे. त्याचा फायदा महाराष्ट्रातल्या महायुती सरकारला होत आहे. विकासाचे प्रकल्प फटाफट मोकळे केले जात आहेत. राजकारण हा पार्टटाईम जॉब नाही, हे फडणवीसांनी छान ओळखलं आहे. त्यांची १८-१८ तासांची मेहनत आणि कामाचा झपाटा चकित करणारा आहे. त्यामुळेच तर आजच्या कुरघोडीच्या राजकारणात फडणवीस रिझल्ट देऊ शकले. बदलांची दिशा ओळखून फडणवीस निर्णय करीत आहेत. येत्या १० वर्षांत महाराष्ट्र देशातले मोठे आर्थिक केंद्र झालेला दिसेल.

देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राला पडलेलं सुंदर स्वप्न आहे, असे मी नेहमी म्हणतो. व्हिजनरी नेता मिळाला तर तो काय चमत्कार करू शकतो ते आपण फडणवीस यांच्या रूपात पाहतो आहे. त्यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली त्या गोष्टीला आता वर्ष झालं. २०१५ मध्ये 'अधिकारी ऐकत नाहीत' म्हणणारे फडणवीस आज 'ऐकावंच लागेल' असे म्हणतात. हा मोठा बदल आहे. आल्या आल्या १०० दिवसांचा कार्यक्रम देऊन फडणवीसांनी अधिकारी आणि मंत्र्यांना कामाला लावले. वर्षानुवर्षे कुण्या मंत्र्याचे पीए किंवा कुठल्या खात्यात ठाण मांडून बसलेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या खात्यात परत पाठवताना त्यांच्यातल्या कणखर मुख्यमंत्र्यांचे दर्शन झाले. आजवर कुण्याही मुख्यमंत्र्याने वाटली नसेल एवढी वैद्यकीय मदत त्यांनी गरजू रुग्णांना वाटली. मागेल त्याला सौर पंप या त्यांच्या योजनेची गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड्‌सला दखल घ्यावीशी वाटली. शांत, संयमी, मितभाषी, कठीण परिस्थितीत न डगमगणारा, डोक्याचा वापर करणारा हा मुख्यमंत्री आज महाराष्ट्राचा ब्रँड झाला आहे. ते सहसा कोणाच्या वाटेल जात नाहीत. पण अंगावर आलेल्याचा करेक्ट कार्यक्रम केल्याशिवाय सोडत नाहीत. महाराष्ट्राचे राजकारण कित्येक वर्षे शरद पवार यांच्याभोवती फिरत होते. फडणवीसांनी हे चक्र उलटे केले. राजकारणात फडणवीस यांनी केलेल्या तोडफोडीमुळे तर त्यांना 'चाणक्य' म्हटले जाते. फडणवीस समोरच्याचा विश्वास कमावतात. पण विश्वासघात करणाऱ्याला सोडत नाहीत. २०१९ ची विधानसभा निवडणूक भाजपा आणि शिवसेना यांनी युती करून लढवली. जनतेने या युतीला बहुमताचा कौल दिला. मात्र, निकालानंतर उद्धव ठाकरे यांची नियत फिरली. मुख्यमंत्री होण्याच्या स्वार्थापायी त्यांनी भाजपाला दगा दिला. शरद पवारांच्या मांडीवर जाऊन बसले. अवघ्या अडीच वर्षांतच फडणवीसांनी याचा बदला घेतला. ठाकरेंची शिवसेनाच फोडली. नंतर अजित पवारांना कामाला लावले, शरद पवारांची माणसं फुटत नाहीत असा सर्वसाधारण समज होता. फडणवीसांनी अजितदादांना फोडले. काकाला एकदम रिकामं केलं. दोन-दोन पक्ष फोडून विरोधकांना थंड करणारे फडणवीस यांना आज महाराष्ट्राने 'देवाभाऊ' म्हणत डोक्यावर घेतले आहे. एकाच वेळी आपण काय काय करू शकतो, ते देवाभाऊने दाखवले. तीन पक्षांची महायुती नावाची सर्कस देवाभाऊ लीलया सांभाळत आहेत. मध्यंतरी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्यात अबोला आहे अशी चर्चा रंगली होती. दोघात संवाद नाही असे मीडिया दाखवत होता. पण शिंदे यांनीच तो खोटा प्रचार हाणून पाडला. 'बॉलिवूडमध्ये बिग बी' आहे. आमच्याकडे 'बिग डी' आहे, अशा शब्दात शिंदेंनी देवाभाऊंचे वर्णन केले. ज्याच्याशी खटकलं त्याच्याबाबतीत कुणी या प्रकारे बोलू शकतो? देवाभाऊंना माणसं जिंकण्याची कला छान अवगत आहे. देवाभाऊंना माणसं हाताळता येतात. ते त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसून येते. उद्धव ठाकरे देवाभाऊंना टोमणा मारण्याची एकही संधी सोडत नाहीत. म्हणून देवाभाऊने त्यांच्याशी कसे वागावे? बाळासाहेब ठाकरे यांचे मुंबईत स्मारक होत आहे. त्या स्मारक समितीचा अध्यक्ष देण्याचा विषय आला तेव्हा देवाभाऊने उद्धव ठाकरे यांचे नाव ओक्के केले. प्रतिस्पर्ध्याला जिंकण्यासाठी आणखी काय करायचे असते? 'सारे विरोधी पक्ष देवाभाऊच चालवतात' असे मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले होते. त्यांचे काय चुकले?

नागपुरात सध्या भरलेल्या विधानसभा अधिवेशनाचे एक विशेष आहे. विरोधी नेत्याशिवाय हे अधिवेशन पार पडत आहे. विधानसभा आणि विधानपरिषद अशा दोन्ही सभागृहाला विरोधी नेता नाही. विधान परिषदेत अंबादास दानवे होते. पण त्यांची आमदारकी संपली. आता विरोधी नेताच नाही असे हे पहिल्यांदाच घडते आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश आले. मात्र विधानसभा निवडणुकीत सुपडा साफ झाला. त्या धक्क्यातून विरोधकांना अजून सावरणं जमलेले नाही. विधानसभा निवडणुकीत ठाकरे सेनेचे २० आमदार निवडून आले. काँग्रेसचे १६ तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे फक्त १०. तिघे मिळूनही ४६ आमदार होतात. आता सभागृहातले विरोधी पक्षनेतेपद मिवण्यासाठी उद्धव ठाकरे यांची धडपड सुरू आहे. पण कसे मिळणार? त्यासाठी सभागृहाच्या सदस्य संख्येच्या किमान १० टक्के आमदार पाहिजेत. महाविकास आघाडीमधल्या तिन्ही पक्षाकडे २९ आमदार नाहीत. तरीही विरोधकांचा आग्रह चालू आहे. कुठली अट लागत नाही, असा विरोधकांचा दावा आहे. पण १० टक्के खासदार नसल्याने लोकसभेच्या पहिल्या तीन निवडणुकीत कोणालाही विरोधी पक्षनेतेपद मिळालं नव्हतं, हे ते सोयीस्करपणे विसरतात. सध्या साऱ्यांना महापालिका निवडणुकीचे वेध लागले आहेत. गेली २५ वर्षे मुंबईचे महापौरपद शिवसेनेकडे होते. यावेळी काट्याची टक्कर आहे. भाजपाला आपला महापौर बसवायचा आहे. निवडणुकीच्या निमित्ताने उद्धव सेनेने मराठीचा मुद्दा पुन्हा उकरून काढला आहे. मराठी अस्मितेचा विषय काढत ठाकरेंनी वातावरण तापवलं आहे. त्यासाठी आपला चुलतभाऊ मनसेचे सुप्रीमो राज ठाकरे यांना सोबतीला घेतले आहे. अडचणीची वेळ आहे म्हणून ठाकरेंना मराठी आठवली. पण राजकारण खेळायचे असते तेव्हा मराठीचे काय होते?

राज्यसभेत पाठवायचं होतं तेव्हा ठाकरेंनी कोणा कोणाला पाठवलं? तेव्हा त्यांना चंद्रिका केनिया, प्रीतिश नंदी, वेणुगोपाल धूत आठवले? आजच्या घडीला प्रियांका चतुर्वेदी शिवसेनेच्या राज्यसभा सदस्य आहेत. मोक्याच्या वेळी कुठे गायब होते तुमची मराठी अस्मिता? महापालिका निवडणुकीत मराठी माणूस हा प्रश्न नक्कीच विचारणार आहे.

९८५०३०४१२३
(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## आजचे संघगीत-७०

शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५

### भगवा झेंडा प्राण माझा, भगवा झेंडा प्राण

भगवा झेंडा प्राण माझा, भगवा झेंडा प्राण
जिंदगीची आण माझ्या जिंदगीची आण ॥धृ.॥

डुलते कशी पहा रायाची स्वारी
खुशीत आला राया डुलतोय भारी
मोतियांची खाण माझी मोतियांची खाण□॥१॥


याच्याच छायेखाली हिंदुमर्दांनी
गनिम पिटाळिलं पाजुन पाणी
माझ्या अंगी त्राण त्येचं माझ्या अंगी त्राण ॥२॥

अन्यायाची आता येई शिसारी
घेऊन हातामधी नंग्या समशेरी
करू दाणादाण सारी करू दाणादाण ॥३॥

साऱ्या गावामधी वेशीवेशीला
प्रांता प्रांताला अन् साऱ्या देशाला
मांडुन बसला ठाण आता मांडुन बसला ठाण ॥४॥

ग्यानबा तुकाराम विठु रखुमाई
याच्यात दिसती मला काशी गंगामाई
गेलं हरपुन भान माझं गेलं हरपुन भान ॥५॥

### सण आणि आंब्याचे पान



हिंदू संस्कृतीमध्ये आंब्याच्या पानाला विशेष महत्त्व आहे. ज्या दोरीवर सर्व आंब्याची पाने एकत्र केली जातात त्यास तोरण असे म्हटले जाते. अगदी पुरातन काळापासून या आंब्याच्या पानाला घरच्या उंबरठ्यावरच्या दारावर जागा नेमून दिलेली आहे. हिरव्यागार लांब पानामुळे घराची शोभा वाढीस लागते. तसे पाहिले तर निसर्गात अनेक झाडं आहेत आणि अनेक झाडांची पाने आकर्षक आहेत. तरी आंब्याच्या पानांची निवड शुभ कार्यासाठी केली जाते. लग्नाच्या आदल्या दिवशी वर आणि वधूच्या घरासमोर मांडव टाकण्यापासून फुलांच्या हारापर्यंत या पानांचा वापर करतात. आंब्याच्या पानाला डहाळी म्हटले जाते. आंबा हा गुणकारी आहेच. उन्हाळ्यात आपण सारेच आंब्याचा आस्वाद घेत असतो. आंब्यासोबत त्या झाडांची पानेही गुणकारी आहेत. ॲंटी ऑक्सिडंट म्हणूनही ही पाने उपयुक्त असून ती पाण्यात उकळून अथवा चूर्ण स्वरूपात वापरता येतात. आंब्याची कोवळी पाने टॅनिनने युक्त असतात. डायबेटिसची सुरवात असेल तर ही पाने वाळवून पावडर करावी व पाण्यात रात्रभर भिजवून ती गाळून सकाळी हे पाणी प्यावे. त्याने मधुमेहाची लक्षणे कमी होतात, ब्लड प्रेशर कमी करण्यासाठी, रक्तवाहिन्यांचे काठिण्य कमी करण्यासाठी ही पाने उपयोगी आहेत. मनात असलेली अस्वस्थता या पानांनी दूर करता येते. त्यासाठी आंघोळीच्या पाण्यात ही पाने टाकावी. पित्तखडे अथवा मूत्रखड्याचा त्रास होत असेल तर पानांचे बारीक चूर्ण पाण्यात भिजवून रात्रभर ठेवावे व हे पाणी सकाळी प्यायलाने पित्तखडे, मूत्रखडे मोडतात व शरीराबाहेर पडतात. सर्व श्वासविकारांवर म्हणजे सर्दी, अस्थमा यावर पानांचा पाण्यात उकळवून केलेला काढा घेतल्याने बरे वाटते. त्यात थोडा मध घातला तर कफावर गुणकारी ठरतो. कानदुखीचा त्रास होत असेल तर पानांचा रस काढून चमचाभर रस कानात थेंबथेंब टाकत रहावा. उचक्या लागत असल्यास अथवा घशाचा त्रास होत असल्यास ही पाने जाळून त्याचा धूर श्वासमार्गे आत ओढावा. पोट स्वच्छ व हलके राहण्यासाठी एका झाकणाच्या डब्यात पाने पाण्यात टाकून झाकण लावावे व रात्रभर ते तसेच ठेवून सकाळी गाळून हे पाणी अनशा पोटी प्यावे. असे हे गुणकारी आंब्याचे पान आहे. तेंव्हा आपल्या घरात फक्त सणासुदीलाच नाही तर आयुर्वेदिक म्हणून या पानांचे स्वागत करू या.

नासा येवतीकर/९४२३६२५७६९

## वाचक पत्रे

### सेवा करणारे हात कधीच मळत नसतात

सेवा धर्म हा जगातील सर्वश्रेष्ठ धर्म आहे. सेवा शुद्ध भावनेने करणे, सेवा करीत असताना कोणताही स्वार्थ मनी न बाळगता, कोणताही हेतू मनी न बाळगता सेवा करीत राहणे हा मानवी धर्म आहे. 'जनसेवा हीच ईश्वर सेवा' असे नेहमी संबोधले जाते. दीन-दुबळे, गोर-गरीब, दिव्यांग-अबलांची सेवा, प्राणिमात्रांची सेवा इत्यादी सेवा असेल तर या सर्व सेवा निःस्वार्थी वृत्तीने करणे हा मानवी धर्म आहे. सेवा करीत असताना ती निःस्वार्थी, सकारात्मक, विधायक व प्रामाणिकतेची असावी, अशी सेवा ज्या हातांनी ज्या मनाने ज्या शुद्ध भावनांनी केली जाते या सर्व बाबी कधीच मलिन होत नसतात; उलट मनापासून निःस्वार्थ सेवा असल्यास वरील सर्व बाबी पवित्र, मंगल, स्वच्छ तसेच निर्मळ बनतात. याबाबत अनेक धार्मिक व ऐतिहासिक दाखले आहेत. निकोप, निःस्वार्थी मनापासून केलेली सेवा ही पवित्र व निर्मळ भावना असते हे कदापिही विसरता कामा नये.

धोंडीरामसिंग राजपूत/९४२१३१२२४४

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ई-मेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

# मतदार यादीतील हरकती, दुबार नोंदी काम वेगाने पूर्ण करा : आयुक्त डॉ. ओम्बासे

## कंट्रोल चार्टमध्ये चूक चालणार नसल्याचा दिला इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने मतदार यादीतील हरकती, दुबार नोंदी व मतदान केंद्रांचे काम वेगाने पूर्ण करावे. कंट्रोल चार्टमध्ये चूक चालणार नसल्याचा इशारा महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिला आहे.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह येथे महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने प्रभागनिहाय मतदार यादी, दुबार मतदारांची छानननी, मतदान केंद्र निश्चिती व कंट्रोल चार्ट तयार करण्याबाबत सविस्तर आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सहायक आयुक्त गिरीश पंडित, सहायक अभियंता रामचंद्र पेंटर, अधिकारी प्रदीप निकते, संदीप भोसले तसेच सर्व उपतुकडी प्रमुख व तांत्रिक समन्वयक उपस्थित होते.



### प्रभागनिहाय मतदान केंद्रांची १५ डिसेंबरपर्यंत अंतिम सूची

मतदान केंद्र निश्चिती व मतदान केंद्रनिहाय यादी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १५ डिसेंबर २०२५ पर्यंत प्रभागनिहाय मतदान केंद्रांची अंतिम सूची निश्चित करणे आवश्यक आहे.अंतिम मतदार यादीच्या आधारे मतदारांना मतदान केंद्रांना जोडणे व २० डिसेंबर २०२५ पर्यंत कंट्रोल चार्ट संगणक प्रणालीमध्ये नोंदवणे बंधनकारक आहे. २७ डिसेंबर २०२५ पर्यंत मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे आवश्यक आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदान केंद्रनिहाय मतदारांची नोंदणी करावी, असे निर्देश देण्यात आले.

प्रारूप मतदार यादीवरील हरकती व कार्यवाहीचा आढावा दि. २० नोव्हेंबर २०२५ रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिध्द केली होती. मतदारांकडून ३ डिसेंबर २०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांची एकूण संख्या ५५५ असून त्या संबंधित कार्यवाहीचा आढावा बैठकीत घेण्यात आला. राज्य निवडणूक आयोगाकडून अंतिम मतदार यादीचा कंट्रोल चार्ट अचूकपणे व बिनचूक पूर्ण करणे याबाबत सतत सूचना प्राप्त होत असल्याचे आयुक्तांनी सांगितले.कंट्रोल चार्टमध्ये अपलोड नंतर दुरुस्ती शक्य नसल्याने, प्रत्येक तुकडी प्रमुखांनी पूर्ण तपासणी करूनच माहिती अंतिम करावी, असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले.

त्रुटी आढळल्यास उपतुकडी प्रमुख स्वतः जबाबदार राहतील, याची नोंद घेण्याची सूचना करण्यात आली.

संभाव्य दुबार मतदारांबाबत सूचना दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ रोजी राज्य निवडणूक आयोगाचे सचिव यांनी स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी संभाव्य दुबार मतदारांची छानननी करण्याबाबत सविस्तर दिशा-निर्देश जारी केले आहेत. या निर्देशांची प्रत अधिकारी व समन्वयकांना यापूर्वीच प्रदान करण्यात आले असून दि. १ २८ नोव्हेंबर २०२५ च्या बैठकीतही त्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.राज्य निवडणूक आयोगाकडून सोलापूर महानगरपालिकेला प्रभागनिहाय संभाव्य दुबार मतदार यादी प्राप्त झाली असून प्रत्येक मतदाराचे स्थल सर्वेक्षण करून योग्य ती कार्यवाही करावी, असा आदेश आयुक्तांनी उपतुकडी प्रमुखांना दिला.

आयुक्तांनी निवडणुकीसंदर्भातील सर्व कामे निर्धारित वेळेत, शिस्तबद्ध व त्रुटीविरहित पूर्ण करण्याचे निर्देश सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिले.मतदार यादीची अचूकता आणि मतदान केंद्रांची योग्य रचना ही निवडणूक प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाची पायरी असल्याने कोणतीही ढिलाई होऊ नये, असेही आयुक्त म्हणाले.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मिळकत म्हणून वर्णन केलेली मौजे हत्तूर येथील शेतजमीन गट नं. २९७/१/अ क्षेत्र १ हे.0२ आर पो.ख. 0.0२ आकार रु. २.८६ पैसे व गट नंबर २९८/२ मधील १ हे १४ आर पो.ख. 0.0३ आकार ३ रु. ५९ पै. असे आहे.

ज्या अर्थी श्री. सिध्दप्पा तिपण्णा कुंभारीकर रा.हत्तूर ता. द. सोलापूर यांनी अप्पर तहसिल कार्यालय मंद्रूप येथे वर नमुद शेतजमिनीचे वाटप मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी जर कोणास वरील अर्जदार यांच्या दरम्यान वाटप करून देण्यासंबंधी काही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 0७ (सात) दिवसाचे आत मे. अप्पर तहसिलदार, मंद्रूप, ता. द. सोलापूर यांच्याकडे लेखी हरकत घेण्यात यावी.

तसे न झाल्यास अर्जदार यांच्या वाटपाचा अर्ज मंजूर करून त्याचे दरम्यान वाटप होऊन मिळेल. तदनंतर कोणाचीही काही हरकत विचारात घेतली जाणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ही नोटीस दिली ता. ११/१२/२०२५

सही/-
**ॲड. तुकाराम एस. चिंचोळी**
बी.कॉम.एलएल.बी.
रा. वळसंग, दक्षिण सोलापूर
जि. सोलापूर मो.नं. ९०२११६६३३२




## राज्यस्तरीय स्काऊट मास्टर प्राथमिक प्रशिक्षण शिबिरात ५० शिक्षकांचा सहभाग

**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

सोलापूर भारत स्काऊट आणि गाईड कार्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या सात दिवसांचा निवासी राज्यस्तरीय स्कॉट मास्टर प्राथमिक प्रशिक्षण शिबिरात जिल्ह्यातील ५० शिक्षकांनी सहभाग नोंदवला.

सात रस्ता जवळील भारत स्काऊट आणि गाईड्स कार्यालयात या शिबिराचे आयोजन केले होते. यानिमित्त रक्तदान शिबिर स्वच्छता मोहीम व वृक्षारोपण असे विविध उपक्रमांची आयोजन केले होते. मुलांसमोर शिकवताना पाठाची तयारी कशी करावी व विविध वस्तूद्वारे विद्यार्थ्यांना कसे मार्गदर्शन करावे यावर बी एस पोटे यांचे व्याख्यान झाले. क्रीडा शिक्षक प्रसन्न काटकर व अर्जुन सुरवसे यांनी प्रथमोपचार, दोरीच्या गाठी कशा बांधाव्यात, होका यंत्राचा उपयोग या विषयावर विस्तृतपणे मार्गदर्शन केले. पारितोषिक वितरण प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादरी शेख यांच्या हस्ते झाले. यावेळी शिबिराचे प्रमुख बी एस पोटे, सोलापूर जिल्ह्याचे ट्रेनिंग कमिशनर शंकरराव यादव, सोलापूरचे अडल्ट रिसोर्स चे कमिशनर रशीद पठाण, जिल्हा संघटक श्रीधर मोरे, क्रीडाशिक्षक प्रसन्न काटकर, क्रीडा शिक्षक अर्जुन सुरवसे, महेश कोरे उपस्थित होते.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवतात. निविदा सूचना क्रमांक: 19- 2025-SrDENCO कामाचे नाव: सोलापूर विभागातील KWV-LUR विभागातील बोगदा क्रमांक 2 च्या आत महत्त्वाच्या ठिकाणी पोर्टल, शॉटक्रिटींग, रॉक बोल्टिंग इत्यादीसारख्या स्टेबलिंग आणि सपोर्टिंग कामांची तरतूद. कामाची अंदाजे किंमत: रु. 14,24,83,741.00 बकाया रक्कम: रु. 8,62,400.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने देखभाल कालावधी: 12 महिने www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 25/12/2025 15.00 वाजेपर्यंत www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 25/12/2025 15.30 वाजेपर्यंत. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाइटला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/ शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (वर्क्स)**
Apex-086 **मध्य रेल्वे, सोलापूर**

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है



## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** :- जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे नान्नज येथील ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमीन यांसी **गट क्रमांक १४०** याचे एकुण क्षेत्रफळ **१ हेक्टर 0४ आर यांसी आकार रु.00-४0 पैसे अशी** संपूर्ण शेतजमीन मिळकत. यांसी चतुःसिमा- पुर्वेस- मार्डी शिव, पश्चिमेस - गट क्र.१४२, दक्षिणेस- गट क्र.१४१ व उत्तरेस-गट क्र.४३९. येणेप्रमाणे चतुः सिमेतील शेतजमीन व त्यातील दगड, माती, बांध, बंधारे, झाडझुडूप वगैरे तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीच्या सर्व हक्कासह सदरची शेतजमीन मिळकत ही श्री. जनार्धन जिजाबा रणदिवे यांचे मालकी वहिवाटीची असून, त्यांनी सदर शेतजमीन मिळकत आमचे अशिलास खुषखरेदीने देण्याचे ठरवून आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे. सदर शेतजमीन मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व भरवसा वर नमुद मालकांनी आमचे अशिलास दिला आहे.

तरी सदर शेतजमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कसलाही हक्क, दावा, गहाण, बोजा, बक्षीस, वहिवाट वगैरे हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 0८ (आठ) दिवसाच्या आत त्यांचे हक्काचे पृष्ठयर्थ कागदपत्रे दाखवून आमची खात्री पटवून द्यावी अगर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणी कांही हक्काची जाणीव करुन न दिल्यास सदर शेतजमीन मिळकत वर नमुद मालकांची असून, ती निर्वेध व निजोखमी आहे व सदर शेतजमीन मिळकतीत अन्य कोणाचा कसलाही हक्क व हितसंबंध नाही, असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर शेतजमीन मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाची कांहीही तक्रार चालणार नाही.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली ता. १0/१२/२०२५

सही/-
**ॲड. दिपक अ. सुरवसे**
बी.एस.एल., एलएल.बी., ॲडव्होकेट
मु.पो. नान्नज, ता. उत्तर सोलापूर,
जि. सोलापूर मो. नं. ९८५00४२00९
अशिलातर्फे ॲडव्होकेट



## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णनः-** डि व सब डि सोलापूर महानगरपालिका सोलापूर शहर हद्दवाढमधील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १४0/अ१, नवीन सर्व्हे नं. १३८/अ १ यापैकी 'मल्लिकार्जुन नगर भाग-२' यामधील खालीलप्रमाणे प्लॉट्स.

प्लॉट नं. २१0 याचे क्षेत्र पुर्वपश्चिम ३४ फुट दक्षिणोत्तर ३0 फुट असे एकुण क्षेत्र १0२0 चौ. फुट अथवा ९४.७९ चौ.मी. आहे. तसेच प्लॉट नं. २११ याचे क्षेत्र पुर्वपश्चिम ३0.५ फुट दक्षिणोत्तर ३0 फुट असे एकुण क्षेत्र ९१५ चौ. फुट अथवा ८५.0३ चौ.मी. इतके आहे असे दोन्ही प्लॉटचे एकुण क्षेत्र १९३५ चौ. फुट अथवा १७९.८२ चौ.मी. इतके आहे.

यांसी एकत्रित चतुःसिमाः पुर्वेसः रस्ता, पश्चिमेस रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नंबर २१२, उत्तरेस : प्लॉट नं.२0९.

येणेप्रमाणे चतुःसिमेतील खुलीजागा व त्यातील तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीच्या सर्व हक्कासहची जागा.

वर नमूद मिळकत ही श्रीमती तेजस्विनी राजेंद्र शहा रा. मु.पो. आरग, ता. मिरज, जि. सांगली, यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. त्याप्रमाणे वर नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व निजोखमी अशी हमी त्यांनी आमच्या अशिल नामे संतोष लक्ष्मण बंडगर यांना देऊन ती आमच्या अशिलास खरेदी देण्याचे मान्य केलेले आहे. त्यानुसार त्यांनी तोंडी बोलणी केलेली आहे व वर नमूद प्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत. सदरहू मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी आमचे अशिलास त्यांनी दिलेली आहे.

तरी या नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणाचीही जप्ती. टाच, दान, गहाण, बक्षीस, साठेखत, करार, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 0७ (सात) दिवसात खालील नमूद पत्त्यावर लेखी पुराव्यानिशी / कागदोपत्रानिशी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल खरेदी करतील, मग कोणाचीही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तो आमच्या अशिलावर व मिळकतीवर मुळीच बंधनकारक राहणार नाही.

ही जाहीर नोटीस दिली ता. १0/१२/२०२५.

सही/-
**ॲड. सागर विष्णू घाटे**
ॲडव्होकेट
रा. तळेहिप्परगा, राजदिप नगर, उत्तर सोलापूर,
जि सोलापूर मो.नं. ९८९0३0१0९३
अशिलातर्फे ॲडव्होकेट



## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public in large that,

The property mentioned in schedule hereunder is purchased by **Mohammad Anwar M. Yakub Janwadkar** by registered sale deed.

That, prior Sale deed bearing **R.E. No. 2632.** That, the said Sale Deed has been lost by **Mohammad Anwar M. Yakub Janwadkar.** Now the original Slae Deeds are no available with her and accordingly he has filed missing complaint at Jailroad Police Station, Solapur City bearing its Missing Register No. 475/2025 on date 08-12-2025.

Our Client is going to slae the property. All persons or institutions having any claim or right in respect of the said property or any part thereof by way of inheritance, share, sale, mortgage, lease, lien, license, gift, exchange, trust, possession or encumbrance or otherwise howsoever are hereby required to inform the same in writing supported with the original documents to the undersigned at the address given below mentioned, within 3 days from the date of publication of this notice, failing which, the claim or claims, if any of such person, persons or institution/s shall be considered to have been waived and /or abandoned. Further, it is also hereby informed through this public notice that no one should deal with the said properties on the basis of the said properties on the basis of the said documents.

**THE SCHEDULE OF THE PROPERTY**

District and sub District Solapur, Taluka North Solapur, within limits of Solapur Municipal Corporporation area as per Old extract known as North Sadar Bazar, New Online Extract mentioned as South Kasba Peth property bearing T.P. No. 3, City Survey No. 5A. Final Plot No. 5 (Part) the shop in the apartment known as **Nath Pride Complex out of Shop No. 33 having builtup area 22.20 Sq.Mtr.** and bounded as: At East- Flat No. D-01 and Staircase, At South-Shop No. 34, At West-Open Space, At North-Shop No.32.

This Notice is issued on 11-12-2025.

Note- Please Take Advocate's Name in Bold.

सही/-
**के. एम. शेख ॲन्ड एम.ए.नालवार**
ॲडव्होकेट्स
कार्यालय पत्ता : गाळा नं. ९, लोखंडवाला टॉवर,
पानलगर शाळेसमोर, जिल्हा परिषद रोड, सोलापूर
मो. नं. ९८२२५३६५६५, ९१७५४00४४४




## संतश्री बुरुड केतेश्वर महाराज यांना मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये मेदार केतय्या तथा संतश्री बुरुड खेतेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, महेश वालावलकर, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, भालचंद्र साखरे, सायली ढोले, कदर शेख आदी उपस्थित होते.


**CHANG IN NAME**

I hereby declare that my old name **MR. VASHIM MOHAMADISAK BAGWAN** has been changed to new name **MR. VASIM MAHAMADISAK BAGWAN** and residing at A./p. Vairag, Tal. Barshi, Dist. Solapur-413 402 kindly Note the same.



## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमली तारीखः २७/0१/२0२६
दि.कि.अ.नं. १२७/२०२५
नि. ५

**बार्शी येथील मे. अति. जिल्हा न्यायाधिश यांचे न्यायालयात**

१) **चि. किरण अमर नगरे,** वय १७ वर्षे, धंदा-शिक्षण,
२) **चि. गौरव अमर नगरे,** वय १५ वर्षे, धंदा-शिक्षण
३) **चि. विराज अमर नगरे,** वय 0६ वर्षे, धंदा-शिक्षण -- **अर्जदार**
रा.सर्व रा. सांगवी ता. बारामती, जि. पुणे अर्जदार नं.१ ते ३ चे अ.पा.क. जनक म्हणून जवळचे इष्टमित्र जनकआई अर्जदार नं. ४
४) **पुजा अमर नगरे,** उ. वय ३२ धंदा-घरकाम, शेती, रा. सदर

**विरुध्द**

महाराष्ट्र शासन वगैरे -- **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदाराचे नावावरील डि. सोलापूर, सब डि. करमाळा पैकी मौजे जिंती येथील जमीन ग.नं.१२६/२ क्षेत्र 0२ हे.0२ आर आकार रु. 0२.00 पैसे यासी चतुःसिमा **पुर्वेस** पांद रस्ता, **दक्षिणेस** गिरी याची जमीन, **पश्चिमेस** वन जमीन **उत्तरेस** धेंडे यांची जमीन येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक मिळकत अज्ञान अर्जदार व त्यांची आई यांचे मालकी कबजे वहिवाटीची व वारसा हक्काने ७/१२ हक्कपत्रकी नोंदलेली मिळकत असून अज्ञान अर्जदाराचे वडिल मयत आहेत अज्ञान अर्जदाराचे वडिल मयत असलेने अज्ञान अर्जदाराचे पालन पोषण, संगोपन सर्व कांही त्याची आई अ.पा.क. याच पाहत आहे. सदर अज्ञान अर्जदाराचे भविष्यातील शिक्षण व गरजा याचा विचार करुन तिचे अ.पा.क. आई यानी सदर मिळकत विक्री करणेचे ठरवले असून तसा व्यवहार ठरवलेला असून योग्य किंमत आलेने सदर व्यवहार अज्ञानाचे हिताचा आहे तथापी, सदर मिळकतीचे मालक हे अज्ञान असलेने सदर व्यवहारास मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे, सदरची कृती योग्य व गरजेची असून अज्ञानाचे हिताची आहे, असे कथन करुन अर्जदाराचे वतीने तिचे अज्ञान पालनकर्ती आईने या मे. न्यायालयात अज्ञानाची मिळकत विक्री करणेस परवानगी मागणेचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनां संबंधाने कोणाचे कांही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे कांही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३0 दिवसाचे आत अगर पुढील नेमली तारीख २७/0१/२0२६ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. तारीखः ११/१२/२०२५

**सही/-**
**अधिक्षक**
**अपर जिल्हा न्यायालय, बार्शी.**



## IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | १४१0२३१६0 | मालमत्ता तारण कर्ज | १. महादेव अजिनाथ वाघमोडे<br>२. सुनंदा महादेव वाघमोडे | 0४.१0.२०२५ | रुपये ६,३९,३२२.३२/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ७२/२, १८२0.00 चौ. फूट क्षेत्रफळ म्हणजेच १६९.१४४ चौ. मीटर, ढोकरी येथे स्थित, जिल्हा सोलापूरच्या हद्दीत, तालुकाः करमाळा, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३२0२, आणि खालीलप्रमाणे सीमाः पूर्वः सखाराम वळसे पश्चिमः सुग्रीव खरात, उत्तरः ज्ञानदेव वाघमोडे, दक्षिणः रस्ता. | | | | | |
| 2 | १३९२७१६२८ | मालमत्ता तारण कर्ज | १. सावता नामदेव सपकाळ<br>२. नामदेव गोविंद सपकाळ<br>३. मुक्ता सावता सपकाळ | २६.११.२०२५ | रुपये ५,१८,७४७.७१/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** १२५0 चौरस फूट क्षेत्रफळ आणि बांधकाम क्षेत्रफळ असलेले हे सर्व मालमत्तेचे भाग आणि पार्सल आहे. हे ग्रामपंचायत मिलकट क्रमांक १९२, बिटरगाव वांगी येथे स्थित आहे, जिल्हा सोलापूरच्या हद्दीत, तालुकाः करमाळा, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३२0२, आणि पूर्वः रामकृष्ण पोरे, उत्तरः रस्ता, पश्चिमः बाबूराव नलावडे, दक्षिणः नागेश बोरकर | | | | | |

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६0 दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कार्यवाही सुरू करण्यास भाग पाडले जाईल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**दिनांक : १२/१२/२०२५**
**ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र**

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**



## IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेची पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन केले नाही आणि ते अनियमित झाले आहेत, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपी म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेली रक्कम खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केली आहे आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ८२४३0१३२ | मालमत्ता तारण कर्ज | १. आशा लक्ष्मण गायकवाड<br>२. बायदाबाई लक्ष्मण गायकवाड | २३.0९.२०२५ | रुपये २१,२७,0५२.७३/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** फ्लॅट क्रमांक २८/३, तिसरा मजला, त्याचा कार्पेट क्षेत्रफळ ३0.२९ चौ. मीटर आणि बिल्ट-अप क्षेत्रफळ ३५.९४ चौ. मीटर आणि सुपर बिल्टअप क्षेत्रफळ ६0.७५ चौ. मीटर नाथ कन्स्ट्रक्शन, प्लॉट क्रमांक २८ आणि २९ पैकी सी.टी. क्रमांक १0१२/सी. पैकी जुना सर्व्हे क्रमांक ८७/१ प्रस्तावित जयबजरंग सहकारी संस्था मर्या., गावः बाले येथे स्थित, महानगरपालिका सोलापूरच्या हद्दीत, उपविभागः उत्तर सोलापूर, विभागः सोलापूर, महाराष्ट्र-४१३२५५, आणि अशी सीमा आहेः - पूर्वः पी. क्रमांक १६ पश्चिमः रस्ता उत्तरः पी. क्रमांक २७ दक्षिणः पी. क्रमांक २९/३ | | | | | |
| 2 | १0३९0१५२७ | मालमत्ता तारण कर्ज | १. आण्णा लक्ष्मण कांबळे<br>२. सरस्वती लक्ष्मण कांबळे | ३0.१0.२०२५ | रुपये ३,२८,५४७.८१/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** गमालमत्तेचा पत्ताः ग्रामपंचायत मिल्कट क्र. २३७ चा सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण १६३३ चौ. फूट., गावात वसलेलेः अर्जुनसोंड, ग्रामपंचायतीच्या हद्दीतः अर्जुनसोंड, उप-विभागः मोहोळ, Div: Solapur, Solapur, Maharashtra-413213, and Bounded as:- पूर्वः सावळा सोपान कांबळे पश्चिमः नागनाथ गेणा कांबळे दक्षिणः बाई निवृत्ती साबळे उत्तरः ग्रामपंचायत रोड | | | | | |
| 3 | १४३२0५0२४ | मालमत्ता तारण कर्ज | १. अर्चना नानासाहेब वानखरे<br>२. नानासाहेब चंद्रकांत वानखरे | २६.११.२०२५ | रुपये ७,२३,५१६.७६/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** ग्रामपंचायत मिल्कट नंबर ८३0 चा सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण मोजमाप १0८0 चौ. फूट. गावात वसलेलेः शेलगाव ऍं, ग्रामपंचायत शेलगाव (आर), तालुकाः बार्शी जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३२२२, आणि सीमाः- पूर्वः धनाजी वनखरे पश्चिमः कुमार वनखरे उत्तरः रस्ता दक्षिणः मनोहर वनखरे | | | | | |
| 4 | १४0२२४५९0 | मालमत्ता तारण कर्ज | १. अविनाश वाळू चव्हाण<br>२. अक्षता अविनाश चव्हाण | २३.0८.२०२५ | रुपये १0,१८,९६८.२६/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** सोलापूर उपविभाग, दक्षिण सोलापूर येथे स्थित मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल, ग्राम पंचायतीच्या हद्दीत मुळेगाव तांडा, ग्रामपंचायत मिलकट क्रमांक ११३१, एकूण क्षेत्रफळ ४९३ चौरस फूट, आणि मालमत्तेची सीमाः- पूर्वः रस्ता पश्चिमः नारायण लेसू राठोड उत्तरः रस्ता दक्षिणः विष्णू गंगाराम चव्हाण | | | | | |
| 5 | १0३८९३७२६ | मालमत्ता तारण कर्ज | १. अवेल अब्दुल रजाक बादकल<br>२. रजाक बाबुलाल बादकल | ११.१0.२०२५ | रुपये ४,६८,५२२.८२/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, प्लॉट क्रमांक १४0, सी.टी.एस. क्रमांक ४१३, पश्चिम बाजूच्या भागापैकी ५१.११ चौ. मीटर, रामवाडी सोलापूर शहर, उपविभागः उत्तर सोलापूर, विभाग सोलापूर, महाराष्ट्र येथे स्थित आहे आणि सदर मालमत्तेची सीमा अशी आहेः उत्तरः शिंदे यांचे घर क्षेत्र दक्षिणः रस्ता पूर्वः उर्वरित क्षेत्र पश्चिमः रस्ता | | | | | |
| 6 | ५४६00२५३ | मालमत्ता तारण कर्ज | १. ब्रह्मनाथ बापू जाधव<br>२. महानंदा बापू जाधव | २३.0९.२०२५ | रुपये १३,१३,२८३.८७/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** बांधकामाचा संपूर्ण भाग आणि पार्सल, ग्रामपंचायत मिकत क्रमांक १0८, ९२.९३ चौ. मीटर, मुळेगाव येथे स्थित, तालुकाः दक्षिण सोलापूर, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३00६, आणि अशी सीमा आहेः पूर्वः पटेल फर्निचरची मालमत्ता पश्चिमः रस्ता उत्तरः अनिल मागुमखाणेची मालमत्ता दक्षिणः शिवाजी गायकवाडची मालमत्ता | | | | | |
| 7 | १६२४५४८७२ | घरासाठी कर्ज | १. ईश्वर झुंबर नरुटे<br>२. इंदूमती दामोदर देवकते | 0८.0८.२०२५ | रुपये ८,५८,९७५.९७/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** घर क्रमांक २७0 हा संपूर्ण मालमत्तेचा तुकडा आणि पार्सल ग्रामपंचायत पांडे (खांबेवाडी) ता. करमाळा, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३२0३ च्या अधिकारक्षेत्रात स्थित आहे, घर क्रमांक २७0 चे मोजमाप, एकूण क्षेत्रफळ २0२.४0 चौ. मीटर म्हणजेच २१७८ चौ. फूट पट्ट्यानुसार मालमत्तेच्या सीमा घर क्रमांक २७0:- पूर्वः शिवाजी नरुटे पश्चिमः शहाजी देवकाते उत्तरः स्वतः दक्षिणः सांगोबा रोड | | | | | |
| 8 | १२६७३८0५0 | घरासाठी कर्ज | १. कांतिलाल चंदर अडगळे<br>२. जयश्री कांतिलाल अडगळे | २६.११.२०२५ | रुपये ४,२६,१२६.७१/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** घर क्रमांक १९६-३, आकार ३0 द ४0 फूट १२00 चौरस फूट, अर्जुननगर गावात स्थित, ग्रामपंचायतः अर्जुननगर, तहसील करमाळा, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३२0३, आणि सीमाः पूर्वः मिरगव्हाण रोड पश्चिमः सोमा दौला अडगळे उत्तरः गबाजी नामदेव रोकडे दक्षिणः रस्ता | | | | | |
| 9 | १४५७७६0१४ | मालमत्ता तारण कर्ज | १. रणजित राजेंद्र पवार<br>२. ज्योती रणजित पवार | 0८.0८.२०२५ | रुपये १0,७६,५४७.३१/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ८८/२, क्षेत्रफळ ४४ द १६ = ७0४ चौ. फूट म्हणजेच ६५.४२ चौ. मीटर बांधकाम क्षेत्रासह, गावः करंजे येथे स्थित, जिल्हा सोलापूरच्या हद्दीत, तालुकाः करमाळा, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३२0३, आणि सीमारेषा जसेः- पूर्वः रस्ता पश्चिमः रस्ता उत्तरः रस्ता दक्षिणः मिलकट दादासाहेब बाबासाहेब पवार यांच्या मालकीचा | | | | | |
| 10 | १५३१९६२00 | मालमत्ता तारण कर्ज | १. समाधान बाळासाहेब मारकड<br>२. सोनाली समाधान मारकड | 0८.0८.२०२५ | रुपये ३,४३,४११.४३/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** ग्रामपंचायतीचा संपूर्ण तुकडा आणि पार्सल मिलकट क्रमांक ३३, क्षेत्रफळ ६९३ चौ. फूट, म्हणजेच ६४.४0 चौ. मीटर बांधकाम क्षेत्रासह, विहाळ गावात स्थित, जिल्हा सोलापूरच्या हद्दीत, तालुकाः करमाळा, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३२0३, आणि पूर्वेकडील सीमाः मिलकट विठ्ठल मरकड यांच्या मालकीचे पश्चिमः मिलकट ज्योतिराम काळे यांच्या मालकीचे उत्तरः मिलकट मच्छिंद्र मरकड यांच्या मालकीचे दक्षिणः ग्रामपंचायत रस्ता | | | | | |
| 11 | १४८५१९६३६ | मालमत्ता तारण कर्ज | १. समाधान हरिदास बनसोडे<br>२. हरिदास सिद्राम बनसोडे | ११.१0.२०२५ | रुपये ६,५0,३७५.0७/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** ग्रामपंचायत मिल्कट क्र. ९१/१ चा सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण मोजमाप क्षेत्र १३५0 चौ. फूट., मौजे गावात वसलेलेः रामहिंगाणी, ग्रामपंचायतीच्या हद्दीत रामहिंगाणी, उप-विभागः मोहोळ, दिः सोलापूर, महाराष्ट्र ४१३२१३, आणि सीमाः पूर्वः अनिल दत्तात्रय अनुसे पश्चिमः रामपंचायत रस्ता उत्तरः बाळासाहेब सिद्राम बनसोडे दक्षिणः संतोल मासगाव | | | | | |
| 12 | १0५९८0७५७ | मालमत्ता तारण कर्ज | १. संतोष तुकाराम तेली<br>२. सावित्री तुकाराम तेली | ३0.0९.२०२५ | रुपये ४,७३,४१४.३२/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, मिल्कट क्रमांक ३१३, एकूण ६५0 चौ. फूट, विभाग सोलापूर, उपविभाग दक्षिण सोलापूर, ग्रामपंचायत होनमुर्गी विरनाळ, महाराष्ट्राच्या हद्दीत, आणि सदर मालमत्तेची सीमा अशी आहेः उत्तरः मैनुद्दीन हवालदार दक्षिणः कॉमन रोड पूर्वः गुरन्ना अप्पारव तेली पश्चिमः कॉमन रोड | | | | | |
| 13 | १४७५८७५३७ & १0३६५0५0९ | मालमत्ता तारण कर्ज | १. शिवशंकर मल्लिकार्जून मेंद<br>२. मल्लिकार्जून महादेव मेंद<br>३. गजराबाई मल्लिकार्जून मेंद | 0८.0८.२०२५ | रुपये १0,४३,३८७.४२/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** सोलापूर, उपविभागः उत्तर सोलापूर येथे स्थित मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल, ग्राम पंचायतीच्या हद्दीत, कवठे, ग्रामपंचायत मिलकट क्रमांक १२, ११0४ चौरस फूट क्षेत्रफळ, आणि पूर्वेकडील सीमाः रस्ता पश्चिमः अमीन बशीर शेख दक्षिणः बंडूभाई घुडूभाई शेख उत्तरः राहुल नागनाथ टेली | | | | | |
| 14 | १५0१६८४४४ | मालमत्ता तारण कर्ज | १. विक्रम नामदेव लांडगे<br>२. संगिता विक्रम लांडगे | ३0.0९.२०२५ | रुपये ५,२६,८५५.६१/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल बेअरिंग जीपी मिलकट क्रमांक १२, बेअरिंग ॲडमेजरिंग एरिया १९८0 चौ. फूट, म्हणजेच १८४.0१ चौ. मीटर बांधकाम क्षेत्रासह, पांडे गाव, जिल्हा सोलापूर, ता. करमाळा, सोलापूर, महाराष्ट्राच्या हद्दीत, आणि सदर मालमत्तेची सीमा अशी आहेः उत्तरः मिलकट रामदास भोसले यांच्या मालकीचे दक्षिणः मिलकट सोपान लकडे यांच्या मालकीचे पूर्वः मिलकट बलभीम लांडगे यांच्या मालकीचे पश्चिमः रस्ता | | | | | |
| 15 | १0८0९४१२६ | मालमत्ता तारण कर्ज | १. विनोद नागनाथ राठोड<br>२. नागनाथ वल्लप्पा राठोड | २३.0८.२0२३ | रुपये ४,९२,७९0.२५/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** ग्रामपंचायत मिलकट क्रमांक १६१ असलेल्या मालमत्तेचा संपूर्ण तुकडा आणि पार्सल, एकूण क्षेत्रफळ ९00 चौरस फूट, कवठेच्या हद्दीत स्थित, उपविभागः उत्तर सोलापूर, विभागः सोलापूर, महाराष्ट्र-४१३00२, आणि सीमाः पूर्वः रस्ता पश्चिमः रस्ता उत्तरः श्रीमंताबाई श्रीमंत राठोड दक्षिणः रस्ता | | | | | |

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६0 दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कार्यवाही सुरू करण्यास भाग पाडले जाईल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**दिनांक : १२/१२/२०२५**
**ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र**

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### तायक्वांदोपटू रुपा बायर विश्व क्रमवारीत आठवी


**नवी दिल्ली :** आशियाई कांस्यपदक विजेती भारतीय तायक्वांदोपटू रूपा बायर ही नवीनतम जागतिक क्रमवारीत आठव्या क्रमांकावर पोहोचणारी भारताची पहिली तायक्वांदो खेळाडू ठरली आहे.



तिने आपल्या मागील सर्वोत्तम स्थानापेक्षा एक पायरीवर झेप घेतली आहे. अरुणाचल प्रदेशच्या २४ वर्षीय रुपा बायरने २९ ते ३० नोव्हेंबर दरम्यान ऑस्ट्रियातील इन्सब्रुक येथे झालेल्या जागतिक तायक्वांदो प्रेसिडेंट चषक युरोप स्पर्धेत पूमसे प्रकारात कांस्यपदक जिंकले होते. पूमसे हा तायक्वांदोचा एक गैर-लढाऊ प्रकार आहे, यात स्पर्धक जिम्नॅस्टिक्सच्या दिनचर्येप्रमाणे हालचालींचा एक नमुना सादर करतात. बायरने ऑगस्टमध्ये ऑस्ट्रेलिया ओपन तायक्वांदो स्पर्धेतही कांस्यपदक जिंकले होते. पूमसे हा सध्या ऑलिम्पिक नसलेल्या श्रेणीतील प्रकार आहे, परंतु त्याचा आशियाई क्रीडा स्पर्धेत समावेश आहे. मुंबईतील इंडो कोरियन तायक्वांदो अकादमीमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या बायरचा एप्रिलमध्ये केंद्रीय क्रीडा मंत्रालयाच्या टार्गेट एशियन गेम्स ग्रुपमध्ये समावेश करण्यात आला होता. ती सर्व श्रेणींमध्ये जागतिक क्रमवारीत पहिल्या १०० मध्ये स्थान मिळवणारी एकमेव भारतीय आहे.

### १६ वर्षीय मार्ली सॅल्मनचे चॅम्पियन्स लीगमध्ये पदार्पण

**लंडन :** क्लब ब्रुग विरुद्ध आर्सेनलच्या ३-० विजयात उशिरा बदली खेळाडू म्हणून



मैदानात उतरलेल्या मार्ली सॅल्मनने चॅम्पियन्स लीगमध्ये प्रथमच खेळणारा सहावा सर्वात तरुण खेळाडू होण्याचा मान मिळवला. सॅल्मन १६ वर्षे, १०३ दिवसांचा आहे आणि जान ब्रेडलस्टेडियन येथे तो बेन व्हाईटच्या जागी मैदानात उतरला. कोणत्या तरी टप्प्यावर आम्हाला मार्ली सॅल्मनचा वापर करावाच लागणार होता, याची आम्हाला कल्पना होती व ती वेळ आली. तो खूप तरुण आहे, अजून १६ वर्षांचा आहे, आणि तो चॅम्पियन्स लीगमध्ये खेळत आहे, असे व्यवस्थापक मिकेल आर्टेटा म्हणाले. पण सॅल्मन हा या हंगामात आर्सेनलने मैदानात उतरवलेला सर्वात तरुण खेळाडू नाही. हा मान मॅक्स डोमनला जातो, जो गत महिन्यात स्लाव्हिया प्रागविरुद्ध उत्तरार्धात बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरला तेव्हा १५ वर्षे, ३०८ दिवसांचा होता.

### हरमनप्रीत, युवराज सिंगच्या नावाच्या स्टॅण्डचे उद्घाटन

**मुल्लानपूर :** भारत महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर आणि माजी पुरुष अष्टपैलू खेळाडू युवराज सिंग यांच्या नावाच्या स्टॅण्डचे उद्घाटन गुरुवारी महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या पुरुष टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यापूर्वी करण्यात आले. पंजाब क्रिकेट संघटनेचे (पीसीए) प्रभारी सचिव सिद्धांत शर्मा यांनी यापूर्वी सांगितले होते की, हरमनप्रीत आणि युवराज यांना त्यांच्या नावावर स्टॅण्ड्स देऊन सन्मानित केले जाईल व हे दोघेही या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.या उद्घाटन सोहळ्यात पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान आणि पीसीएचे अध्यक्ष अमरजित मेहता तसेच बीसीसीआयचे अध्यक्ष मिथुन मन्हास आणि पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया हे देखील उपस्थित होते. गत महिन्यात हरमनप्रीतने नवी मुंबईतील डी.वाय. पाटील स्टेडियमवर एकदिवसीय विश्वचषक विजेतेपद पटकावून महिला क्रिकेटमध्ये भारताला पहिली वरिष्ठ आयसीसी ट्रॉफी मिळवून देऊन इतिहास घडविला. दरम्यान, युवराजने भारताच्या दोन विश्वचषक विजयांमध्ये-२००७ मधील पहिला टी-२० विश्वचषक आणि २०११ मधील एकदिवसीय विश्वचषकांत महत्त्वाची भूमिका बजावली होती.

### हॉकी विश्वचषकासाठी पात्रता सामने हैदराबादमध्ये होणार

**लॉसने :** २०२६ च्या एफआयएच हॉकी विश्वचषकासाठी पुरुष आणि महिलांच्या पात्रता फेरीचे सामने आयोजित करण्यासाठी भारतातील हैदराबाद, चिलीमधील सॅण्टियागो व इजिप्तमधील इस्मालिया या शहरांची निवड करण्यात आली आहे, अशी आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने (एफआयएच) गुरुवारी पुष्टी केली. सॅण्टियागो येथे पुरुष आणि महिला दोन्ही स्पर्धांचे आयोजन केले जाईल, तर हैदराबादमध्ये केवळ महिलांची स्पर्धा होईल आणि इस्मालियामध्ये पुरुषांची स्पर्धा आयोजित केली जाईल. या तिन्ही स्पर्धा पुढील वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये खेळल्या जातील. ही पात्रता फेरी पुढील वर्षीच्या एफआयएच हॉकी विश्वचषकासाठी पात्र ठरण्याचा अंतिम टप्पा आहे, जो बेल्जियम आणि नेदरलॅण्डमध्ये (१५ ते ३० ऑगस्ट २०२६) आयोजित केला जाईल. या स्पर्धांमधून प्रत्येक गटातील सात संघ पात्र ठरतील, ज्या पुढील वर्षीच्या एफआयएच कॅलेंडरमधील प्रमुख स्पर्धांपैकी एक असतील. प्रत्येक स्पर्धेत पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर येणारे संघ पुढील वर्षीच्या एफआयएचच्या या प्रमुख स्पर्धेत आपले स्थान निश्चित करतील.

# आजपासून आशिया चषक १९ वर्षांखालील क्रिकेट





आयुष म्हात्रे


यायीन किरण राय

◆ **दुबई, ११ डिसेंबर**

येथे शुक्रवारपासून एसीसी आशिया चषक १९ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. शुक्रवारी अ गटात संयुक्त अरब अमिरात आणि भारत यांच्यादरम्यान सलामीचा सामना, तर मलेशिया आणि पाकिस्तान यांच्यादरम्यान दुसरा साखळी सामना खेळला जाणार आहे. ही स्पर्धा पुढील वर्षीच्या सुरुवातीला होणाऱ्या विश्वचषकाची रंगीत तालीम मानली जात आहे.

भारताच्या १९ वर्षांखालील आशिया चषक मोहिमेचे नेतृत्व फलंदाजीतील सनसनाटी खेळाडू वैभव सूर्यवंशी व आयुष म्हात्रे करणार आहेत. धडाकेबाज मुंबई व सीएसकेचा सलामीवीर म्हात्रेच्या सक्षम नेतृत्वाखाली भारतीय १९ वर्षांखालील संघ शुक्रवारी यूएईविरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करणार आहे.

**भारत-पाकिस्तान खेळाडूंच्या हस्तांदोलनाच्या मुद्द्यावर लक्ष**

या स्पर्धेत भारत आणि पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तान यांच्यादरम्यान रविवारी सामना खेळला जाणार आहे. बीसीसीआय भारतीय क्रिकेटपटूंना त्यांच्या पाकिस्तानी समकक्षांशी हस्तांदोलन करण्याची परवानगी देते की नाही, यावर तितकेच लक्ष असेल. या कृतीला कनिष्ठ स्तरावर खिलाडूवृत्तीचे सौजन्य राखणे असे मानले जाईल.

पुरुषांच्या आशिया चषकामध्ये, त्यानंतर महिलांच्या एकदिवसीय विश्वचषक आणि रायझिंग स्टार्स आशिया चषक टी-२० स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी भारतीय लष्कर व पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडितांशी एकता दर्शवण्यासाठी पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन करण्यास नकार दिला होता.

तथापि, जेव्हा १९ वर्षांखालील क्रिकेटपटूंचा प्रश्न येतो, तेव्हा आयसीसीलाही राजकारण यापासून दूर ठेवावे व खिलाडूवृत्तीच्या सामान्य नियमांचे पालन केले जावे, असे वाटते.मुलांना काहीही सांगितले गेले नाही, पण अर्थातच, बीसीसीआयने त्यांचे व्यवस्थापक आनंद दातार यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. आता जर भारतीय मुलांनी पाकिस्तान संघाशी हस्तांदोलन केले नाही, तर सामनाधिकाऱ्यांना आगाऊ माहिती द्यावी लागेल.

कनिष्ठ क्रिकेटच्या बाबतीत राजकारण पुढे यावे असे आयसीसीला वाटत नाही. त्यामुळे ही बाब वाईट प्रतिमा व जनभावना या दोन्हीशी संबंधित आहे, असे बीसीसीआयच्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले.

भारत व पाकिस्तान गट अ मधून अव्वल दोन संघ म्हणून उपांत्य फेरीत पोहोचण्याची शक्यता जवळपास निश्चित आहे. भारत आणि पाकिस्तानशिवाय इतर दोन संघ मलेशिया आणि यूएई आहेत, आणि त्यांना वन-डे क्रिकेटचा फारसा अनुभव नाही.

सूर्यवंशी आणि कर्णधार म्हात्रे दोघेही सध्या सुरू असलेल्या सय्यद मुश्ताक अली चषकामध्ये उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहेत. म्हात्रेने गट साखळी टप्प्यात सलग दोन शतके आणि एक अर्धशतक झळकावून महत्त्वाची भूमिका बजावली, तर सूर्यवंशी सय्यद मुश्ताक अली चषकाच्या इतिहासात शतक झळकावणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला.

भारताच्या १५ खेळाडूंच्या संघात हे दोन खेळाडू असे आहेत, ज्यांनी तिन्ही फॉरमॅटमध्ये ३० हून अधिक वरिष्ठ स्तरावरील सामने खेळले आहेत आणि एकत्रितपणे नऊ शतके झळकावली आहेत. इतर सात संघांच्या तुलनेत वरिष्ठ स्तरावरील शतकांची ही सर्वाधिक संख्या आहे. त्यामुळे भारताचा कनिष्ठ संघ या स्पर्धेत विजेतेपदाचा प्रबळ दावेदार झाला आहे.

**आशिया चषकासाठी भारतीय संघ :** आयुष म्हात्रे (कर्णधार), वैभव सूर्यवंशी, विहान मल्होत्रा (उपकर्णधार), वेदांत त्रिवेदी, अभिज्ञान कुंडू (यष्टिरक्षक), हरवंश सिंग (यष्टिरक्षक), युवराज गोहिल, कनिष्क चौहान, खिलन ए. पटेल, नमन पुष्पक, डी. दीपेश, हेनिल पटेल, किशन कुमार सिंग, उद्धव मोहन, ॲरॉन जॉर्ज. ◀(वृत्तसंस्था)

# नोंदणीकृत करारनामा वेळेत करा अन्यथा 'इओआय' प्रक्रिया रद्द करणार




### पार्क स्टेडियमबाबत महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचा महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनला इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**



येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमसंदर्भात नोंदणीकृत करारनामा वेळेत करून घ्या अन्यथा इओआय प्रक्रिया रद्द करणार, असा इशारा महापालिका आयुक्त तथा पार्क स्टेडियम कमिटी अध्यक्ष डॉ. सचिन ओम्बासे यांनी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनला (एमसीए) पत्राद्वारे दिला आहे.

पार्क स्टेडियमच्या देखभालीबाबत चर्चा स्टेडिअम कमिटीची २९ मे २०२५ रोजी बैठक घेण्यात आली होती.या बैठकीमध्ये स्टेडिअमसाठी प्रतिवर्ष देखभाल व दुरुस्तीसाठी ७० लाख ५६ हजार ७५६ रुपये व वीज देयकापोटी ११ लाख प्रतिवर्ष इतका खर्च होतो. या क्रीडा संकुलावर प्रति वर्ष इतका खर्च करणे आर्थिकदृष्ट्या सोयीचे नसल्याने महापालिकेच्या भूमी व मालमत्ता विभागाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमनुसार हे स्टेडियम भाडे करारावर देण्याबाबत इच्छुक संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले होते. याबाबत 'इओआय' प्रक्रिया राबवण्यास आयुक्त यांनी दि.३ जून २०२५ रोजी मान्यता दिली होती.

हे स्टेडियम करारावर घेण्यास महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने तयारी दर्शवली होती. त्यानुसार जे संकुल दि.९ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन यांना ३० वर्षाकरिता हस्तांतरित करण्याबाबत प्रशासक ठराव दि.२५ जून रोजी पारित करण्यात आला होता. यासंदर्भात अनामत रक्कम म्हणून २५ हजार रुपये इतकी भरण्याबाबत महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनला ३ जुलै रोजी महापालिकेने पत्र दिले. दि.२८ ऑगस्ट रोजी स्टेडिअमचा ताबा देण्याकामी व भाडेपट्टा करार करण्याकामी मुद्रांक शुल्क हे अंदाजे ३.५० कोटी रुपये लागणार असल्याने त्यामध्ये सवलत मिळण्याबाबत असोसिएशनने पत्र दिले होते. यानंतर स्टेडिअम देखभालबाबत प्रथमतः तात्पुरत्या स्वरुपात दि.४ सप्टेंबर रोजी करारनामा करुन स्टेडियमचाताबा एमसीएला देण्यात आले होता. तसेच मुद्रांक शुल्क माफीबाबत मार्गदर्शन होण्यासाठी प्रधान सचिव, महसुल व वन विभाग यांना दि.९ सप्टेंबर रोजी पत्र देण्यात आले होते. दरम्यान शासनाचे मुद्रांक शुल्क माफीबाबत मार्गदर्शन प्राप्त न झाल्याने महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन यांना क्रीडा संकुलाबाबत तात्काळसह जिल्हा निबंधक कार्यालयमार्फत नोंदणीकृत करारनामा करुन घेण्याबाबत व वेळेत नोंदणीकृत करार न केल्यास इओआय प्रक्रिया रद्द करण्यात येईल, असे पत्र देण्यात आले आहे, असे महापालिका आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

### पार्क स्टेडियम देताना महापालिका आयुक्तांकडून घाई : अनंत जाधव

पार्क स्टेडियम हे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनला (एमसीए) देताना महापालिका आयुक्तांनी घाई केली आहे. महापालिकेची शंभर कोटींची वास्तू देताना केवळ पाचशे रुपयांच्या बॉण्डवर करार कशाच्या आधारे केला. ही नोटरी बेकायदेशीर आहे. यात तीन कोटीचा महसूल बुडाला असल्याचा आरोप भाजपचे माजी नगरसेवक अनंत जाधव यांनी केला आहे. सन २०२१ मध्ये सोलापूर महापालिकेचे पार्क स्टेडियम स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत नूतनीकरण करण्यात आले. दरम्यान, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आ. रोहित पवार यांच्या प्रस्तावास मान्यता देण्याच्या उद्देशातूनच नियम व अटी प्रस्तावित केल्या. यात महापालिका आयुक्तांकडून घाई झाली.

# क्रीडा कार्यालयाच्या वतीने आजपासून क्रीडा सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने १२ ते १८ डिसेंबर या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे

तरी जिल्ह्यातील खेळाडूंनी या स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

**कार्यक्रमाचा तपशील : ११ डिसेंबर :** दु. ४ वाजता अण्णप्पा काडादी प्रशाला, भवानी पेठ येथे उद्घाटन कार्यक्रम (संपर्क: नदिम शेख - ९४२२६५१३३७).**१२ डिसेंबर :** दु. ४ वाजता जिल्हा क्रिडा संकूल कुमठा नाका आर्चरी (संपर्क : दिपक चिकणे- ८१४९००१७१८), **१३ डिसेंबर :** दुपारी ४ वाजता जिल्हा क्रीडा संकूल कुमठा नाका स्केटींग (संपर्क : सागर राठोड -९९२१७१२१२७), **१४ डिसेंबर :** सायं. ५ वाजता श्रीकृष्ण कुस्ती केंद्र, डोणगाव रोड, कुस्ती (संपर्क :भरत मेकाले - ९८८११४५४७४), **१५ डिसेंबर :** स. ११ वाजता स्वामी विवेकानंद प्रशाला, एम आयडीसी व्हॉलीबॉल (संपर्क : खंडेराव शिंदे - ९६७३४७१९२०), **१६ डिसेंबर :** स. ११ वाजता स्वामी विवेकानंद प्रशाला, जुळे सोलापूर कबड्डी (श्रीकृष्ण कोळी - ९६५७७५२१६९), **१७ डिसेंबर :** स. ११ वाजता स्वामी विवेकानंद प्रशाला, जुळे सोलापूर खो-खो (श्रीकृष्ण कोळी - ९६५७७५२१६९), **१८ डिसेंबर :** दु. ४ वाजता जिल्हा क्रिडा संकुल, कुमठा नाका, क्रीडा सप्ताह समारोप (संपर्क नदीम शेख- ९४२२६५१३३७).

# मुंबईत किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा २५ डिसेंबरपासून

**मुंबई, दि. ११ डिसेंबर-**

महाराष्ट्रातील उदयोन्मुख खो-खो प्रतिभांना राष्ट्रीय मंचाची वाट खुली करणारी ३९ वी राज्य किशोर-किशोरी अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा यंदा मुंबईत रंगणार आहे. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने, तसेच मुंबई खो-खो संघटना आणि श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर यांच्या संयुक्त विद्यमाने ही महत्त्वपूर्ण स्पर्धा २५ ते २८ डिसेंबर दरम्यान मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ, सहकारनगर, वडाळा येथे उत्साहाच्या वातावरणात पार पडणार आहे, अशी माहिती असोसिएशनचे सरचिटणीस डॉ. चंद्रजित जाधव यांनी दिली.

श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर व मुंबई खो-खो संघटनेचे अध्यक्ष ॲड. अरुण देशमुख म्हणाले की, ''श्री समर्थ व्यायाम मंदिरच्या शतकोत्तर वाटचालीत हा क्रीडोत्सव आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. नुकत्याच पूर्ण झालेल्या १०० वर्षांच्या वारशाला सन्मान देत युवकांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, स्पर्धात्मकता आणि भारतीय खेळांची परंपरा जिवंत ठेवण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली आहे.

या राज्य अजिंक्यपद स्पर्धेतून हरियाना येथे होणाऱ्या ३५व्या राष्ट्रीय किशोर-किशोरी अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ निवडला जाणार असल्याने राज्यभरातील जिल्ह्यांतून तरुण खेळाडूंच्या तयारीला चांगलीच धावपळ सुरू झाली आहे. १४ वर्षांखालील (५ फेब्रुवारी २०१२ किंवा त्यानंतर जन्मलेले) खेळाडूंची पात्रता निश्चित करण्यात आली असून, सहभागाची नोंदणी २२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत ई-मेलद्वारे करावी लागणार आहे. खेळाडूंची २४ डिसेंबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत उपस्थिती अनिवार्य असेल. फक्त असोसिएशनशी संलग्न जिल्याचे खेळाडू या स्पर्धेत सहभागी होऊ शकतील. मुंबईत होणारी ही स्पर्धा राज्यातील तरुण खो-खोपटूंसाठी सुवर्णसंधी ठरणार असून, ''राष्ट्रीय पातळीवर चमकण्यासाठी ही स्पर्धा निर्णायक पाऊल ठरेल,'' असे डॉ. जाधव म्हणाले.

# वाडीकुरोली व शेवते संघास विजेतेपद

### किशोर व किशोरी जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

पंढरपूर तालुक्यातील शेवतेचे आदर्श क्लब व वाडीकुरोलीच्या कल्याणराव काळे स्पोर्टस् क्लबने अनुक्रमे किशोर व किशोरी गटाच्या जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

वीट (ता. करमाळा) येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर झालेल्या किशोरी गटाच्या अंतिम सामन्यात वाडीकुरोलीच्या कल्याणराव काळे स्पोर्टस् क्लबने न्यू सोलापूर क्लबचा १४-६ असा एक डाव राखून ८ गुणांनी दणदणीत विजय मिळविला. मध्यंतरासच त्यांनी १४-३ अशी निर्णायक आघाडी घेतली होती. किशोर गटात शेवतेच्या आदर्श क्लबने डोणजच्या (ता.मंगळवेढा) ए. एम. स्पोर्टस् क्लबला १७-११ असे ६ गुणांनी हरविले. मध्यंतराची ८-५ अशी तीन गुणांची आघाडीच त्यांना विजय मिळवून दिली. तृतीय स्थानासाठी झालेल्या लघुत्तम आक्रमणाच्या सामन्यात



किशोरी गटात अजनाळेने येथील समृद्धी स्पोर्टस् क्लबचा ४ सेकंदानी मात केली. किशोर गटात खंडोबाची वाडी संघाने दिनबंधू मंद्रूपवर ३ सेकदांनी नमविले.

सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशन, श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय वीट व न्यू सोलापूर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजिली होती.स्पर्धेचे उद्घाटन श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय विटच्या संस्थेचे सचिव देविदास ढेरे यांच्या हस्ते झाले.

यावेळी मुख्याध्यापक श्री. कोळेकर व पर्यवेक्षक श्री बर्डे, माजी क्रीडा शिक्षक एस एस ओहोळ, संस्थेचे सदस्य राष्ट्रीय खो खो खेळाडू डॉ. राजेश बर्डे, वीटचे सरपंच महेश गणगे, उपसरपंच हेमंत आवटे, जि. प.चे मुख्याध्यापक घाडगे, केंद्रप्रमुख चंद्रकांत चोरमले, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड, खजिनदार श्रीरंग बनसोडे, सहसचिव मोहन रजपूत, पंच मंडळ सचिव गोकूळ कांबळे, तांत्रिक समिती सचिव शिवशंकर राठोड, सदस्य सुरेश खुर्द भोसले, गुलाम मुजावर, पुंडलिक कलखांबकर, आनंद जगताप आदी उपस्थित होते.

# दुहेरीत तामिळनाडूच्या लक्ष्मी अरुणकुमार, जेनेफर चाको विजेते

### एमएसएलटीए एआयटीए महिलांच्या राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस स्पर्धा : लक्ष्मीला दुहेरी मुकुटाची संधी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, ११ डिसेंबर -**

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने (एसडीएलटीए) यांच्या वतीने आयोजित व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना पुरस्कृत व अखिल भारतीय लॉन टेनिस संघटनेच्या अधिपत्याखाली महिलांच्या १ लाख बक्षीस रकमेच्या राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस (एकेरी व दुहेरी) स्पर्धेत एकेरीत तामिळनाडूच्या लक्ष्मी अरुणकुमार हिने दुहेरी गटातील विजेतेपदाबरोबरच एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश करत दुहेरी मुकुटाकडे वाटचाल केली आहे.

जिल्हा क्रीडा संकुल येथील एम.एस.एल.टी.ए टेनिस सेंटरच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत एकेरीत उपांत्य फेरीत पहिल्या सामन्यात आठव्या मानांकित तामिळनाडूच्या लक्ष्मी अरुणकुमारने आपली राज्य सहकारी अंजली मेकाचा ६-२, ६-१ असा सहज पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

दुसऱ्या उपांत्य फेरीच्या लढतीत सातव्या मानांकित आंध्रप्रदेशच्या रेश्मा छल्लारापूने अव्वल मानांकित तेलंगणाच्या हसिनी दावुनाबोइनाचा ६-३, ६-२ असा सरळ सेटमध्ये पराभव करून अंतिम फेरी गाठली.

दुहेरीत अंतिम फेरीत तमिळनाडूच्या जेनेफर चाको व लक्ष्मी अरुणकुमार या जोडीने अव्वल मानांकित महाराष्ट्राच्या श्रुती नानजकर व तेलंगणाच्या थानिया गोगुलामंदा यांचा १-६, ७-५, १०-४ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

स्पर्धेतील दुहेरी गटातील विजेत्या जोडीला करंडक व रोख रकमेची पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण एमएसएलटीए सह सचिव व स्पर्धा संचालक राजीव देसाई यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धा निरीक्षक प्रवीण झिटे आदी मान्यवर उपस्थित होते.

**उपांत्य फेरी निकाल : दुहेरी:** श्रुती नानजकर (१) (महाराष्ट्र)/ थानिया गोगुलामंदा (तेलंगणा) वि.वि.काव्या देशमुख / भक्ती ताजणे (महाराष्ट्र) ६-३, ६-२. जेनेफर चाको / लक्ष्मी अरुणकुमार (तामिळनाडू) वि. वि. अंजली मेका (तेलंगणा)/ श्रीनिथी पाटोजू(तेलंगणा) ६-२, ६-०.



सोलापूर : दुहेरीतील विजेत्या महिला खेळाडूंना चषक प्रदान करताना महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशनचे संयुक्त मानद सचिव राजीव देसाई करंडक प्रदान करताना



# ज.रा. चंडक प्रशालेचे लिगाडे बंधू सुवर्ण व रौप्यचे मानकरी

### शालेय राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

शालेय राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत येथील ज.रा. चंडक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या संकेत लिगाडेने सुवर्ण तर रितेश लिगाडेने रौप्य पदक पटकाविले. दिल्ली येथील त्यागराज इंडोर स्टेडियम येथे झालेल्या या स्पर्धेत संकेतने १ मीटरस्प्रिंग बोर्डमध्ये सुवर्ण तर ३ मीटर स्प्रिंग बोर्डमध्ये रौप्य पटकाविले. रितेशने हायबोर्ड डायव्हिंगमध्ये रौप्य संपादिले. यशस्वी खेळाडूंना संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पाताई ठोकळ, मुख्याध्यापक मोहनराव घोडके, क्रीडाशिक्षक दशरथ गुरव, प्राध्यापिका नफिसा शेख यांनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### जिल्हा परिषदेतील लेखा अधिकारी वर्ग एक पदावर हरेश म्हेत्रस यांना पदोन्नती



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषद सोलापूर येथील सहायक लेखाधिकारी हरेश तु. म्हेत्रस यांची लेखा अधिकारी वर्ग १ या पदावर पदोन्नतीने जिल्हा परिषद सोलापूर येथेच पदस्थापना दिली आहे. हरेश म्हेत्रस यांनी यापूर्वी आरोग्य विभाग, कृषी विभाग, अर्थ विभाग, ऑडिट विभाग व वेतन पडताळणी या शाखेत आपला कामातून विशेष कार्याचा ठसा उमटवलेला आहे. नुकतेच त्यांना यावर्षीचा महाराष्ट्र न्यूज चॅनलने आयकॉन ऑफ महाराष्ट्र सन २०२५ या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशाबद्दल जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. समाजातील सर्व स्तरातून हरेश म्हेत्रस यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेच्या पर्यवेक्षकपदी योगेश कबाडे



**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि ११ डिसेंबर**

येथील ऐतिहासिक मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेच्या पर्यवेक्षकपदी ज्येष्ठ शिक्षक वाय. पी. कबाडे यांची दि. ८ डिसेंबर २०२५ पासून प्रशालेत पदोन्नती झाली. प्रशालेचे पर्यवेक्षक आर. एस. पडळकर यांची पदोन्नतीने मुख्याध्यापकपदी निवड झाल्याने पर्यवेक्षक पद रिक्त झाले होते. त्यावर वाय. पी. कबाडे यांची पदोन्नतीने नियुक्ती झाली.

त्यांचा सत्कार व स्वागत मुखाध्यापक आर.एस. पडवळकर यांनी केला. यावेळी मुखाध्यापक आर.एस. पडवळकर म्हणाले, मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेला उज्वल परंपरा आहे. त्याला साजेशे विध्यार्थी हिताचे काम आपल्याकडून घडावे ही शुभेच्छा. यावेळी व्यासपीठावर बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त विचारक उत्तरेश्वर जानराव, गायक सिद्धार्थ भडकुबे, ज्येष्ठ शिक्षक एस. व्ही.गोडसे, ए. बी. शिंदे, आर.एम.इंगळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख जे.एस.बगले, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांचा हस्ते करण्यात आले. त्यांच्या या निवडीबद्दल मराठा मंदिर विद्यावर्धिनी संस्थेचे अध्यक्ष योगेश पवार व पदाधिकारी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले (निमंत्रित सदस्य शालेय समिती), निमंत्रित शालेय समिती सदस्य एस .एन. फडतरे,बाबासाहेब निंबाळकर, माजी मुख्याध्यापिका प्रियदर्शिनी रावराणे,, माजी मुख्याध्यापिका प्रज्ञा दळी यानी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन एस. बी.पवार यांनी केले तर आभार एम.एस.भोसले यांनी मानले. यावेळी सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

### पत्रकार सुरक्षा समिती पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षपदी प्रमोद भैस यांची फेरनिवड



**पिलीव, दि.११डिसेंबर-**

राज्यातील पत्रकारांच्या विविध विषयावर पत्रकार सुरक्षा समिती आक्रमक व प्रभावीपणे काम करत असून पत्रकार सुरक्षा समितीच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष पदी युवा पत्रकार प्रमोद भैस यांची फेर निवड केली असून ६ जानेवारी (पत्रकार दिनी ) त्यांचा ओळख पत्र नियुक्ती पत्र शाल व पुष्पगुछ देऊन सत्कार करणार असल्याची माहिती पत्रकार सुरक्षा समितीचे प्रदेश अध्यक्ष यशवंत पवार कार्यकारी प्रदेश अध्यक्ष रामचंद्र सरवदे ,पश्चिम महाराष्ट्र संघटक मिर्झा गालिब मुजावर ,पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष कलीम शेख जिल्हा अध्यक्ष राम हुंडारे शहर अध्यक्ष आन्सर तांबोळी यांनी दिली आहे.

माळशिरस तालुक्यातील तळागाळातील वंचित पीडित अन्यायग्रस्त अत्याचार ग्रस्त नागरिकांचे प्रश्न प्रशासन दरबारात त्यांना न्याय देण्याची भूमिका पार पाडत आहेत. युवा पत्रकार प्रमोद भैस यांनी पत्रकार सुरक्षा समितीचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष पदाची जबाबदारी अतिशय चांगल्या रीतीने जबाबदारी पार पाडली आहे पत्रकार सुरक्षा समितीच्या आंदोलन उपोषण निवेदनात त्यांनी पुढाकार घेतला असून त्यांच्या या कार्याची दखल घेत पत्रकार सुरक्षा समितीने या वर्षी देखील युवा पत्रकार प्रमोद भैस यांची पत्रकार सुरक्षा समिती च्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष पदी फेर निवड करण्यात आली असून त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे..

# ओडिशात हरवलेल्या बार्शीच्या आजी परतल्या स्वगृही!

**प्रशासनाच्या संवेदनशीलतेने मानवतेवरचा विश्वास दृढ**

**झारसगुडाचे जिल्हाधिकारी, सांगली झेडपीचे सीईओ यांचा समन्वय**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

मानवी हक्क दिन प्रत्येक व्यक्तीचा सन्मान, सुरक्षितता आणि जगण्याचा अधिकार अधोरेखित करतो. याचे सकारात्मक उदाहरण म्हणजे ओडिशात हरवलेल्या बार्शीच्या आजी झारसगुडाचे जिल्हाधिकारी कुणाल चव्हाण आणि सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्यातील संवेदनशील समन्वयामुळे स्वगृही परतल्या. घरापासून, आपल्या माणसांपासून आणि परिचित जगापासून दूर अनोळखी ठिकाणी आजीचा हा एकाकी अनपेक्षित प्रवास ओडिशाहून व्हाया सांगली ते परत बार्शीपर्यंत प्रशासनाच्या सुंदर सहकार्याने परिपूर्ण झाला.

कहाणी आहे ७३ वर्षांच्या विजयाबाई रघुनाथ जाधव यांची. विजयाबाई मूळच्या बार्शीच्या. एखाद्या चित्रपटात शोभेल असे वळण आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांच्या जीवनात आले. कुर्डुवाडी येथून हरवलेल्या या आजी परिस्थितीने ओडिशा राज्यातील झारसुगुडा जिल्ह्यातील झारसगुडा येथे ढकलल्या गेल्या. मात्र, डोळ्यांमध्ये आपल्या नातलगांकडे जाण्याची आस लावून बसलेल्या या आजींचा मानवतेवरचा विश्वास प्रशासनाच्या संवेदनशीलतेने आज दृढ झाला आहे.

विजयाबाई जाधव यांचा बालविवाह झाला होता. त्यांचे पती रघुनाथ जाधव रंगकाम करत. लग्नाच्या काही वर्षानंतर त्यांच्या पतीचे निधन झाले. पदरी दोन मुले व एक मुलगी. साफसफाईची कामे करून त्यांनी मुलांना वाढवले. एका मुलाचा विवाह करून दिला. नातवंडांत रमायचे स्वप्न रंगवणाऱ्या विजयाबाई कामानिमित्त मुलीला भेटायला कुर्डुवाडीला गेल्या होत्या. विचित्र परिस्थितीने त्यांच्या गावापासून हजारो किलोमीटर दूर त्यांना ओडिशा राज्यातील झारसुगुडा जिल्ह्यातील झारसगुडा येथे पोहोचवले. कुटुंबियांनी बार्शी तालुक्यात शोधमोहीम घेतली. पण, यश आले नाही. त्यांच्या विवंचनेत कुटुंबिय हताश झाले होते. विजयाबाई सापडण्याचा आशा धूसर झाल्या.

दरम्यान, ओडिशा राज्यातील झारसुगुडा येथील रेल्वे स्थानकावर विमनस्क अवस्थेत सापडल्यानंतर तिथल्या विकाश या स्वयंसेवी संस्थेने त्यांना आपल्या कुशीत घेतले. विजयाबाई संस्थेच्या वृद्धाश्रमात गेली दोन वर्षे राहिल्या. आपले नाव आणि गावापुरती ओळख असलेली ही अशिक्षित आजी. वृद्धत्व आणि अचानक ओढवलेल्या परिस्थितीमुळे नाव वगळता अन्य अनुषंगिक ओळखही आजीच्या स्मृतीपटलाहून पुसली गेली होती. त्यामुळे तिची स्वतःची अधिक माहितीही तिला सांगता येत नव्हती. ओडिशात पोहोचल्यावर भाषेचाही मोठा अडसर होताच. अशा परिस्थितीत कुटुंबाला भेटायची आस धरून त्या प्रत्येक दिवस कंठत होत्या.

संविधान दिनी संबंधित विकाश या शासननोंदित स्वयंसेवी संस्थेला भेट देण्यासाठी तिथले जिल्हाधिकारी कुणाल चव्हाण (मूळ गाव परभणी) आले होते. योगायोगाने त्यांच्या नजरेस या मराठी भाषक आजी आल्या. चेहऱ्यावर वयाने उमटवलेल्या रेषा आणि डोळ्यांमध्ये आपल्या नातलगांकडे जाण्याची अनंत ओढ. कुणाल चव्हाण यांनी परिस्थिती जाणली. त्यांनी त्यांचे बॅचमेट असलेले सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्याशी तात्काळ संपर्क साधला. दोघांनीही आजीची तिच्या नातेवाईकांशी भेट घडवून आणण्याचा संकल्प केला. आजीचा फोटो व सद्यस्थिती सांगणारा व्हिडिओ मराठी भाषक असल्याने कुणाल चव्हाण यांनी स्वतः बनवला आणि विशाल नरवाडे यांनी पाठवला. सोशल मीडियावरून हा व्हिडीओ आजीच्या लेक वंदना वाघमारेपर्यंत पोहोचला. आई गवसल्याचा आनंदाच्या भरात तिने विशाल नरवाडे यांच्या टीमशी संपर्क साधला. विशाल नरवाडे, कुणाल चव्हाण यांच्या माध्यमातून वंदना वाघमारे व त्यांच्या आई यांच्याशी कॉन्फरन्स कॉलवरून संवाद झाल्यानंतर आजीची ओळख पटली. नातेवाईकांना भेटण्यासाठीची विजयाबाई जाधव यांची अधीरता पाहून विशाल नरवाडे यांनी स्व:खर्चाने तिच्या परतीचा प्रवास सुकर केला. थेट ट्रेन नसल्याने प्रवासातील वेळ वाचवण्यासाठी त्यांनी विकाश संस्थेचे रश्मी रंजन राऊत यांनाच तिला परत घेऊन येण्याची विनंती केली. त्यांनीही संस्थेचे प्रमुख सुशांत बेहेरा, स्मिता साहु यांच्या अनुमतीने तात्काळ होकार दिला आणि ८ डिसेंबरला परतीचा प्रवास सुरू झाला. झारसगुडा ते छत्तीसगड ते गोंदिया ते महाराष्ट्र एक्स्प्रेसने सांगली असा प्रवास मजल दरमजल करत रश्मी रंजन आणि आजीबाई आज सांगलीत पोहोचल्या. येथून त्यांना त्यांच्या कुटुंबाकडे, बार्शी येथे पाठवण्यात आले. आजी सुखरूप आहेत या भावनेने घरच्यांच्या डोळ्यांत पाणी तर आपल्या कुटुंबाकडे परतण्याच्या भावनेने आजींना हुरूप आला आहे. त्यांच्या काळजीची काजळी दूर झाली आहे.

## शेजाऱ्यांकडून कुटुंबावर हल्ला; युवकास मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.११ डिसेंबर**

बार्शीतील गाडेगाव रोड परिसरातील ४२२ भागात किरकोळ कारणावरुन शेजाऱ्यांनी एका कुटुंबातील तिघांना मारहाण केल्याची घटना दुपारी एकच्या सुमारास घडली. या प्रकरणी तय्यबुलकादरी मोहम्मदसुलेमान शेख (वय २१) यांनी बार्शी शहर पोलिसांत फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार दुपारी सुमारास फिर्यादी व त्यांचा भाऊ रिक्षाचे भाडे सोडून परतताना शेजारील इक्बाल दाऊद शेख हा मोटारसायकलवर आला आणि दोघांना विनाकारण शिवीगाळ करु लागला. त्याला कारण विचारले असता त्याने फिर्यादीला हाताने मारहाण केली.

फिर्यादी घरी परतल्यानंतर थोड्याच वेळात इक्बाल दाऊद शेख, सिकंदर दाऊद शेख, अकबर दाऊद शेख व बानु अकबर शेख हे चौघे घरासमोर आले. तुम्हाला लय माज आलाय असे म्हणत इक्बाल व सिकंदर यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. अकबर शेखने हातातील लोखंडी गजाने फिर्यादीच्या उजव्या हातावर वार करुन जखमी केले. भाऊ तय्यबुलहुसेन मध्ये पडल्याने त्यालाही उजव्या पायावर गजाने मारुन जखमी केले.

यावेळी बानु शेख हिने फिर्यादीच्या आई नुरफातीमा यांना केसाला धरुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. भांडणादरम्यान फिर्यादीचा मोबाईल व आईच्या गळ्यातील सोन्याचे मणी-मंगळसूत्र पडून हरवल्याची नोंद करण्यात आली आहे.

शेजारील अमजद काझी व तौफिक शेख यांनी भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर फिर्यादी कुटुंबाने ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.या मारहाणप्रकरणी इक्बाल दाऊद शेख, सिकंदर दाऊद शेख, अकबर दाऊद शेख व बानु अकबर शेख यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्याची मागणी फिर्यादीने केली आहे.

## माणुसकीचे नाते दृढ होण्याची गरज : प्रा.सुहास गलांडे

### पांगरेत ग्रामसुधारतर्फे जिव्हाळा मेळावा



**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.९ डिसेंबर**

विज्ञान युगाने खूप मोठी प्रगती केली पण विज्ञानाचे अपयश म्हणजे माणसातील माणुसकी कमी होत चालली आहे. आज खऱ्या अर्थाने सर्व काही असताना सुद्धा माणसातील माणूसपण हरवत चालले असल्याने, माणसातील माणुसकी जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. ते काम ग्रामसुधार समितीच्या जिव्हाळा ग्रुपच्या माध्यमातून होत आहे असे प्रतिपादन वक्ते प्रा. सुहास गलांडे यांनी केले.

पांगरे येथील लोकविकास डेअरी येथे लोकविकासचे संस्थापक दीपक आबा देशमुख यांनी आयोजित केलेल्या जिव्हाळा मेळाव्यात प्रा. गलांडे बोलत होते. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक हरिदास डांगे, सामाजिक कार्यकर्ते श्रेणिकशेठ खाटेर यांनी समिती स्थापन करण्याचे आवाहन केले प्रा.शिवाजीराव बंडगर, महेंद्र पाटील, दीपकआबा देशमुख, डॉ. सुभाष सुराणा, हरिदास डांगे, श्रेणिकशेठ खाटेर, ॲड.डॉ. बाबुराव हिरडे व प्राचार्य नागेश माने यांची सर्वसामान्यांच्या समस्या सोडवण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली. यावेळी प्रा. डॉ. संजय चौधरी, प्रा. बंडगर, डॉ. सुनिता दोशी, ॲड. सविता शिंदे, ज्येष्ठ कवी प्रकाश लावंड, प्राचार्य नागेश माने ,पंडित रोकडे तसेच अनिल माने, राजेंद्र साने, माधुरी साखरे,प्राचार्य निवृत्ती सुरवसे, राजेंद्र रणसिंग, प्रा. शहाजीराव देशमुख ,सुहास डांगे यांची यावेळी भाषणे झाली. यावेळी दिगंबर साळुंखे विठ्ठल शेळके ,संजय हांडे, ॲड. दत्तात्रय सोनवणे,नाथाजीराव शिंदे, अरुण धुमाळ, प्रतापराव बागल, भूषण लुंकड,उद्योजक दत्तात्रय पवार,संतोष घोगरे,कैलास अण्णा लबडे ,विलास लबडे नानासाहेब साळुंखे, वैभव पोळ, प्रशांत नाईकनवरे महावीर निंबाळकर ,रावसाहेब देशमुख भारत रोकडे ,भागवत पाटील ,बबन देशमुख, दीपक देशमुख ,संजय देशमुख ,अरुण शेंडगे, डॉ. विक्रम बेंद्रे विठ्ठल केकान ,तात्या कळसाईत, तानाजी देशमुख, सुधीर देशमुख, विजय देशमुख ,जालिंदर पांढरभिसे, विक्रम शहा ,तुकाराम पाटील, कल्याण मंगवडे, राजू घोडके ,अमित परदेशी, उत्तरेश्वर कोपनर ,पत्रकार दिनेश मडके,समाधान देशमुख ,गणेश पाटील, सचिन पिसाळ ,प्रवीण घोगरे , मुथा अबॅकस च्या प्रा. ज्योती मुथा, माधुरी साखरे , रेश्मा जाधव, डॉ. जाधव , सेवानिवृत्त मुख्याध्यापक दादासाहेब झिंजाडे आदीजण उपस्थित होते. सेवानिवृत्त शिक्षक लक्ष्मण लष्कर यांच्या विविध गीताने समारोप झाले. प्रास्ताविक दीपक आबा देशमुख यांनी केले. पत्रकार गजेंद्र पोळ यांनी सूत्रसंचालन केले. भूषण लुंकड यांनी आभार मानले.

## चारित्र्य निर्मिती हेच शिक्षणाचं उद्दिष्ट : प्रा.मिलिंद जोशी

### काकासाहेब सुलाखे यांची १३९ वी जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.११ डिसेंबर**

प्रत्येक मूल वेगळ्या कामासाठी घडविले असून शिक्षकांनी मुलाच्या मनाचे नेमके दार उघडायला हवे. चारित्र्य निर्मिती हेच शिक्षणाचे उद्दिष्ट तर क्षमतांचे प्रकटीकरण हे ध्येय असायला हवं, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी केले. बार्शी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष कै. भगवंत पंढरीनाथ तथा काकासाहेब सुलाखे यांच्या १३९ व्या जयंती सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. काकासाहेब सुलाखे यांच्या योगदानासोबतच शिक्षक, पालक, विद्यार्थी यांना उद्देशून बोलताना ते पुढे म्हणाले तंत्रज्ञ कितीही विकसित झाले टू जी,फोर जी, सिक्स जी आले तरी गुरुजीशिवाय पर्याय नाही. गुण म्हणजे गुणवत्ता नव्हे. नैराश्यावर मात करण्याची शक्ती विकसित करणे गरजेचे असून मळलेल्या वाटेनं जाण्याची मानसिकता बदलायला हवी. नव्या वाटा शोधणारी मुलंच काहीतरी करु शकतात हे सांगत मला माझ्या याच शाळेने घडविल्याचे गौरवोद्गार ही मिलिंद जोशी यांनी काढले.

माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण देण्याचा प्रयत्न करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे यांनी संस्थेची वाटचाल आपल्या मनोगतातून विषद केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे सचिव अनंत कवठाळे यांनी संस्थेचे रचनात्मक काम आणि जयंती सोहळ्याचे स्वरुप आपल्या विचारातून मांडले.

यावेळी व्यासपीठावर बार्शी न. पा. शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी भारत बावकर, रोटरी क्लबचे अध्यक्ष संजय हिंगमिरे, ज्येष्ठ संचालक श्रीपाद मनगोलीकर यांच्यासह संस्थेचे संचालक रा.द. इंगळे, प्रसन्न देशपांडे, सौ. अश्विनी कुलकर्णी, सौ. ज्योती दीक्षित, सुलाखे कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटरचे प्रमुख सौ.अनया कुलकर्णी, सुलाखे हायस्कूलचे मुख्याध्यापक स्वामीराव हिरोळीकर, नवीन मराठी शाळेचे मुख्याध्यापक वाघमारे, सुलाखे इंग्लिश मिडीयम स्कूलचे मुख्याध्यापक तुषार महाजन, सुलाखे इंग्लिश मिडीयम प्रि-प्रायमरी स्कूलचे मुख्याध्यापिका सौ. बेताळे, श्रीमती मंगलाताई सुलाखे शिशूविहारच्या मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा कुलकर्णी, मुख्याध्यापक माने आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते काकासाहेबांच्या पुतळ्याचे पूजन करुन करण्यात आली. सुलाखे इंग्लिश मिडीयममधील विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे संचालक व उपप्राचार्य रा. द. इंगळे यांनी, सूत्रसंचालन रामचंद्र इकारे यांनी तर आभार प्रदर्शन संस्थेच्या संचालिका अश्विनी कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या सर्वच शाखांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



## वेळापूरच्या मुलींना दुहेरी मुकुट

**वेळापूर, दि. ११ डिसेंबर-**

माळशिरस तालुका लंगडी स्पर्धेत वेळापूरच्या मुली शाळेने लहान व मोठ्या गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. वेळापूर मुलींच्या शाळेने लंगडीत सलग पाच वर्षे ही कामगिरी केली.

यशवंतनगर (ता. माळशिरस) येथे झालेल्या या स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेळापूर मुली लंगडी लहान गटाने अंतिम सामन्यात अकलूज बीट मध्ये मधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणेशगाव या संघास हरविले. लंगडी मोठ्या गटाने दहिगाव बीट मधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारुंडेने माळशिरस बीट मधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कचरेवाडी या संघास पराभूत केले.

विजेत्या मुलींना मार्गदर्शक म्हणून नितीन चव्हाण, किरण घाडगे, आसराबाई जैन, जीवन रणनवरे, प्रवीणकुमार पांगे, कविता आवटे, पांडुरंग कुलकर्णी आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले. दोन्ही संघाचे माळशिरस तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी, केंद्रप्रमुख बापूसाहेब नाईकनवरे, विठ्ठलराव काळे, बाळासाहेब लावंड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रणजित सरवदे मुख्याध्यापक युन्नूस तांबोळी यांनी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# वैरागमध्ये शिक्षण मंदिराच्या आवारात अवैध धंद्यांचे साम्राज्य

## कुलुपबंद जिल्हा परिषद शाळेची भीषण दूरवस्था

**वैराग, दि.११ डिसेंबर-**

सात-आठ वर्षांपासून बंद असलेली वैराग (ता. बार्शी) येथील जिल्हा परिषद शाळा आज केवळ एक उपेक्षित वास्तू नसून, ती प्रशासकीय अनास्था आणि निष्क्रियतेचे ज्वलंत प्रतीक बनली आहे. एकेकाळी ज्ञानदानाचे केंद्र असलेली ही इमारत आता असामाजिक तत्त्वे आणि अवैध धंद्यांसाठीचे सुरक्षित 'आश्रयस्थान' बनली आहे. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याच्या या मंदिरावर प्रशासनाच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे कुलूप लावण्यात आले आहे, ज्यामुळे स्थानिक नागरिक आणि शिक्षणप्रेमींमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे 'VIP' जागा बनली 'अवैध अड्डा'**

वैराग येथील जिल्हा परिषद शाळेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आणि वर्दळीचे आहे. या शाळेच्या अगदी समोर एस.टी. बस स्थानक आहे, जवळच वैराग रेल्वे स्टेशन आहे, आणि सोलापूर-बार्शी मुख्य महामार्ग (मेन रोड हायवे), माढा रोड या प्रमुख रस्त्यांवर ही शाळा वसलेली आहे. केवळ इतकेच नव्हे, तर पोलीस स्टेशन देखील जवळच आहे.

अशा अति-महत्त्वाच्या (VIP) ठिकाणी असलेली ही मोठी आणि चांगली शाळा गेली सात ते आठ वर्षांपासून कशाच्या आधारावर बंद ठेवण्यात आली आहे, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. परिसरातील नागरिकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असलेली ही जागा प्रशासनाच्या संपूर्ण दुर्लक्षामुळे आता अवैध कृत्यांचा आणि असामाजिक धंद्यांचा अड्डा बनली आहे.

* शाळेच्या मोकळ्या आवारात खुलेआम अवैध आणि असामाजिक कृत्ये सुरू आहेत.
* सार्वजनिक जागेचा, विशेषतः विद्यार्थ्यांसाठी असलेल्या जागेचा गैरवापर मोठ्या प्रमाणात सुरू आहे.
* प्रशासनाने, विशेषतः शिक्षण विभाग आणि पोलिसांनी, एवढ्या वर्दळीच्या ठिकाणी चाललेल्या या गंभीर गैरप्रकाराकडे पूर्णपणे डोळेझाक केली आहे.

**निष्काळजीपणा नव्हे, 'जाणिवपूर्वक दुर्लक्ष'**

गावच्या मधोमध, छत्रपती शिवाजी महाराजांच्या चौकाजवळ असलेली आणि एवढ्या वर्षांपासून बंद असलेली शाळा म्हणजे विद्यार्थ्यांचे झालेले अक्षम्य शैक्षणिक नुकसान आहे. एवढ्या मोक्याच्या ठिकाणी, सार्वजनिक वर्दळीच्या मार्गावर शाळा बंद ठेवणे आणि तिची दुरवस्था होऊ देणे, हे निव्वळ निष्काळजीपणा नसून, प्रशासकीय यंत्रणेने केलेले 'जाणिवपूर्वक दुर्लक्ष' आहे, असा थेट आरोप स्थानिक नागरिक करत आहेत.

**प्रशासनाच्या या भूमिकेमुळे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत:**

* कोणाच्या दबावाखाली किंवा हितसंबंधांमुळे ही शाळा इतकी वर्षे बंद ठेवण्यात आली आहे?
* शाळेच्या मोक्याच्या जागेवर कोणाचा डोळा आहे का?
* शाळेच्या आवारात अवैध धंदे चालवणाऱ्या असामाजिक तत्त्वांना कोणाचे 'अभय' मिळत आहे?

शिक्षणप्रेमींचा आक्रमक इशारा: तातडीने कारवाई करा! अन्यथा तीव्र आंदोलन

स्थानिक नागरिक, पालक आणि लोकप्रतिनिधी यांनी आता या गंभीर विषयावर जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) आणि शिक्षण विभागाकडे अंतिम ताकीद दिली आहे.



**मागण्या:**

* तात्काळ पुनरुज्जीवन: बंद पडलेल्या वैराग जिल्हा परिषद शाळेची इमारत तातडीने दुरुस्त करून तिला पूर्ववत कार्यान्वित करण्यात यावे.
* अवैध धंदे त्वरित बंद: शाळेच्या आवारात सुरू असलेले सर्व अवैध आणि असामाजिक कृत्ये त्वरित थांबवून, संबंधित लोकांवर गुन्हे दाखल करावेत.
* जबाबदारी निश्चित करा: या शाळेच्या दुरवस्थेसाठी आणि अवैध कृत्यांसाठी जबाबदार असणाऱ्या शिक्षण विभागाच्या आणि स्थानिक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी.

शिक्षणप्रेमी नागरिकांची तीव्र भावना आहे की, जर प्रशासनाने या ज्वलंत प्रश्नाची तातडीने आणि गांभीर्याने दखल घेतली नाही, तर लवकरच जिल्हाधिकारी कार्यालयावर किंवा जिल्हा परिषदेवर तीव्र स्वरूपाचे जन आंदोलन छेडण्यात येईल, ज्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची असेल.

# चंद्रभागा पात्राची अक्षरशः चाळण; खड्ड्यांमुळे अनेकांना गमवावा लागला जीव

## वाळू चोरी हा चंद्रभागेला जडलेला कॅन्सर नव्हे हार्ट अ‍ॅटॅक


**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर,दि.११ डिसेंबर-**

तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील चंद्रभागा नदीच्या पात्रातील वाळू चोरीची घटना दिवसागणिक वाढत आहे. त्यामुळे चंद्रभागा पात्राची अक्षरशः चाळण झाली आहे. पात्रातील वाढत्या खड्डयांमुळे अनेकांना जीव गमवावा लागला असल्याचे सांगण्यात आले. पूर्वी गाढवावरुन थोड्याफार प्रमाणात वाळू चोरी होत होती. त्यावेळी चंद्रभागेला जडलेला कॅन्सर झाल्याचे म्हटले जायचे. आता मशिन किंवा यंत्रांच्या सहाय्याने बोटीद्वारे वाळू चोरी केली जात आहे. त्यामुळे कॅन्सर नव्हे हार्ट अ‍ॅटॅक झाल्याच्या संतापजनक प्रतिक्रिया व्यक्त केले जात आहेत.

बेसुमार होत असलेल्या वाळू चोरीमुळे चंद्रभागा नदीचे सर्वात जास्त प्रदूषण होत आहे. पूर्वी गाढवाद्वारे होणारी वाळू चोरी आता चक्क यांत्रिकी बोटींच्या सहाय्याने होऊ लागली आहे. पात्रातून उपसलेली वाळू नदीच्या जवळ असलेल्या शेतातील आडोश्याला एखाद्या पर्वताप्रमाणे ढिगाऱ्या सारखी लावले जात आहे. विष्णूपद बंधाऱ्यापासून रात्रीच्या वेळी गाढवावरुन बेसुमार वाळू उपसा केला जात आहे. परंतु महसूल आणि पोलिस प्रशासनाकडून कोणताही ठोस कारवाई होत नसल्याचे दिसत आहे.

चंद्रभागेच्या पात्रातून उपसा केलेली वाळू अव्वाच्या सव्वा किंमतीने शेकडो टिपर आणि टँक्टरद्वारे विक्री करुन वाळुमाफिया मालामाल बनत आहेत. तर दुसरीकडे वाळूमाफियांशी असलेल्या महसूल प्रशासनातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अर्थपूर्ण मैत्रींमुळे खरोखर प्रामाणिकपणे काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकडे कायद्याने दिलेले अधिकार असताना देखील हातावर हात ठेवुन नुसते बघण्या पलिकडे काहीही करु शकत नाहीत आणि हीच तरी खरी या प्रशासनाची शोकांतिका असल्याचे यानिमित्ताने सांगण्यात येते.

नदीला पाणी नसताना अथवा कमी असताना होणाऱ्या बेसुमार वाळु उपश्यामुळे पात्रात एवढाले मोठे खड्डे पडलेले दिसत आहेत. धरणातून नदीमध्ये पाणी सोडल्यानंतर भाविकांना पाण्यामुळे पात्रातील या खडड्यांचा अंदाज येऊ शकत नाही. त्यामुळे पवित्र स्नानाची पर्वणी लुटत असताना अनेकांना आपले जीव देखील गमवावे लागल्याच्या घटना घडत आहेत. या वाळवंटातील वाळुचा एवढा बेसुमार उपसा चोरट्यांनी केला आहे की, आज वाळुचे अस्तित्व दिसेनासे होवून आता फक्त इथे वाळुच्या थरा खालची मातीच दिसू लागली आहे.



### फार्स म्हणून केली जाते कारवाई

पंढरपूर तालुक्यात नदीकाठावरील विविध गावांतून वाळू माफिया चक्क यांत्रिकी बोटींच्या सहाय्याने वाळुचा प्रचंड उपसा करीत आहेत. प्रशासनाकडून फार्स म्हणून कधीतरी कारवाईचा बडगा उगारला जातो. या कारवाईमध्ये दोन, चार वाळू उपसा करुन पूर्वीच मोडकळीस आलेल्या यांत्रिकी बोटी जाळण्यात आल्याचे भासविण्यात येत असते.

### या ठिकाणाहून होतेय वाळू चोरी

शहरातील विष्णूपद बंधारा, स्मशानभूमी शेजारील घाट, जुना अकलूज रस्ता, नवीन (अहिल्या) पुलाच्या परिसरातून, पाणी उपसा केंद्राच्या परिसरातून, चंद्रभागेच्या विविध घाटांवरुन, चंद्रभागा नदीचा बंधारा परिसर, रेल्वेपूल (ब्रीज) परिसरातून, पासष्ठ एकरच्या परिसरातून, शेगावदुमाला परिसर आणि तालुक्यातील नदी क्षेत्र ज्या ज्या गावांमधून जात आहे त्या पैकी बऱ्याच गावांमधून खुलेआम वाळू चोरी होत असल्याचे दिसून येते.

### शेकडो गाढवांद्वारे होते वाळू चोरी

वाळू माफियांकडून बिनदिक्कतपणे वाळू चोरी सुरु आहे. तशाच प्रकारे शहरात गाढवावरुन वाळू चोरी मोठ्या प्रमाणावर केली जाते आहे. अगदी कोप बंधारा ते विष्णूपद मंदिर या महत्वाच्या भागात गाढवावरुन वाळू चोरीचे प्रमाण जास्त दिसून येते. ही चोरी करताना शेकडो गाढवांचा उपयोग केला जातो आहे.

---

## आ. मोहिते-पाटील यांचा प्रलंबित कृषी योजनांच्या अनुदानांवर विधान परिषदेत प्रश्न

### मार्च अखेरपर्यंत प्रलंबित अनुदान देणार कृषीमंत्र्यांचे उत्तर

**नागपूर, दि. ११ डिसेंबर-**

विधान परिषदेत आज आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी राज्यातील शेतकऱ्यांना गेल्या चार वर्षांपासून विविध कृषी योजनांतील अनुदान मिळण्यात होणारा विलंब, प्रशासकीय प्रक्रियेतील दिरंगाई आणि डीबीटी वितरणातील मंदगती या गंभीर विषयाकडे शासनाचे लक्ष वेधले.



राज्यभरातून शेतकऱ्यांनी तब्बल ४८ लाख अर्ज करूनही मोठ्या प्रमाणावर अनुदान आजही प्रलंबित असल्याचे त्यांनी स्पष्टपणे निदर्शनास आणून दिले.

आपल्या प्रश्नामध्ये आमदार मोहिते-पाटील यांनी कृषी यंत्रीकरण, सूक्ष्म सिंचन, शेततळे, फलोत्पादन, तसेच मुख्यमंत्र्यांची अन्नप्रक्रिया योजना या महत्त्वाच्या योजनांतील अनुदान चार वर्षांपासून थांबले असल्याचा मुद्दा उपस्थित केला. अर्जांच्या छाननी प्रक्रियेला कालमर्यादा नसल्याने शेतकऱ्यांना प्रतीक्षा यादीत ठेवून अनुदान वितरण अत्यंत मंद गतीने होत असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.अर्ज छाननी, पात्रता पडताळणी आणि डीबीटी वितरण या सर्व टप्प्यांसाठी निश्चित कालमर्यादा ठरवण्याची मागणी केली. सध्या ४६,५८,३२० लाभार्थ्यांची निवड झाल्याचे सांगितले. अर्ज केलेले सर्व लाभार्थी निकषांनुसार पात्र नसल्याने कागदपत्रांच्या पडताळणीनंतर पात्र शेतकऱ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

---

## कुंभमेळा बोधचिन्ह स्पर्धेत सहभागासाठी राहिले फक्त दहा दिवस

- २० डिसेंबरपर्यंत प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन
- सर्वोत्कृष्ट बोधचिन्हास मिळणार ३ लाखाचे पारितोषिक
- विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.प्रवीण गेडाम यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

श्रद्धा, पावित्र्य आणि अध्यात्माचा संगम असलेला सिंहस्थ कुंभमेळा नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणार आहे. यानिमित्त नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणातर्फे बोध चिन्ह स्पर्धेचे (लोगो डिझाईन) आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभाग नोंदविण्यासाठी आता अवघे दहा दिवस राहिले आहेत. त्यामुळे या स्पर्धेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे अनुक्रमे तीन, दोन आणि एक लाख रुपयांच्या पारितोषिकांसह प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी २० डिसेंबर, २०२५ पर्यंत प्रवेशिका पाठविता येणार आहेत, असे विभागीय आयुक्त तथा नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम यांनी कळविले आहे.

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा जगातील सर्वात मोठ्या आध्यात्मिक मेळाव्यांपैकी एक आहे. तो दर बारा वर्षांनी एकदा राज्यातील नाशिक जिल्ह्यातून वाहणाऱ्या दक्षिण गंगा अर्थात गोदावरी नदीच्या काठावर भरतो. अमृत मंथनाच्या आख्यायिकेत येणारा हा कुंभमेळा श्रद्धा, पवित्रता आणि नवनिर्माणाच्या शाश्वत चक्राचे प्रतीक आहे. बारा जोतिर्लिंगांपैकी एक असलेले त्र्यंबकेश्वर, नाशिकची समृद्ध संस्कृती, मंदिरे आणि घाटांचे आध्यात्मिक आणि ऐतिहासिक प्रतिबिंब या कुंभमेळ्यात दिसते.

नाशिकमधील रामायण स्थळांची भव्यता, नाशिकचे घाट, त्र्यंबकेश्वर आणि गोदावरी नदीचा शाश्वत प्रवाह दोन्ही शहरांना एकत्र जोडतो. कुंभमेळा एक चैतन्यशील आणि जागतिकस्तरावर मान्यताप्राप्त आध्यात्मिक उत्सव म्हणून वाढत असताना २१ व्या शतकाच्या आकांक्षा प्रतिबिंबित करतो. देशाच्या परंपरेत रुजलेली एक ताजी आणि गतिमान दृश्य ओळख निर्माण करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. नवीन बोधचिन्हाची ओळख भूतकाळातील आवृत्त्यांच्या वारशावर आधारित असेल. भक्ती आणि एकतेची कालातीत भावना अशा स्वरूपात साकार करणारी पाहिजे. आधुनिक, संदर्भात्मक आणि भारत आणि जगभरातील विविध प्रेक्षकांसाठी दृश्यदृष्ट्या आकर्षक असे बोधचिन्ह असावे. एवढेच नव्हे, तर नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या संस्कृती, वारसा, स्थापत्य, विधी आणि नैसर्गिक सौंदर्यातून सहभागींना प्रेरणा मिळू शकेल. बोध चिन्ह संस्मरणीय असावे. ते सर्व व्यासपीठांवर श्रद्धा, उत्सव आणि कालातीत परंपरा व्यक्त करेल. ही रचना कुंभमेळा २०२७ साठी एक वेगळी दृश्य ओळख म्हणून काम करेल. नाशिक-त्र्यंबकेश्वरच्या आध्यात्मिक साराचे आणि भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे प्रतीक हे बोध चिन्ह असावे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी अधिक माहितीसाठी www.mygov.in qH$dm ntkmalogocompetitiongmail.com या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा, असे आवाहन कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. गेडाम यांनी केले आहे.

---



## अन्नछत्र मंडळातर्फे कुस्तीगीरांना ७७ कीटचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट : दि ११ डिसेंबर**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली आणि संकल्पनेतून तालुक्यातील सराव करण्याऱ्या गोरगरीब 'कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराकाचे कीट वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत न्यासाकडून नोव्हेंबर महिन्यातील ७७ कीटचे वाटप गुरुवारी करण्यात आले.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे न्यास संपूर्ण देशात ख्यातनाम आहे. संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या कार्यास झळाळी प्राप्त झाली आहे. अन्नछत्र मंडळात दररोज लाखो भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात.

या कीटमध्ये कुस्तीगीरांना आवश्यक तूप, बदाम, खारीक, बडीसोप, खसखस, इलायीची, धने आदि पदार्थांचे कुस्तीगरांसाठी श्रींचा प्रसाद रुपी खुराकात या जीनंसांचा समावेश आहे.

तालुक्यातील कुस्तीगीर हे सरावाकरिता कोल्हापूर, पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर आदि ठिकाणी कुस्तीचा सराव करीत आहेत. मात्र त्यांची गरज ओळखून तालुक्याच्या चांद्या पासून बांध्यापर्यंतच्या कुस्तीगरांचा एका विशेष टीमच्या माध्यमातून सर्वे करून तालुक्यातील ७७ पैलवानांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान याकामी महाराष्ट्र केसरी पै.मौला शेख बादोला, पै.महेश कुलकर्णी, सरफराज शेख, अतिश पवार यांचे सहकार्य लाभले.

मंगळवेढा येथे संपन्न झालेल्या कुस्ती स्पर्धेत अमोलराजे पैलवान ग्रुपचा पै. मशीद शेख याने गदा पटकविल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, रोहन शिर्के, गोटू माने, प्रवीण घाटगे, शहाजी यादव, नंदकुमार स्वामी, पै. विशाल ढेकळे, पै. अमोल चव्हाण, एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, शिव स्वामी, मलंग मकानदार, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, रोहित कदम, पिंटू हळ्ळूरे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.

---

## जिल्ह्यात ४३ लाख ७० हजार मे. टन ऊस गाळप तर ३३ लाख ७५ हजार क्विंटल साखरेचे उत्पादन

### समाधानकारक उताऱ्यामुळे कारखानदार खुश

### भाव जाहीर करण्यास मात्र होतेय काटकसर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. ११ डिसेंबर-**


२०२३-२४ साली दुकाळाचा फटका उसाला बसल्याने जिल्ह्यातील ३५ साखर कारखान्यात गतवर्षी (२०२४-२५) १३० लाख मे. टन पर्यंतच ऊस गाळप झाला. दरम्यान, यंदा अतिवृष्टी झाल्याने त्याचा फायदा ऊस पिकाला मोठ्या प्रमाणात होवून सध्या समाधानकारक शेतकऱ्यांना उत्पन्न निघत आहे. यामुळे एका महिन्यातच जिल्हाभरात ४३ लाख ७० हजार ३०७ मे. टन उसाचे गाळप झाले आणि याचा साखर उतारा ३३ लाख ७५ हजार ५४५ क्विंटल इतका पडल्याचीही माहिती सोलापूर येथील प्रादेशिक सहसंचालक प्रकाश आष्टेकर यांनी दिली. दरम्यान, यंदा समाधानकारक साखर उताराही निघत असला तरी काही साखर कारखानदार शेतकऱ्यांना ऊस दराबाबत बोटावर खेळवित असल्याचेही दिसून येत आहे.

१० नोव्हेंबरपासून जिल्ह्यातील जवळपास सर्वच साखर कारखान्यांची धुराडी पेटली आहेत. २०२३ सालात जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी ऊस मुबलक असल्याने १७० लाख मे. टन ऊस गाळप केला होता. तर जिल्ह्यात साखरेचा सरासरी उतारा ७.१२ टक्केच्याही वर होता. मात्र २०२३-२४ साली दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने अनेकांनी ऊस मोडून इतर पिकांना मान्यता दिली. तर काही ठिकाणी ऊस पिके पाण्याअभावी जळून गेली.

यामुळे २०२४-२५ या सालात गाळपास जवळपास २५ टक्के ऊस कमी आला होता. यामुळे त्या हंगामात १३० लाख मे. टनापर्यंतच ऊस गाळप झाले होते. त्यातच सीमावर्ती भागात साखर कारखाने लवकर सुरू होत असल्याने त्या साखर कारखान्यातही गतवर्षी आपला ऊस मोठ्या प्रमाणात गेला आहे. दरवर्षी राज्यात सर्वाधिक ऊस सोलापूर जिल्ह्यात गाळप होवून साखर उत्पन्नही मोठ्या प्रमाणात होते. यंदाही उसासाठी मुबलक पाऊस झाल्याने २०२५-२६ च्या या सिजनला सोलापूरसह महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात उसाचे उत्पन्न निघणार आहे. यंदा अतिवृष्टीने उजनी धरणासह सर्वच लहान-मोठ्या प्रकल्पात मोठा पाणीसाठा झाला आहे. या कारणामुळे चालू वर्षाच्या गळीत हंगामासाठी जिल्ह्यात मुबलक ऊस सापडणार आहे. यामुळे यंदा गतवर्षीच्या तुलनेत दीडपटापेक्षा जास्त ऊस गाळप होण्याचे संकेत मिळत आहेत.

### ऊस पिकांना ठिबकद्वारेच पाणी द्यावे

यंदा चांगला पावसाळा झाला आणि मुलबक पाणी असल्याने बहुतांश शेतकरीवर्ग मोठ्या प्रमाणात दंडाद्वारे (वाफ्यातून) मोकळे पाणी ऊस पिकास देतात. यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. यासाठी सर्वच शेतकऱ्यांनी ऊस पिकांना ठिबक सिंचनाद्वारे पाणी देण्याची गरज आहे. मुबलक पाणी असताना त्याचा वापर काटकसरीने शेतकऱ्यांनी केला तर शिल्लक पाणी उन्हाळी हंगामात वापरता येते. यासाठी आता जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कमी पाण्यात मुबलक उत्पन्न देणाऱ्या डाळिंब आणि रेशीम उत्पादनाकडेही वळावे. या उत्पादित मालालाही जगभरात चांगली बाजारपेठ मिळू लागल्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येवू लागले आहे.



---

## जिल्हा काँग्रेसकडून जिल्हा परिषद व पंचायत समिती इच्छुकांचे फॉर्म भरण्याची मुदत २० डिसेंबर

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीने सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक इच्छुक उमेदवारांचे फॉर्म भरण्याची सुरुवात गेल्या १५ दिवसापासून काँग्रेस भवन सोलापूर येथे सुरू आहे. जिल्ह्यातील व तालुक्यातील बऱ्याच जणांनी आपले जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक मागणी फॉर्म भरलेले आहेत. आतापर्यंत जवळ-जवळ ४५ जणांनी फॉर्म भरले असून इच्छुक उमेदवार फॉर्म भरण्याची अंतिम मुदत २० डिसेंबर २०२५ पर्यंत असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष प्रा.सातलिंग शटगार यांनी दिली. त्यानंतर आलेल्या फॉर्मचा विचार केला जाणार नाही. ऐनवेळी आलेल्या उमेदवारांचा अर्जाच्या मुलाखती घेतल्या जाणार नसल्याची माहिती त्यांनी त्यावेळी दिली. नगरपरिषदश निवडणूकचे निकाल लागल्यानंतर लवकरच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या इच्छुकांच्या मुलाखती सोलापूरच्या लोकप्रिय खासदार प्रणितीताई शिंदे, जिल्ह्याचे प्रभारी मोहन जोशी व जिल्हा कोअर कमिटी इच्छुकांच्या मुलाखती घेणार आहेत. त्यानंतर उमेदवार निवडले जातील. आणि यावेळी सक्षम उमेदवार, निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी दिली देशाचे नेते सोलापूरचे सुपुत्र श्री. सुशीलकुमार शिंदे साहेब, खासदार प्रणितीताई शिंदे, जिल्ह्याचे प्रभारी श्री. मोहन जोशी यांच्याकडे उमेदवार निवडीचे संपूर्ण अधिकार राहील असे त्यांनी सांगितले.

तरी जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी आपले उमेदवारी मागणी अर्ज लवकरात लवकर भरून घ्यावेत.असे अवहान सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात येत आहे.







हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ‘लोकमंगल’च्या वतीने आजपासून मोफत आरोग्य सेवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर -**

लोकमंगल परिवाराच्या शुक्रवार, दि.१२ डिसेंबर २०२५ पासून लोकमंगल संजीवनी मेडिकल या नव्या मोफत आरोग्य सेवा सुरु करण्यात येत आहे.

शुक्रवारी दुपारी ४ वाजता जुळे सोलापुरातील टाकळीकर मंगल कार्यालय येथे या सेवेचा शुभारंभ करण्यात येणार आहे, असे लोकमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष तथा या कार्यक्रमाचे निमंत्रक रोहन देशमुख यांनी सांगितले. याप्रसंगी ‘लोकमंगल’चे संस्थापक तथा आमदार सुभाष देशमुख, जिल्हा आरोग्ययाधिकारी डॉ. संतोष नवले, केंद्रीय सेवा वस्तू सेवाकर आणि सीमा शुल्कचे अधीक्षक अध्यक्ष महेश देशमुख, सिव्हील हॉस्पीटलचे अधिष्ठाता डॉ.ऋत्विक जयकर, जिल्हा शल्य चिकित्सक वर्षा डोईफोडे, सिव्हील हॉस्पीटलचे जनसंपर्क अधिकारी डॉ.अग्रजा वारेकर, प्रवचनकार डॉ.जयंत करंदीकर आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, असेही त्यांनी सांगितले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत





**एकीकडे रस्ता मोकळा, दुसरीकडे वाहतूक कोंडी :** सोलापूर शहरातील अवंती नगर ते देगाव रोड ५४ मीटर रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात आल्याचे पहिल्या दोन छायाचित्रात दिसून येत असून हा मार्ग लवकरच सोलापूरकरांच्या सेवेसाठी उपलब्ध होणार आहे. तर तिसऱ्या छायाचित्रात शहरातील मरिआई चौकात रेल्वे पुल पाडकामाचे काम सुरु असताना सोलापूर महानगरपालिकाकडून व्हॉल्व दुरुस्ती कामाला दिरंगाई होत असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याचे दिसून येत आहे.

# १५ जेसीबीसह १०० कर्मचाऱ्यांचा फौजफाटा तैनात

### भैय्या चौक रेल्वे पूलावरील डांबर, पदपथावरील दगड हलवले

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

दमाणी नगर येथील रेल्वे पूल पाडण्यासाठी सर्व तयारी झाली आहे. दिल्ली येथील एका ठेकेदारास या कामाची जबाबदारी देण्यात आली आहे. यासाठी २०० टन क्षमता असलेले तीन क्रेनसह १५ जेसीबी, १५ हून अधिक कटर, १०० हून अधिक कर्मचारी तैनात करण्यात आले आहे. सदर पूल पाडकामासाठी १२ तासांचा कालवधी लागणार आहे, असे राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून सांगण्यात आले.

पुलास तीन ते पाच फुटाच्या अंतरावर कंटेनरने कट करण्यात येणार आहे. यात जेवढे शक्य आहे तेवढे पुलाच्या वरील बाजूने मलबा उचलण्यात येणार आहे. खाली पडलेला मलबा जेसीबी आणि कर्मचाऱ्यांच्या मदतीने तातडीने हटविण्याचे नियोजन आहे. लोखंडी गर्डर मात्र क्रेनच्या बाजूने उचलून बाजूला करण्यात येणार आहे. सर्वात कठीण लोखंडी गर्डर काढण्यासाठी अधिक वेळ जाणार आहे. पुलाचे पाडकाम करताना रेल्वे रुळ व सिग्नल यंत्रणेस कोणतीही बाधा पोचणार नाही याची काळजी घेतली जाणार आहे. पुलाचा मलबा इतरत्र पडू नये यासाठी पुलाखाली फ्लाय ओव्हर उभारण्यात येणार आहे. रेल्वेसेवा सुरळीत राहण्यासाठी सिग्नल यंत्रणेची विशेष काळजी घेतली जाणार आहे. पुलाखाली असलेले रेल्वेचे उच्च दाब केबल वायरिंग तात्पुरत्या स्वरुपात काढण्यात येणार आहे.

**नऊ महिन्यांपासून नियोजन**

रेल्वे व राष्ट्रीय महामार्ग विभाग यांच्यात नऊ महिन्यांपासून पूल पाडकाम करण्याचे नियोजन सुरु आहे. सकाळी ८ वाजता रेल्वे पूल पाडण्याच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. पाडकाम करताना रेल्वेसेवा आणि शहरातील वाहतुकीवर परिणाम होणार नाही याची काळजी घेतली जाणार आहे. कमीत कमी रेल्वेगाड्या बाधित होतील यानुसार नियोजन करण्यात आले आहे, असेही सांगण्यात आले.



वाहतूक कोंडी होणार नाही असे नियोजन

## मरिआई चौक ते शेटे नगर या मार्गावर चारचाकी वाहनांना बंदी : खिराडकर

**सोलापूर :** दमाणी नगर येथील रेल्वे पूल पाडकामाच्या दृष्टीने वाहनधारकांसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करुन देण्यात आला. वाहतूक कोंडी होणार नाही असे नियोजन करण्यात आले. मरिआई चौक ते शेटे नगर मार्गावर चारचाकी वाहनांना बंदी घालण्यात आली आहे, अशी माहिती सहाय्यक पोलिस आयुक्त सुधीर खिराडकर यांनी दिली. शेटे नगरजवळील रेल्वे बोगदा रुंद आहे. त्यामुळे चारचाकी वाहने मरिआई चौक ते शेटे नगर या मार्गावरुन न जाता शेटे नगराकडून मरिआई चौकाकडे येऊ शकतात, असे नियोजन करण्यात आले आहे. ५४ मीटर रस्त्याचे काम अद्याप पूर्ण न झाल्याने मरिआई चौक ते शेटे नगर आणि मोदी बोगदा याठिकाणी वाहतूक कोंडी होत असल्याचे दिसून आले. आवश्यक अशा सहा ठिकाणी प्रत्येकी दोन सेक्टर अधिकारी नेमण्यात आले आहे. वाहतूक नियमनासाठी शेटे वस्ती येथील टी पॉइंट, शेटेनगर पुलाजवळ दोन्ही बाजूला नागोबा मंदिर रामनगरकडून वळसंगकर हॉस्पिटलमध्ये जाणारा रस्ता आणि मोदीचौकी जवळ प्रत्येक दोन वाहतूक अंमलदार नेमण्यात आले आहेत. सकाळी ९ ते रात्री ९ अशी ड्युटी त्यांना देण्यात आली आहे.

**असा आहे पर्याय :** मरिआई चौकातून जाणारी चारचाकी वाहने नागोबा मंदिरापासून मोदी चौकी मार्गे जाऊ शकतात. ५४ मीटर रस्ता खुला झाल्यावर मंगळवेढा वरुन शहरात येणारी चारचाकी वाहने त्या रस्त्यावरून सोडली जातील. सात रस्ता रेल्वे स्टेशनकडे येणाऱ्या चारचाकी वाहने मात्र मरिआई चौकातील नागोबा मंदिरापासून मोदीचौकी मार्गे पुढे जातील.

**महत्वाचे...**

### प्रा.एम.डी. वाघमारे यांना पीएचडी पदवी प्राप्त

**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

पदमशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागातील प्रा.मनोज दामोधर वाघमारे यांना नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाकडून पीएच. डी. पदवी प्राप्त झाली आहे.



उस्मानाबाद जिल्ह्यातील अनुसूचित जातीचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक अभ्यास हा त्यांचा पीएच. डी. संशोधनाचा विषय होता. लातूर जिल्ह्यातील ता.जळकोट येथील संभाजीराव केंद्रे महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय मुंडकर हे पीएच. डी. चे मार्गदर्शक होते. डॉ. वाघमारे यांच्या यशाचे पदमशली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्री. श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव श्री.दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार श्री गोवर्धन कमटम, विश्वस्त मंडळ, प्राचार्य डॉ. अशोक यक्कलदेवी, महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व कार्यालयीन कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### सांगवी येथे मतदारांची नोंद संशयास्पद असल्याचा आरोप

**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील सांगवी बुद्रुक येथे सुमारे २०० मतदारांची बीएलओ यांच्याकडून संशयास्पदरित्या नोंदी करण्यात आल्या आहेत असा आरोप करत याप्रकरणी तत्काळ चौकशी करावी अन्यथा आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा अक्कलकोट तालुका मराठा सेवा संघाचे अध्यक्ष प्रवीण घाटगे यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे. आधार कार्ड एडिट करून मतदारांच्या नोंदी करण्यात आल्या आहेत. सहा महिन्यात तब्बल २०० अशा पद्धतीने मतदार नोंद झाले आहेत. फॉर्म भरतेवेळी गावातील रहिवासी नसतानाही त्यांच्या आधार कार्ड व फोटो मागवून हे फॉर्म मोबाईलवरून भरण्यात आले आहेत. या संदर्भात जिल्हाधिकारी, तहसीलदार यांच्याकडे पुराव्यानिशी लेखी तक्रार करण्यात आली आहे. याप्रकरणी संबंधित बीएलओची तत्काळ चौकशी करावी. संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा अन्यथा येथे पाच दिवसात अक्कलकोट तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. या पत्रकार परिषदेस सतपाल भोसले, बबन गायकवाड आदी उपस्थित होते.

## ‘मी जबाबदार नागरिक होणार’ या विषयावर मंगळवारी व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट व मंडळाच्या वतीने मंगळवार, १६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता संगमेश्वर महाविद्यालय येथील बी ब्लॉक सभागृह येथे युवक व युवतींसाठी ‘मी जबाबदार नागरिक होणार‘ या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे.

सायबर व क्राइम खात्यातील माजी पोलिस उपनिरीक्षक विलास राठोड व नागेश गायकवाड हे मार्गदर्शन करणार आहेत. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांनी सोलापूर शहरातील मध्यवर्ती मंडळांना वरील प्रकारचे व्याख्यानाचे उपक्रम राबवावेत, असे आवाहन केले होते. त्याअनुषंगाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी प्राचार्य ऋतुराज बुवा यांच्या हस्ते प्रा.डॉ.भीमाशंकर बिराजदार यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

याप्रसंगी माजी आमदार शिवशरण पाटील, कुमारस्वामी प्रार्थना योग मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ, सिध्देश्वर देवस्थानचे सेक्रेटरी निळकंठप्पा कोनापुरे, पोलिस निरीक्षक नामदेव बंडगर यांच्यासह प्रशांत जोशी, विजयकुमार देशपांडे, तात्या पवार, विजय शाबादी, सुभाष चव्हाण, विश्वनाथ आमणे उपस्थित राहणार आहेत.

या व्याख्यानास युवक-युवतींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन उत्सव अध्यक्ष रविराज भोपळे, उपाध्यक्ष सुजाता म्हेत्रे, सेक्रेटरी ॲड.संदीप बेंद्रे, प्रसाद गाजरे, कार्याध्यक्ष किरण पुजारी, खजिनदार राचप्पा कटारे, कार्यक्रम प्रमुख राजेंद्र मुलगे यांनी केले आहे.

## तपोरत्न पुण्यस्मरण दिनानिमित्त नेताजी शिक्षण संस्थेच्यावतीने विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.११ डिसेंबर-**

श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य श्री तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या आठव्या पुण्यस्मरणानिमित्त संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार दि.१२ डिसेंबर रोजी रांगोळी स्पर्धा, शनिवार दि.१३ रोजी निबंध स्पर्धा, चित्रकला व रंगभरण स्पर्धा, रविवार दि.१४ रोजी वक्तृत्व व श्लोक पाठांतर स्पर्धा, सोमवार दि.१५ रोजी हस्ताक्षर स्पर्धा, मंगळवार दि.१६ रोजी प्रश्न मंजुषा स्पर्धा, बुधवार दि.१७ रोजी रक्तदान शिबीर, सायंकाळी सहा वाजता तपोरत्नं बौद्धिक व्याख्यानमालेचे उदघाटन व इंद्रजित देशमुख (कराड) हे सुजाण पालकत्व या विषयावर पहिले पुष्प गुंफणार आहेत. गुरुवार दि.१८ रोजी जितेंद्र आसोले (गोंदिया) हे माणूस म्हणून जगताना या विषयावर दुसरे पुष्प गुंफणार आहेत.शुक्रवार दि.१९ रोजी महांतेश हिरेमठ हे गुरु महात्म्य या विषयावर तिसरे व शेवटचे पुष्प कन्नड भाषेतून गुंफणार आहेत.



शनिवार दि.२० डिसेंबर रोजी सकाळी आठ वाजता अशोक चौक येथील नेताजी शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यालयात लिं. श्री तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या पादुकांचे रुद्राभिषेक व सहस्त्र बिल्वार्चन तदनंतर पादुकांचे, महास्वामीजींच्या प्रतिमेचे पुरवंतासह सवाद्य मिरवणूकीला प्रारंभ, मिरवणूक सुमारे दोन हजार भक्तगणांसह, विविध वाद्य वृंदासह, लेझीम, नृत्य, ढोल पथक अशोक चौक, आकाशवाणी रोड वरुन निलम नगर मार्गे सकाळी अकरा वाजता नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संकुलात आगमन होणार आहे. पादुकांचे महाआरती करुन मिरवणूकीची सांगता होणार आहे. त्यानंतर सर्व भाविक भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. सायंकाळी सहा वाजता विविध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान व मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे.सायंकाळी आठ वाजता राजराजेश्वरी संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा तपोरत्नं भाव भक्ती गीतांचा कार्यक्रम होणार आहे. रात्री १०.०५ वाजता तपोरत्नं आत्मज्योतीचे दिपप्रज्वलन व श्रद्धांजली समर्पण कार्यक्रम होणार आहे.

## ‘इलेक्टिव्ह मेरिट’चा महाविकास आघाडीचा फॉर्म्युला ठरणार का यशस्वी?

- **काँग्रेस, शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी शरद पवार गट, माकपा, मनसेचा समावेश**
- **वंचित बहुजन आघाडी, समाजवादी पार्टीही सोबत**
- **‘एमआयएम’ला न घेतल्याबद्दल तर्कवितर्क**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरातील महाविकास आघाडीच्या नेत्यांनी एकत्रित येत आघाडीची मोट बांधण्यास सुरुवात केली आहे. शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आला. यामध्ये आघाडीतील मित्र पक्षांच्या नेत्यांनी सर्वानुमते इलेक्टिव्ह मेरिटवर निवडणूक लढवण्याचा निर्धार केला आहे. मात्र, आघाडीचा इलेक्टिव्ह मेरिटवरचा फॉर्म्युला यशस्वी ठरणार का? असा सवाल राजकीय वर्तुळातून विचारला जात आहे

या महाआघाडीत काँग्रेस, शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षसंघटनांचा समावेश आहे. दरम्यान, वंचित बहुजन आघाडी व समाजवादी पार्टी याही पक्षांना सोबत घेतले जाणार आहे, असे सांगण्यात येत आहे. एमआयएम या पक्षाला महाविकास आघाडीत सामावून न घेतल्याबद्दल तर्कवितर्क लढविले जात आहेत. तर इकडे मुस्लिम मते ही पहिल्यापासूनच काँग्रेसची मते आहेत, असे सांगत चंद्रकांत खैरे यांनी यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. महाविकास आघाडीची वज्रमुठ केल्यानंतर या आघाडीतील नेत्यांपुढे जागा वाटपाचा पेच निर्माण होणार आहे. जरी इलेक्टिव्ह मेरिटवर जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरवला गेला असला तरी प्रत्येक प्रभागात स्टॅन्डिंग नगरसेवक दावेदार असणार आहे. मात्र येथे इच्छुकांच्या अर्जांचा देखील विचार करावा लागणार आहे. प्रत्येक प्रभागात चार सदस्य असल्याने आघाडीतील मित्र पक्षांच्या वाट्याला किती जागा येतील? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, ज्या प्रभागात आघाडीतील एका ठराविक पक्षाचे प्राबल्य असल्यास त्याच पक्षाला चारही जागा मिळणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### कमी जागा घेऊन जास्त उमेदवार निवडून आणण्याची रणनीती....



आघाडीची बैठक संपन्न झाल्यानंतर आघाडी करण्यासंबंधी घोषणा झाली आहे. यापुढील काळात बैठक घेऊन निवडणुकीची रणनीती आखली जाणार आहे. कमी जागा घेऊन जास्त उमेदवार निवडून आणण्याचा आमचा प्रयत्न असेल, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष महेश गादेकर यांनी सांगितले.

### विद्यमान नगरसेवकांना प्राधान्य...



आघाडीतील मित्र पक्षांच्या नेत्यांना घेऊन स्थानिक पातळीवर पुन्हा एकदा बैठक घेतली जाणार आहे. त्यानंतर उमेदवारी विषयी चर्चा करण्यात येईल. मात्र सत्ता आणण्याचे दृष्टीने विद्यमान नगरसेवकांना प्राधान्यक्रम देण्याचा प्रयत्न राहणार आहे, असे काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी सांगितले.

## प्रभू येशू जन्मोत्सवानिमित्त मंगळवारी ख्रिसमस फेस्टिव्हल

### संगीत, नृत्य, नाटिकासह सांस्कृतिक मेजवानी

**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

प्रभू येशू जन्मोत्सवानिमित्त युनायटेड चर्चेस ऑफ सोलापूरच्या वतीने मंगळवार, १६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० यावेळेत रंगभवन चौकातील वोरोनोको शाळा येथ ख्रिसमस फेस्टिव्हल अर्थात आनंद सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



यात संगीत, नृत्य, नाटिकासह सांस्कृतिक मेजवानी राहणार आहे. ख्रिसमस फेस्टिव्हलचे यंदाचे १६ वे वर्ष आहे, अशी माहिती रेव्हरंड सुभाष माने यांनी पत्रपरिषदेत दिली. या फेस्टिव्हलमध्ये सोलापुरातील ज्योती निकेतन संस्था, पहिली ख्रिस्ती मंडळी, हिंदुस्थानी कव्हनंट चर्च, मेथॉडिस्ट चर्च, गुड न्यूज चर्च, न्यू लाईफ फेलोशीप चर्च, पाईन ट्री चर्च, एपीफनी चर्च, रिव्हर ऑफ लाईफ चर्च, शिलोह चर्च, बिलीव्हर्स चर्च-मोहोळ, ईटीएफ संस्था, वोरोनोको शाळा, पहिली ख्रिस्ती मंडळी-नवीन उपासना मंदिर, जीजस ख्राईस्ट गॉस्पेल सोसायटी चर्च, तारकाचे प्रार्थनागृह, बैरशेबा चर्च आणि विविध शाळा, ख्रिस्ती संस्था सहभागी होणार आहेत. मेळाव्याच्या ठिकाणी धार्मिक पुस्तके, ख्रिससम डेकोरेशन, खाण्यांचे व कपड्यांचे विविध स्टॉल्स असणार आहेत. प्रभू येशू ख्रिस्ताच्या जन्मोत्सवाचा आनंद लुटण्यासाठी सोलापुरकरांनी मोठ्या संख्येने सामील व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी रेव्हरंड इम्मानुएल म्हेत्रे, सतीश गडकरी, ब्रदर सॅमसन बांभळ, पास्टर गिदोन अढागळे, निरंजन उजागरे, सालोमन सोनावणे, मनोज चांदणे, संभाजी फाळके आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी १२९४

**मागणे हे प्रभू आहे तुजपासी ।**
**परत या भोगीं आणू नको ।।**

अनेक संतांनी मागचा जन्म, सध्याचा जन्म आणि यानंतरचा जन्म या विषयावर भाष्य करून पुनर्जन्माला पुष्टी दिली आहे. आपल्यापैकी कोणी पुनर्जन्माला मानायचे नाही, असे ठरवले तरी कांही हरकत नाही. मागच्या जन्मात काय केले आणि पुढच्या जन्मात काय होईल याचा विचार पुनर्जन्म मानणाऱ्यांनी करावा. आपण किमान या जन्माचा तरी योग्य तो विचार करायला हवा. अर्थात, आजच्या अगोदर म्हणजे या क्षणापर्यंत काय चुकले, सध्या काय चुकत आहे आणि या चुकांचा भविष्यावर काय परिणाम होईल, एवढा विचार केला तरी पुरेसे आहे. चुकाही करायच्या, भोगालाही टाळायचे आणि चुकांची पुनरावृत्ती करायची हे मात्र योग्य नव्हे. ऐश आरामासाठी भगवंताला, सद्गुरुला कांही तरी मागायचे हे पण उचित नव्हे. संत सेनाजीप्रमाणे या संसारात पुन्हा अडकवून ईर्षा, द्वेष, काम, क्रोध, मत्सर आदिच्या जाळ्यात लोटू नको, मागणे हे प्रभू आहे तुजपासी । परत या भोगीं आणू नको ।।, असे मागता आले तर छानच. ज्यांना असे मागायचे नाही त्यांनी किमान झालेल्या चुकांची पुनरावृत्ती होऊ न देण्याची आणि यापुढे कसलीच चुक न होऊ देण्याची सद्बुध्दी मागायला हरकत नसावी असे आम्हास वाटते.



**सेना म्हणे देवा, भक्तांचा कैवारी ।**
**बहुतयां तारी तुझे नाम ।।**

अनेकांना मी असा आहे, तसा आहे, असे सांगण्याची सवय असते. खरे म्हणजे स्वमुखाने कीर्ती सांगणारे किंवा स्तुती गाणारे लोक मोठे नसतात. जे खरोखर मोठे आणि चांगले असतात, ते स्वतःचे मोठेपण, चांगुलपण सांगत नसतात. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणारा पंढरीचा पांडुरंग समता, बंधुता, निस्वार्थ प्रेम आणि कर्तव्याचा संगम आहे. असा अत्युत्कृष्ट गुणांचा संगम असलेला पांडुरंग स्वतःकडे सेवकपण घेऊन कोण्या एका भक्ताचे ऋण फेडतो, एखाद्या भक्ताचे शेले विणतो, कोणाकडे खुरपतो, कोणाच्या घरी पाणी भरतो तर आणखी कोणाकडे इतर कांही सेवात्मक कार्य करतो. हा पांडुरंग सेवेकरी दिसत असला तरी अत्यंत मोठा आणि चांगला आहे. याचा प्रत्यक्ष सहवास तर सोडाच पण याचे फक्त नामस्मरण केले तरी संसाराच्या मायानदीतून माणूस तरू शकतो. आतापर्यंत याच्या नामस्मरणाने अनेकजण तरले आहेत, असे सेनाजी पांडुरंगाच्या अनुषंगाने बोलतांना, सेना म्हणे देवा, भक्तांचा कैवारी । बहुतयां तारी तुझे नाम ।।, असे म्हणतात. पंढरीचा पांडुरंग हा खरोखरच केवळ नामस्मरणाचा विषय नसून तो प्रत्यक्ष अनुभवण्याचा विषय आहे. आपणाला जर त्याचा अनुभव घेता आला तर आपल्यासारखे भाग्यवंत आपणच असणार आहोत. डोळस श्रध्देमुळे जीवनातील आनंदलहरी वाढतात. जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५**
**विक्रम संवत् २०८२ । शके - १९४७**
**संवत्सर - विश्‍वावसु**
**मास - मार्गशीर्ष कृ. सप्तमी**
**ऋतु - हेमंत । नक्षत्र- उ.फाल्गुनी(२९.४९)**
**योग - प्रीति (११.११) । करण - तैतिल (२७.४२)**
**राहू काल : गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**दिनविशेष : १९४०: राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचा जन्म.**
**१९५०: प्रसिध्द अभिनेते शिवाजी गायकवाड उर्फ रजनीकांत यांचा जन्म.**
**१९११: दिल्ली ही भारताची राजधानी करण्यात आली. या आधी कोलकाता ही भारताची राजधानी होती.**
**१९७१: संस्थानिकांचे तनखे व विशेषाधिकार रद्द केले.**
**२००१: पृथ्वी या क्षेपणास्त्राची चाचणी करण्यात आली.**
**२०१६: प्रियांका चोप्रा यांना युनिसेफ सदिच्छा दूत म्हणून नेमण्यात आले.**

# जिल्ह्यात आता फक्त १६ हजार शेतकऱ्यांची ई-केवायसी पेंडिंग

**भाऊसाहेबांची ई-केवायसीसाठी धडपड | शेतकरी बांधवांतून समाधानाचे वातावरण | ६८३ कोटी ३० लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

अतिवृष्टी आणि पूर स्थितीमुळे जिल्ह्यातील बाधित ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ रूपयांची मागणी अहवालाद्वारे केली आणि यातील सर्वच रक्कम मंजूर झाली आहे. यातील ६ लाख १५ हजार ८६२ शेतकऱ्यांसाठी आजतागायत ७४८ कोटी ४० लाख ९१ हजार ९७२ रूपये मंजूर झाले असून, त्यापैकी ५ लाख ६७ हजार २७२ शेतकऱ्यांच्या खात्यावर आजतागायत ६८३ कोटी ३० लाख ८२ हजार ७० रूपये झाले जमा झाले आहेत आणि ईकेवायसीअभावी १६ हजार ०१५ शेतकऱ्यांचे १७ कोटी ८९ लाख ७२ हजार ६९१ रूपये पेंडिंग पडले आहेत.

अतिवृष्टी होऊन सव्वादोन महिने झाले तरी अजून १६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर दमडीही पडली नसल्याने त्यांना रब्बी हंगामाचे बि-बियाणे, खते घेता आली नसल्याची त्यांची खंत आहे. शासनाच्या





पोर्टलवर ही रक्कम अदा झालेली दिसत आहे मात्र केवळ ई-केवायसी, फार्मर आयडीमुळे ही रक्कम लटकली आहे. जिल्हा प्रशासनाकडून ही रक्कम अदा करण्यासाठी धडपड चालू आहे. गावनिहाय कॅम्प सुरू केले आहेत. ई-केवायसी नसली तरी आता फार्मर आयडी शेतकऱ्यांसाठी गरजेचा आहे. यामुळे जाणकार शेतकरी आपला फार्मर आयडी ई-महासेवा केंद्र आणि प्रशासनाच्या शिबिरात जावून काढू लागले आहेत. मात्र अनेक अडाणी शेतकऱ्यांना या कामात यश येत नाही. यामुळे अशाच शेतकऱ्यांचे हे पैसे बँकांत पडले आहेत.

जिल्ह्यातील १०३ महसूल मंडलात अतिवृष्टी झाली होती; २१ ते २३ सप्टेंबरपर्यंत महापुराचे मोठे संकटही ६ तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांवर ओढवले होते. राज्य सरकारने भरपाईसाठी तीन हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर करण्यात आले. शेतकऱ्यांच्या खात्यावर आजही थेट रक्कम जमा होवू लागली असून, ॲग्रीस्टॅक केलेल्या सर्वच शेतकऱ्यांना थेट मदत मिळत आहे.

ही रक्कम मिळविण्यासाठी आता ई-केवायसीचीही गरज नाही. यामुळे शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकमध्ये आपले नाव नोंदवून नुकसान भरपाई आपल्या बँक खात्यावर पाडून घ्यावी, असेही आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. या महापुरात अनेकांची शेती खरडून गेली आहे; अनेकांच्या ऊस व फळबागा वाहून गेल्या आहेत; विहिरी बुजल्या आहेत, अशा शेतकऱ्यांनाही पैसे मंजूर झाले असून, येत्या काही दिवसात पैसे मिळणार आहेत. गावोगाव शिबिरे घेवून त्या शेतकऱ्यांची ई-केवायसी, ॲग्रीस्टॅक करून घेतले जात आहे. अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे जिल्ह्यातील विविध भागात झालेल्या शेती, पायाभूत सुविधा व सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी नुकताच केंद्रीय पथकाने सोलापूर जिल्ह्यात दौरा केला आहे. म हापूर आणि अतिवृष्टीने जिल्ह्यातील १२ हजार ५० हेक्टर क्षेत्रावरील माती खरडून गेली. त्यामुळे या जमिनी कसण्यायोग्य राहिल्या नाहीत. यासाठी राज्य शासनाकडे ५७ कोटी रुपयांची मागणी केली होती; तीही मंजूर झाली आहे. अतिवृष्टीने जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी ढासळून त्यात गाळ पडला आहे. या विहिरींच्या दुरुस्तीचेही नियोजन आखण्यात येत आहे. यासाठी रोजगार हमी योजनेतून शेतकऱ्यांना मदत करण्यात येत असल्याचेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.



# व्यापाऱ्यांच्या कृती समितीने घेतली पणनमंत्री जयकुमार रावल यांची भेट

### राज्य व्यापारी कृती समितीच्या मागण्यांबाबत दाखवली सकारात्मकता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या वतीने मांडण्यात आलेल्या महाराष्ट्रातील सर्व व्यापारी संघटनांच्या मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा करण्यासाठी पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या समवेत व्यापारी कृती समितीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर येथे बैठक संपन्न झाली. बैठकीत म हाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीतर्फे मांडण्यात आलेल्या ६ विषयांवर चर्चा झाली.

बैठकीत पणन संचालकांसह पणन विभागाचे अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यांच्या समवेत देखील चर्चा झाल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कृती समितीचे सदस्य व सोलापूर भुसार आडत व्यापारी संघाचे अध्यक्ष सुरेश चिक्कळी यांनी दिली. यावेळी दि. पूना मर्चेंट्स चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया, माजी अध्यक्ष रायकुमार नहार, नवीन गोयल, फॅमचे सचिव प्रीतेश शहा, ग्रोमाचे अध्यक्ष भिमजी भानुशाली, कॅमेटेचे अध्यक्ष दिपेन अगरवाल, भुसार आडत व्यापार संघ अध्यक्ष सुरेश चिक्कळी, सांगली चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अमरसिंह देसाई व शरद शहा, दि बारामती मर्चेंट्स असो.चे अमोल शहा, निलेश दोशी व निलेश भिंगे, गोंदिया जिल्हा व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष किरण मुंदडा, अपूर्व अगरवाल, औरंगाबाद मर्चेंट्स असोसिएशनचे अध्यक्ष हरीष पवार व सचिव राकेश जैन, नाशिक किरणा घाऊक व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रफुल्ल संचेती, सुनील मुंदडा उपस्थित होते.

# करुणाशील राज्यस्तरीय पुरस्कारांचे शनिवारी वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

करुणाशील बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे मानवतेच्या दृष्टिकोनातून रुग्णसेवा करणाऱ्या १६ परिचारिका आणि अधिसेविकांना राज्य करुणाशील पुरस्कार तर दोन जणांना जीवन गौरव पुरस्कार देण्यात येणार असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष आशुतोष नाटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शनिवार, १३ डिसेंबर रोजी ४:३० वाजता शिवस्मारक सभागृहात हा कार्यक्रम शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलच्या प्रबंधक व अधिक्षिका सुश्रुषा सेवा (मुंबई) अर्चना बढे, सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ. नसीम पठाण, जी.एम. मागासवर्गीय संस्थेचे संस्थापक बाळासाहेब वाघमारे यांची प्रमुख उपस्थितीत होईल. कार्यक्रमात नर्स एज्युकेटरच्या सेवानिवृत्त प्राचार्या डॉ. सरोज उपासनी आणि डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगच्या निवृत्त प्राचार्या डॉ. स्वाती वीरेश्वर कांबळी यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मान होईल. या पत्रकार परिषदेस शशिकांत पाटील, डॉ. राजीव मोहोळकर, प्रफुल्ल सोनवणे आदी उपस्थित होते.

**यांचा होणार सन्मान**

सुमित्रा गोरे-भाकरे (धाराशिव), गायत्री म्हात्रे (रायगड), संगीता पवार दुबे, विद्या जाधव, वर्षा चौरे (पुणे), वैशाली राऊत, गोदावरी कोकाटे, जयमाला सामसे (मुंबई), मंजुषा तिवारी (नागपूर), मीना देवळ (लातूर), विजयमाला बेले (संभाजीनगर), दिलशाद उस्मान सय्यद, जया जमादार, महेश्वरी तुप्पद, सायमन डोलारे (सोलापूर),

# पाणी, स्वच्छता कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन सकारात्मकः मंत्री गुलाबराव पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

राज्यातील पाणी व स्वच्छता कर्मचारी राज्य कृती समितीच्या वतीने राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, राज्यमंत्री मेघना साकोरे यांना निवेदन देण्यात आले.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कर्मचारी यांचे प्रश्न सोडविण्यासाठी मुंबईत प्रधान सचिव यांचे अध्यक्षतेखाली बैठक होईल. कर्मचाऱ्यांचे मानधन व प्रश्न निकाली निघेपर्यंत काळ्या फिती लावून असहकार आंदोलनावर कृती समिती ठाम आहे. समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड, कार्याध्यक्ष सचिन जाधव,



उपाध्यक्ष ऋषीकेश शिलवंत, उपाध्यक्ष बंडू हिवरे, नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यातील पाणी व स्वच्छता विभागातील कर्मचारी यांनी सोमवारी हैद्राबाद हाऊस येथे प्रधान सचिव पराग जैन यांची भेट घेतली. राज्य कृती समितीची पदाधिकारी यांची बैठक रवी भवन येथे घेण्यात आली. या बैठकीत कृती समिती आंदोलनावर ठाम आहे. जो पर्यंत वेतन खातेवर जमा होत नाही तो पर्यंत काळ्या फिती लावून असहकार आंदोलन सुरू ठेवणेर शिक्कामोर्तब केले. कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविणेसाठी शासन सकारात्मक आहे. जलजीवन मिशन साठी निधी नाही. स्वच्छ भारत मिशनसाठी उपलब्ध असलेले निधीतून वेकन अदा करणे, आकृतीबंध व कायम करणेचे प्रश्नाबाबत शासन सकारात्मक असल्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केले.

# रमाई आवास योजना जाचक अटींच्या विळख्यात!

सोलापूर महापालिकेअंतर्गत राबविण्यात येणारी रमाई आवास योजना ही मागासवर्गीय बांधवांसाठी अत्यंत महत्वाची घरकुल योजना. परंतु प्रत्यक्षात, ही योजना लाभार्थ्यांच्या दारापर्यंत पोहोचण्याऐवजी जाचक अटींच्या अडथळ्यात अडकून पडली आहे. दस्तऐवजांच्या अवाजवी मागण्या, विशेषतः ७/१२ उताऱ्याची सक्ती, प्रकरणांची दिरंगाई आणि महापालिकेतील कामकाजातील ढिलाई या सर्वांचा फटका प्रत्यक्ष लाभार्थ्यांना बसत आहे. शासनाने दिलेले अडीच लाखांचे अनुदान मिळवण्यासाठी लोकांना वारंवार महापालिकेत चकरा माराव्या लागत आहेत. मिळणारे उत्तर मात्र प्रकरण प्रलंबित असे असते. या सगळ्या स्थितीवर विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी नागपूर येथील दालनामध्ये घेतलेल्या बैठकीत तातडीने महापालिका अधिकाऱ्यांकडून त्यांनी प्रत्यक्ष माहिती घेतली आणि योजना लोकांपर्यंत पोहोचत नसेल तर त्याची जबाबदारी कोणाची? असा थेट सवाल केला.

**योजना लोकांसाठी आहे, कागदांसाठी नव्हे !**

ही योजना लोकांपर्यंत का पोहोचत नाही असा जाब विचारला. या योजनेची अनेक प्रकरणे का प्रलंबित आहेत ? या योजनेसाठी अडीच लाख रुपये अनुदान आहे, त्यासाठी लोक महापालिकेत हेलपाटे मारतात. प्रकरणे अडवून का ठेवली जातात? लोकांना फेऱ्या मारायला लावण्याचा काय उपयोग आहे ? शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी महापालिका अधिकाऱ्यांना तिथे बसविले आहे. त्या थांबविण्यासाठी बसविले नाही. महापालिका आयुक्तांनी यामध्ये जातीने लक्ष घालून जी प्रकरणे थांबले आहेत. त्या संदर्भात तातडीने मार्ग काढावा. कोणत्याही परिस्थितीत प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत. लोकांपर्यंत ही योजना यशस्वी पर्यंत पोहोचवली पाहिजे, असे सक्त आदेश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी या बैठकीत दिले. सोलापूर महापालिकेत ढ्ढअधिकाऱ्यांना योजना थांबवण्यासाठी नाही, तर पोहोचवण्यासाठी बसवले आहे.ढ्ढ असे खडे बोल महापालिका नगर अभियंतांना सुनावले. प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे सक्त आदेश त्यांनी दिले. नगर अभियंता यांच्या कामकाजाबद्दल त्यांनी तीव्र नाराजी नोंदवली.

या सगळ्यात केंद्रस्थानी एक मोठा प्रश्न म्हणजे खाजगी जमिनीवरील झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासंबंधी स्पष्ट धोरणाचा अभाव. सोलापूर महानगरपालिका हद्दीत एकूण २२० झोपडपट्या असून त्यातील १५९ अधिसुचित झोपडपट्टी असून ६१ झोपडपट्या ह्या अधिसुचित नाहीत. १५९ अधिसुचित झोपडपट्या पैकी ८८ झोपडपट्या खाजगी जमिनीवर २६ झोपडपट्या मनपा जमिनीवर व ४५ झोपडपट्या शासकीय जमिनीवर आहेत तसेच ६१ अधिसुचित नसलेल्या झोपडपट्या पैकी ४८ झोपडपट्या खाजगी जमिनीवर, ६ झोपडपट्या मनपा जमिनीवर व ७ झोपडपट्या ह्या सरकारी जमिनीवर वसलेल्या आहेत. तसेच खाजगी जागेवरील अशा लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत स्पष्ट सूचना नसल्याने असे लाभार्थी योजनेपासून वंचित राहत आहेत. शासन निर्णयात याबाबत स्पष्टता नसल्याने या कुटुंबांना योजनेचा लाभ मिळत नाही.

अटीमुळे अनेक कुटुंबे अपात्र ठरत आहेत. परिणामी, कोट्यवधी रुपयांचा निधी असूनही घरकुलांसाठी तळमळणाऱ्यांच्या हातात रिकामेपणाच येतो.राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्यासह पत्रकारांनी या योजनेतील जाचक अटी निदर्शनास आणून दिल्या. ७/१२ उताऱ्याची जाचक अट रद्द करावी, खाजगी जागेवरील घोषित/अघोषित झोपडपट्ट्यांचा समावेश करावा, अनुदान वाढवून ७ लाख रुपये करावे,अशी महत्वपूर्ण मागणी जोर धरत आहे.



२०१० च्या शासन निर्णयानुसार, १९९५ पूर्वीच्या संरक्षित झोपडपट्ट्यांना त्याच जागेवर घर बांधण्याची परवानगी देण्याबाबत स्पष्ट भूमिका आहे. त्यानुसार सोलापूर महानगरपालिकेने १६९ झोपडपट्ट्यांना योजनेचा लाभ देण्यासाठी ठरावही मंजूर केला आहे. पण प्रत्यक्ष अंमलबजावणीचा वेग प्रचंड मंद आहे. महापालिकेच्या फाइल्समध्ये अडकलेल्या गरीबांच्या स्वप्नातील घरकुल कागदावरच राहिले आहे.आज गरज आहे ती शासनाने सुलभ, एकसंध आणि वास्तववादी प्रक्रिया निश्चित करण्याची. प्रत्येक महापालिकेला याची स्पष्ट अंमलबजावणीसूचना दिल्यास प्रलंबित निधी तातडीने वापरता येईल आणि हजारो कुटुंबांना स्वतःच्या हक्काचे घर मिळू शकते. खाजगी जमिनीवरील झोपडपट्ट्यांसाठी अधिग्रहणाचे धोरण ठरविणे, नोंदणी अटी सुलभ करणे आणि लाभार्थी निवडीतील पारदर्शकता हे मुद्दे अत्यंत अनिवार्य झाले आहेत.

रमाई आवास योजना ही केवळ कागदावरील योजना राहू नये. ती गोर-गरीब मागासवर्गीय कुटुंबांसाठी आशेचा किरण आहे. योजना थांबावी म्हणून नव्हे, तर पोहोचावी म्हणून शासन आणि महापालिका यंत्रणेला वेग देणे आवश्यक आहे. प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, अटी शिथिल करणे आणि अनुदानवाढीचा निर्णय घेणे ही पावले उचलली तरच 'घरकुल' हे स्वप्न प्रत्यक्षात उतरू शकेल.





# खत विक्रीसाठी पीएमकेएसके नोंदणी अनिवार्य

### सहकारी सोसायट्यांना १५१ व्यवसायांची मुभा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

राज्यातील सर्व सहकारी सोसायट्यांसाठी खत विक्रीची प्रक्रिया आता अधिक शिस्तबद्ध व नियमनबद्ध करण्यात आली आहे. खत विक्री करू इच्छिणाऱ्या सर्व सहकारी संस्थांना आता प्रधानमंत्री कृषी समृद्धी केंद्र (पीएमकेएसके) योजनेअंतर्गत नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.या प्रक्रियेनंतरच खत विक्रीसाठी परवानगी दिली जाणार आहे. सहकार विभागाने याबाबत स्पष्ट निर्देश जारी करून अंमलबजावणीची जबाबदारी संबंधित सहकारी संस्थांच्या सचिवांकडे सोपविली आहे.

दरम्यान, पीएमकेएसके योजनेअंतर्गत खत विक्रीसह शेतकऱ्यांना विविध कृषी सेवा, मार्गदर्शन व इनपुट्स उपलब्ध करून देण्याचा हेतू असून, या माध्यमातून खत वितरणाचे व्यवस्थापन अधिक पारदर्शक व कार्यक्षम होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील खत विक्री करणाऱ्या विद्यमान सहकारी सोसायट्यांना प्राधान्याने ही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. भविष्यात खत विक्री सुरू करू इच्छिणाऱ्या नव्या सहकारी संस्थांसाठीही हे नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य राहील.विशेष म्हणजे, सहकारी सोसायट्यांना १५१ विविध प्रकारच्या व्यावसायिक उपक्रमांची परवानगी सरकारने दिली आहे. कृषी सेवांपासून ग्रामीण विकास, किरकोळ विक्री, लघुउद्योग अशा विविध क्षेत्रात या संस्थांना व्यवसाय विस्ताराची मुभा मिळाली आहे.

**विशेष अर्थसाहाय्य उपलब्ध**

पीएमकेएसकेच्या नोंदणीमुळे खत विक्रीचा व्यवसाय





अधिक शिस्तबद्ध होणार असून, संस्थांना कृषी क्षेत्रात नवे प्रयोग करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. खत विक्री करणाऱ्या सहकारी संस्थांना आधुनिक सोयीसुविधांसह सुसज्ज गोदामे उभारण्यासाठी वर्ल्ड बँककडून विशेष अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कर्जातून गोदाम बांधल्यास खताचा साठा व्यवस्थापन, गुणवत्तेचे संरक्षण आणि वेळेत वितरण या बाबींना मोठी चालना मिळणार असल्याचे सहकार विभागाकडून सांगण्यात येत आहे.

**अन्यथा खत विक्रीवर येणार निर्बंध**

अनेक सोसायट्यांना वाढत्या मागणीमुळे गोदामांची आवश्यकता भासत असल्याने ही योजना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.खत विक्री करणाऱ्या तसेच या व्यवसायात उतरू इच्छिणाऱ्या संस्थांनी तातडीने पीएमकेएसके नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी, अन्यथा खत विक्रीवर निर्बंध लागू शकतात, असा इशाराही विभागाने दिला आहे. यामुळे सहकारी संस्थांना प्रशासनाची सुसंगत राहून कृषी क्षेत्रातील योगदान वाढवण्याची संधी मिळणार आहे.

# तपास पथकातील श्वान कायरा सेवामुक्त

### भावुक होऊन दिला निरोप; १० वर्षे बजावली सेवा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

गुन्हे शाखेच्या श्वान पथकातील डॉबरमॅन जातीची कायरा श्वान गेली दहा वर्षे सोलापूरकरांच्या सुरक्षिततेची निशब्द पहारेकऱ्याची जबाबदारी निभावत होती. असंख्य गुन्ह्यांचा तपास, गुन्हेगारांचा माग काढणे, तासांतास उन्हातान्हात शोधमोहिम, अशी अविरत सेवा बजावून कायरा नुकतीच सेवामुक्त झाली. पोलीस आयुक्तालयात झालेल्या बैठकीत कायराच्या निवृत्तीची नोंद करण्यात आली आणि क्षणभरासाठी पोलीस कर्मचारी भावुक झाले.

२०१५ मध्ये कायराला सोलापूर पोलीस आयुक्तालयात दाखल करून अनवेशन विभाग पुणे येथे नऊ महिन्याचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षित झाल्यानंतर कायराची गुन्हे शोधक स्वास म्हणून गुन्हे शाखेत नियुक्ती झाली. हॅन्डलर हवालदार श्रीकांत दोलनाल, हवालदार संतोष गवंडी आणि त्यांचे सहकारी त्याच्या



सोबतीने कायद्याला कायराने अनेक धडाकेबाज मोहीम पूर्ण केल्या. २०१९ मध्ये विजापूर रोड परिसरातील प्रसिद्ध गजानन महाराज मंदिरात झालेल्या चोरी प्रकरणात गुन्हेगारांनी वापरलेल्या मार्गाचा माग काढला अन गुन्हा उघडकीस आला.

२०२३ मध्ये एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या खून प्रकरणाच्या घटनास्थळी कायराने रक्ताचे चिन्ह, पावलांचे ठसे, कपड्यांवरील वास अशा बारीकसा गोष्टींचा सुगावा घेत कायराने पोलिसांना संशयितांचा अचूक माग दाखविला. अशा अनेक शोधमोहीम, चोरी दरोड्याच्या घडास्थळी रात्र दिवस केलेली धावपळ, शारीरिकदृष्ट्या तद्रुस्त राहण्यासाठी घेतलेले कडक सराव यामुळे कायरा विश्वासू सहकारी बनली होती.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# जिल्ह्यात साखरशाळा नसल्याने उसतोड कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित

## प्रशासनाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

नोव्हेंबर महिन्यापासून जिल्ह्यातील गळीत हंगाम सुरू झाला इतर जिल्ह्यातून व दुसऱ्या राज्यातून लाखो मजूर कुटुंब ऊसतोडणीसाठी राबत आहेत.

स्थलांतरित व उसतोड मजुरांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत, म्हणून शासनाने साखर कारखान्यांना 'साखरशाळा' सुरु करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात साखरशाळाच नसल्याने उसतोड कामगारांची लाखो मुले शिक्षणापासून वंचित राहत आहेत. याकडे शिक्षण विभाग व प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने मुलांचे भविष्य अंधकारमय होणार असल्याचे दिसून येते. साखरशाळा नसल्याने मजूरांच्या निवासाच्या जवळ असणाऱ्या शाळेत त्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्याचे नियोजन शासनाकडून करण्यात आले. मात्र या निर्णयाचीही अंमलबजावणी होत नसल्याने उसतोड कामगारांची मुले शिक्षण सोडून अन्यत्र फिरताना दिसून येत आहेत.

साखरशाळा नसल्याने उसतोड कामगारांची मुले पालकांना मदत करण्यासाठी हातात कोयता घेऊन काम करीत असल्याचे दिसून येते. शिवाय

घरातील चिमुकल्यांचे सांभाळ करणे तसेच अन्य घरगुती कामामुळेही पालक मुलांच्या शिक्षणाकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या अपघातात जीव गमावणाऱ्यांमध्ये या मुलांची संख्या अधिक आहे. उसतोड कामगारांची मुले घरांपासून सहा महिने ते आठ महिन्यांपर्यंत दूर असल्याने त्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे प्रशासन व शिक्षण विभागाने साखरशाळा सुरू करून उसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करण्याची मागणी करण्यात येत आहे.

### शिक्षण विभागाला गांभीर्य नाही

उसतोड कामगारांची मुले स्वताचे गाव व घर सोडून आल्यामुळे सहा ते आठ महिने शिक्षणापासून दूर राहावे लागते. यावेळी शिक्षण विभागाने साखरशाळ सुरू करून मुलांच्या शिक्षणाची सोय करणे गरजेचे आहे. शाळा नसल्याने मुले अन्यत्र फिरताना दिसून येतात. त्यामुळे मुलांच्या भविष्यावर परिणाम होत आहे. शिक्षण विभागाला गांभीर्य नसल्याने मुलांच्या शिक्षणाची गैरसोय होत आहे. म्हणून जिल्हाधिकारी यांनी साखर शाळा सुरू करण्यासाठी पाठपुरावा करावे.

**- भीमाशंकर बबलेश्वर सरपंच भंडारकवठे, दक्षिण सोलापूर**



## पिलीव परिसरात विटेची कमतरता; दर कडाडले, बांधकामे रखडली

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ११ डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्यात यंदा कधी नव्हे तो समाधानकारक पाऊस झाला. जवळपास सात महीने पाऊस सुरू होता. त्यामुळे खरेतर शेतीसह अनेक व्यवसायावर मोठा परीणाम झाला. त्यापैकी एक म्हणजे वीट उद्योग. हा उद्योग यंदा पावसामुळे खुप उशीरा सुरू झाला. त्यामुळे सध्या सर्वत्र विटेची प्रचंड कमतरता जाणवत आहे.

सध्या ग्रामीण भागात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत प्रत्येक गावात घरकुलांची मोठ्या प्रमाणात कामे सुरु आहेत. पण सध्या विटच तयार नसल्यामुळे कामे रखडली आहेत. खरेतर तर आकटोंबर महिन्यापर्यंत पाऊस सुरू असल्यामुळे विट तयार करण्याचे काम पुर्ण पणे थांबले होते .सध्या विट तयार करण्याचे काम सुरु आहे पण विट भाजण्यासाठी खुप वेळ लागतो .पिलीव व कुसमोड परीसरात मोठ्या प्रमाणात विटभटटया आहेत पण सध्या याठिकाणी कोणाकडेही विटच शिल्लक नाही. विटेची कमतरता असल्यामुळे दर अक्षरश गगनाला भिडले आहेत. सध्या लहान विटेचा दर नऊ ते दहा हजार रुपयाला एक हजार विट, तर मोठ्या आकाराची विट पंधरा ते सोळा हजार रुपयांपर्यंत एक हजार अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. शासनाकडून मिळालेल्या घरकुलाला एवढा निधी नसतो यामुळे विटेचया वाढलेल्या दरामुळे घरकुल लाभार्थी अक्षरश हतबल झाले आहेत. किमान उन्हाळ्यात तरी पिलीव परिसरात भरपूर विट उपलब्ध होईल तसेच दरही कमी होईल अशी घरकुल लाभार्थी यांची अपेक्षा आहे.

पिलीव व आसपासच्या परिसरात विटेची कमतरता असल्यामुळे बरेच दिवस विटच मिळाली नाही यामुळेच घरकुलांचे काम रखडले असुन कमतरता असल्यामुळे मोठी दरवाढ झाली आहे.

**- सागर गोंजारी, घरकुल लाभार्थी, कुसमोड.**

यंदा पावसाळा लांबल्यामुळे विट तयार करता आली नाही तसेच विट तयार करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या किमती दुपटीने वाढल्या मुळेच दरवाढ झाली आहे.

**- नागेश सरवदे, वीटभट्टी, मालक.**

## राज्यातील २५ हजार पोलीस पाटलांचे नागपुरात शक्तीप्रदर्शन

### अनेक मागण्या मान्य करण्याची गृहराज्यमंत्र्यांची ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.११ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ तसेच विविध संघटनांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथील झिरो माईल परिसरात १० डिसेंबर रोजी भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले. राज्यातील तब्बल २० ते २५ हजार पोलीस पाटलांनी हजेरी लावून आपली मागणी ऐकवली. कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, ठाणे, नाशिक, नांदेडपासून ते गडचिरोलीपर्यंतच्या ३६ जिल्ह्यांतील पोलीस पाटलांनी सहभाग नोंदवला.

संस्थापक भिकाजी चाबुराव पाटील (कोल्हापूर) यांच्या मार्गदर्शनाखाली, राज्याध्यक्ष बाळासाहेब बाजीराव शिंदे पाटील तसेच कार्याध्यक्ष भृंगराज परशुरामकर, कार्यकारी अध्यक्ष श्रीकृष्ण साळुंके पा., खजिनदार निळकंठ थोरात पा. सोलापूर जिल्हा अध्यक्ष शिवानंद फुलारी पाटील, कार्याध्यक्ष सैपन बेगडे, आदी पदाधिकारींची विशेष उपस्थिती होती.

मोर्चादरम्यान वयोमर्यादा ६० वरून ६५ करणे, सेवानिवृत्तीनंतर ठोस आर्थिक लाभ, नूतनीकरण प्रक्रिया कायमस्वरूपी बंद करणे, पोलीस पाटील ॲक्ट १९६७ मध्ये दुरुस्ती, महानगरपालिका, नगरपालिका हद्दीत पोलीस पाटील कायम ठेवणे, आकस्मित मृत्यू झाल्यास सानुग्रह निधी, रिक्त पदे तातडीने भरणे, दुसऱ्या गावाचा चार्ज सांभाळणाऱ्यांना ५०% मानधनवाढ, तसेच पोलिस व महसूल खात्यात मुलांना ५% आरक्षण अशा प्रमुख मागण्यांवर आवाज उठवण्यात आला. मोर्चा स्थळी अनेक आमदार व लोकप्रतिनिधींनी भेट देऊन मागण्यांना पाठिंबा दर्शवला. शेवटी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. त्यांनी अनेक मागण्यांवर सकारात्मक निर्णय लवकरच जाहीर करू, अशी ग्वाही दिली.

### अन्यथा पुन्हा मोर्चा काढू

सोलापूर जिल्ह्यातून २०० पोलीस पाटील उपस्थित होते. मुंबईसह ३६ जिल्ह्यातील २० ते २५ हजार पोलीस पाटील नागपूर-झिरो माईल येथे दिवसभरात तळ ठोकून होते. मागील अनेक वर्षांपासून पोलीस पाटलांच्या हक्कांच्या मागण्या प्रलंबित आहेत. या मोर्चाची एक किलोमीटर लांब रांग लागली होती. सरकारसोबत सकारात्मक चर्चा झाली असून लवकरच मागण्या मान्य होतील. अन्यथा पुन्हा मोर्चा काढू

**- बाळासाहेब शिंदे पाटील,**
राज्याध्यक्ष, गाव कामगार पोलीस पाटील संघ, मुंबई

## राज्य अभिवाचन स्पर्धेत कुणाल बाबरे, रश्मी मोहोळकर प्रथम

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

अस्तित्व संस्था व उन्मुक्त कलाविष्कार ठाणेच्या साहित्यिक अमृता प्रीतम यांच्या स्मृती प्रित्यर्थ झालेल्या तिसऱ्या राज्य अभिवाचन स्पर्धेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सामाजिकशास्त्रे संकुलातील जनसंज्ञापन अधिविभागाच्या कुणाल बाबरे आणि एम.ए. मास कम्युनिकेशनची रश्मी मोहोळकर यांना प्रथम पारितोषिक प्राप्त



झाले. या जोडीने संत तुकाराम महाराज यांच्या आयुष्यातील एका प्रसंगावर आधारित अभिवाचन सादर केले. या प्रसंगाची कथा कुणाल बाबरे याने लिहिली. सादरीकरणासाठी गुरुदत्त जाधव यांनी संगीत साथ दिली. या यशाबद्दल सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे, जनसंज्ञापन अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर त्यांचे कौतुक केले. त्यांना डॉ. तेजस्विनी कांबळे, डॉ. अंबादास भासके, प्रा. विठ्ठल एडके, प्रा. ऋषिकेश मांडलिक, डॉ. मधुकर जक्कन, प्रा. विक्रम बरडे यांचे मार्गदर्शन लाभले.

## विजयपूर रोडवरील रेल्वे पुलाचे तातडीने रुंदीकरण करा

### सोलापूर विकास मंचची मागणी निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.११ डिसेंबर-**

विजयपूर रोड व जुळे सोलापूर भागात नागरी वस्ती वेगाने वाढत चालली आहे. परिणामी तिथली वाहतूक सुद्धा वाढत चालली आहे. तिथल्या वाहतूक व रस्ते परिस्थितीचा समग्र अभ्यास करता सोलापूर विकास मंचने सोलापूर महापालिका आयुक्तांची भेट घेऊन काही मागण्या सादर केल्या. यात प्रामुख्याने विजयपूर रोड येथील सर्व्हिस रोड व पत्रकार भवन चौकातील रेल्वे वरील पूल रुंदीकरण युद्ध पातळीवर करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

यासंदर्भात सोलापूर विकास मंच कोअर कमिटी सदस्यांची आयुक्तांसोबत झालेल्या चर्चेत सर्व्हिस रोड विषय कोर्टात आहे व वकिलांशी चर्चा करून लवकरात लवकर निर्णय लावून



घेण्यात येईल असे आश्वासन दिले. रेल्वे मार्गावरील पूलाचे रुंदीकरण हा विषय आपल्या अखत्यारीत येत नसून राष्ट्रीय महामार्ग कार्यालय अंतर्गत येत असल्याचे सांगितले.

सोलापूर विकास मंच सदस्यांनी तातडीने राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता यांची भेट घेऊन पूल रुंद करणे गरजेचे असल्याचे पटवून दिले. यापूलाच्या दोन्ही बाजूचे रस्ते चार पदरी असून मधला पूल मात्र दुपदरी असल्याने वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. कार्यकारी अभियंता खैरदी यांनी याविषयावर तातडीने प्रस्ताव पाठवण्यासाठी आवश्यक ते सर्वेक्षण व पत्रव्यवहार करण्याचे सहकाऱ्यांना निर्देश दिले. चर्चे दरम्यान खासदारांचे पत्र असेल तर दिल्लीतून प्रस्ताव लवकर मंजूर होऊ शकतो असे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले.

सोलापूर विकास मंच सदस्यांनी लगेच खासदार प्रणिती शिंदे यांची भेट घेतली. त्यांना विषयातील गांभीर्य लगेच कळले. ताईंनी लगेच पत्र दिले. पुढील आठवड्यात खासदार व केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट नक्की झाली आहे. या बैठकीत प्रणिती शिंदे पूलाचा विषय आग्रहाने मांडणार असल्याचे त्यांच्या सचिवाने विकास मंच सदस्यांना कळवले आहे.

## ३१ डिसेंबरपूर्वी घरपट्टी भरा अन् ५० टक्के सूट मिळवा

### मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानातून आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.११ डिसेंबर-**

मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंतर्गत महाराष्ट्रातील गावोगावात असणा-या थकीत घरपट्टी, पाणीपट्टी व दिवाबत्ती करामध्ये ५०% सवलत मीळणार असल्याचा शासन निर्णय झाला आहे.

सदर अभियान राबवित असताना, अनेक ग्रामपंचायतींकडे करांची वसुली प्रलंबित असल्याचे आणि ग्रामपंचायतींकडून अनेक करांची १०० टक्के कर वसूली होत नसल्याची बाब निदर्शनास येत आहे. यामुळे ग्राम पंचायतींना नागरिकांना आवश्यक सुविधा पुरविण्यात आणि नवीन विकास कामे हाती घेण्यात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ही बाब शासनाच्या निदर्शनास आल्याने १३ नोहें.रोजी शासनाने स्वतंत्र जी.आर.काढून थकीत कर वसुल होण्यासाठी ५० टक्के सवलतीचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायतींच्या थकीत कर वसुलीला गती देण्यासाठी, थकबाकीच्या एक रकमी वसुलीकरिता आणि थकबाकीची वसुल केलेली रक्कम विकास प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी सर्वच ग्रामपंचायतींना या अभियानाचा उपयोग होणार आहे.

सन २०२५-२६ च्या पूर्ण करांची रक्कम अधिक दि. १ एप्रिल २०२५ पूर्वीच्या करांची एकूण थकबाकी मिळून येणाऱ्या रकमेच्या ५० टक्के रक्कम भरल्यास या योजनेचा फायदा मिळणार आहे. सदर सवलत केवळ निवासी मालमत्ताधारकांसाठी असेल असे शासन निर्णयामध्ये नमूद कैले असून याचा लाभ अभियान चालु आहे तोपर्यंत म्हणजे ३१ डीसेंबर पर्यंतच आहे.

## एकता महिला मंचातर्फे पिंपरीत महिला सक्षमीकरण मेळावा

### व्यसनमुक्ती व उद्योगावर मार्गदर्शन संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.११ डिसेंबर -**

पिंपरी (आर), ता. बार्शी येथे एकता महिला मंचच्या वतीने दि. ११ डिसेंबर रोजी पिंपरी (आर) येथील श्री खंडोबा मंदिर येथे सदस्यांसाठी आणि विद्यार्थिनींसाठी विशेष मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. महिला सक्षमीकरण, व्यसनमुक्ती आणि उद्योग या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर सखोल मार्गदर्शन या मेळाव्यात करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन झाल्यानंतर, त्यांचा यथोचित सत्कार आणि सन्मान करण्यात आले.

या मेळाव्यासाठी डॉ. संदीप तांबारे (व्यसनमुक्ती तज्ञ) यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती दर्शविली. डॉ. तांबारे यांनी त्यांच्या मार्गदर्शनात महिलांच्या जीवनातील तीन महत्त्वाच्या पैलूंवर सखोल भाष्य केले:

डॉ. तांबारे यांनी सांगितले की, महिला सक्षमीकरण म्हणजे केवळ आर्थिक स्वातंत्र्य नव्हे, तर निर्णय घेण्याची क्षमता आणि आत्मविश्वास वाढवणे होय. प्रत्येक महिलेने आपल्या हक्कांबाबत जागरूक असले पाहिजे आणि समाजाच्या प्रगतीसाठी सक्रिय भूमिका घेतली पाहिजे. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले, कारण शिक्षण हे सक्षमीकरणाचे मूळ आहे. डॉ. तांबारे यांनी व्यसनामुळे कुटुंबावर आणि समाजावर होणारे गंभीर दुष्परिणाम स्पष्ट केले.

महिलांना संबोधित करताना त्यांनी घरातील पुरुषांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी प्रभावी संवाद साधण्याचे आणि त्यांना उपचारासाठी प्रवृत्त करण्याचे आवाहन केले. व्यसनमुक्तीसाठी महिलांनी घरात सकारात्मक वातावरण निर्माण करावे आणि व्यसनी व्यक्तीला भावनिक आधार द्यावा, असे मार्गदर्शन त्यांनी केले. महिलांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता, आपल्या अंगी असलेल्या कौशल्यांचा उपयोग करून स्वतःचे छोटे उद्योग सुरू करावेत. शासनाच्या विविध योजनांची माहिती घेऊन, आत्मविश्वासपूर्वक व्यवसाय सुरू केल्यास आर्थिक स्वातंत्र्य मिळवणे सहज शक्य आहे.

लघुउद्योग, बचतगट आणि कुटीर उद्योगांच्या माध्यमातून महिला कशा प्रकारे कुटुंबाला हातभार लावू शकतात, यावर त्यांनी अनेक प्रेरक उदाहरणे दिली. डॉ. तांबारे यांनी महिलांना आवाहन केले की, त्यांनी समाजाला व्यसनमुक्त व सशक्त बनविण्यात पुढाकार घ्यावा. उपस्थितांचा सहभाग व समारोप यावेळी एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर हे उपस्थित होते. मेळाव्यात इर्शाद शेख, गीतांजली लंगोटे, मयुरी लंगोटे, सीमा लंगोटे, प्रगती गोपण, प्रिया लंगोटे, भाग्यश्री लंगोटे, यास्मिन शेख, शबाना कोतवाल, अस्मा शेख, नाजमीन शेख, राधा जाधव, उषा पाटील, अनिता लंगोटे, हनिफा सय्यद, दिलषाद शेख, आजमतबी पठाण व अन्य सदस्यांची लक्षणीय उपस्थिती होती. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीमा लंगोटे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रिया लंगोटे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मयुरी लंगोटे यांनी मानले. हा मार्गदर्शन मेळावा महिलांना त्यांच्या जीवनातील विविध समस्यांवर मात करून, त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी प्रेरणा देणारा ठरला.

## महत्वाचे...



### भाजपचा युवानेता मोहसिन शेखचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

शिवसेनेचे मुख्य सचिव संजय मोरे सोलापूर शहर दौऱ्यावर आले असता सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे, जिल्हाप्रमुख अमर पाटील, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे तसेच शहर प्रमुख सचिन चव्हाण यांच्या नेतृत्वात भाजपचे युवा नेते मोहसीन शेख यांचा शिवसेना पक्षात पक्ष प्रवेश करण्यात आला. यावेळी मुख्य सचिव संजय मोरे यांच्या हस्ते शिवसेनेचे उपरणे घालून तसेच पुष्पगुच्छ देऊन शेख यांचे शिवसेना पक्षात स्वागत करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विचारांना प्रेरित होऊन मी पक्षात प्रवेश केला आहे. येणाऱ्या काळात गोर गरीब जनतेच्या व प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडवण्याचे कार्य मी अहो रात्र करेन. असे मोहसीन शेख यांनी सांगितले. यावेळी शिवसेनेचे नेते माजी गृहराज्यमंत्री तथा नांदेडचे जिल्हा संपर्कप्रमुख सिद्धाराम म्हेत्रे, माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, प्रवक्त्या ज्योती वाघमारे, जिल्हाप्रमुख मनीष काळजे, नगरसेवक मनोज शेजवाल, नगरसेवक उमेश गायकवाड, शिवसेना नेते श्रीनिवास संगा, उपजिल्हाप्रमुख अण्णाप्पा सतुबर, नवनाथ चव्हाण, सोलापूर लोकसभा महिला संपर्कप्रमुख अनिता माळगे आदी उपस्थित होते.

### पटसंख्येच्या निकषात बदल होणार

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

१५ मार्च २०२४ च्या संचमान्यतेच्या शासन निर्णयामुळे जिल्ह्यातील २२ शाळा शाळा बंद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे इयत्ता नववी व दहावीच्या ज्या वर्गात २० पेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या शिक्षकांचे समायोजन होणार आहे. म्हणून शिक्षक व मुख्याद्यापक संघटनांनी वारंवार या निर्णयाविरोधात आंदोलन केले. त्यांच्या पाठपुराव्यामुळे पटसंख्येच्या निकषात बदल केला जाणार असल्याचे शिक्षण विभागातुन सांगण्यात येत आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची संचमान्यता डिसेंबर अखेर पूर्ण होणार आहे. या संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे दुसऱ्या शाळांमध्ये समायोजन होणार आहे. दरम्यान नववी व दहावीच्या ज्या वर्गातील विद्यार्थी २० पेक्षा कमी आहेत, तेथील शिक्षक अतिरिक्त होणार आहेत. या निर्णयात समायोजनापूर्वी बदल होण्याची शक्यता असून त्याचा शासन निर्णय डिसेंबरअखेर पर्यंत होणार असल्याचे सांगण्यात येते.

### विद्यार्थ्यांच्या अचूक माहीतीसाठी सीईटीवेळी अपार आयडी बंधनकारक

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

विद्यार्थ्यांची अचूक माहिती उपलब्ध - व्हावी, तसेच त्यांची पडताळणी करणे . सहज शक्य व्हावे यासाठी राज्य सामाईक ची प्रवेश परीक्षा कक्षाने सीईटी नोंदणीसाठी 'अपार आयडी' बंधनकारक करण्याचा वर्षाच्या निर्णय घेतला आहे. पुढील रती वर्षापासून त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. दरम्यान, पुढील शालेय, शैक्षणिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या जागा सीईटीसाठी डिसेंबर अखेरपासूनच नोंदणी सुरू होणार आहे. ऑटोमेटेड पर्मनंट अकॅडमिक अकाउंट रजिस्ट्री' (अपार) आयडी तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. यातील १२ अंकी क्रमांकावरून विद्यार्थ्यांच्या संपूर्ण शैक्षणिक प्रगतीचा आलेख उपलब्ध होतो. शाळांमध्ये अपार आयडी आणि आधार यांची जोडणी होते. त्यामुळे विद्यार्थ्यांची सत्यता पडताळणे अधिक सोपे होईल. सीईटी नोंदणी करताना अनेक विद्यार्थ्यांकडून चुकीची माहिती भरली जाते , त्यामुळे प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेच्या वेळी अडचणी निर्माण होतात. त्या टाळण्यासाठी अपार आयडी कलायात आला आहे.

### बालविवाह प्रकरणी चौघांविरुध्द गुन्हा

**मंगळवेढा दि. ११ डिसेंबर -**

एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा बालविवाह करुन वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवून तिला दोन महिन्याची गर्भवती केल्या प्रकरणी बबलू पपलू शिंदे, सुनिल विलास काळे, ाहुल नारायण भोसले व आई, वडिल यांच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी, यातील फिर्यादी तथा पिडीता ही १७ वर्षीय असून सन २०२२ पासून पिडीतेचे आई, वडिल तिला शारीरिक व मानसिक त्रास देवून फिर्यादी ही अल्पवयीन असल्याचे माहित असताना जबरदस्तीने पिडीतेचा बालविवाह सुनिल विलास काळे याच्याशी जत मधील एका हॉटेल मध्ये लावला. तसेच आरोपी सुनिल काळे याने जबरदस्तीने पिडीतेशी वेळोवेळी घरी शारीरिक संबंध ठेवले. सन २०२५ मध्ये गणपती सणाच्या वेळी चुलत मामा राहुल भोसले याने पिडीता ही अल्पवयीन असल्याचे माहित असतानाही पिडीतेशी लग्न करुन वारंवार धर्मगाव येथे शारीरिक संबंध ठेवल्याने पिडीता ही दोन महिन्याची गर्भवती असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद लातुरकर हे करीत आहेत.

### विंचूर येथे श्री गणेश दुग्धालयचे उद्घाटन

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांती महिला प्रभाग संघ संचालित श्री गणेश महिला प्रॉड्यूसर गटाच्या श्री गणेश दुग्धालयचे विंचूर येथे नुकतेच उत्साहात उद्घाटन करण्यात आले. यावेळी सरपंच बाळासाहेब पाटील, ग्रामसेविका सुजाता व्हनकडे, बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक गणेश जगताप आणि त्यांचे सहाय्यक व्यवस्थापक मंगेश, पंचायत समितीचे वाघमारे, उमेद अभियानाचे प्रभाग समन्वयक अलीम, अतुल, आणि चौधरी, कृषी सहाय्यक अधिकारी राठोड तसेच माजी सरपंच श्रीमंत पुजारी तसेच पोलीस पाटील मल्लिकार्जन झाडबुके, महिला उद्यमी सीआरपी प्रमीला विजयकुमार वांगीकर यांच्यासह मंद्रुप विभागातील सर्व सीआरपी महिला आणि बचतगटाच्या महिला उपस्थित होत्या.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्षपदी रणवीर राऊत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.११ डिसेंबर -**

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत विरोधकांची धोबीपछाड करणारे समितीचे माजी सभापती ॲड. रणवीर राऊत यांची भाजपा युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी (पश्चिम विभाग) निवड करण्यात आली. भाजपचे पश्चिम विभागाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार- सावंत यांनी शुक्रवारी बार्शीत ही निवड जाहीर केली.



यावेळी भाजप बार्शी शहराध्यक्ष महावीर कदम, तालुकाध्यक्ष मदन दराडे, दादासाहेब गायकवाड, सोनू पवार, रोहित पाटील, संदीप मिरगणे, अमोल डिसले, माजी नगरसेवक संदेश काकडे आदी उपस्थित होते.

बार्शी शहर आणि तालुक्यातील युवक नेहमीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार राजेंद्र राऊत यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहेत. जिल्ह्यातील युवकांना देखील भाजपच्या पाठीशी राहण्यासाठी संघटन करण्यात येईल. जिल्ह्यातील तरुणांना भाजपकडे वळवण्याचा प्रयत्न राहील, अशी खात्री नूतन जिल्हाध्यक्ष राऊत यांनी दिली. निवडीनंतर राऊत यांचा केदार यांनी पुष्पहार घालून सत्कार केला. तसेच माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी चेतनसिंह केदार-सावंत यांच्या पत्नी सुजाता केदार-सावंत या सांगोला न. प. मध्ये बिनविरोध निवडून आल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

## महत्त्वाचे

### भविष्यातही आमची आघाडी अभेद्यच राहणार

**आ.डॉ.देशमुख व माजी आ.साळुंखे पाटील यांचे स्पष्टीकरण**

**सांगोला,दि.११ डिसेंबर -**

सांगोला नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्र.१ अ मधून राणी आनंदा माने आणि प्रभाग क्रमांक-११ अ मधून सुजाता चेतनसिंह केदार सावंत यांची बिनविरोध निवड झाली. जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आम्हाला तसेच शिवसेनेचे शहाजीबापू पाटील, भाजपचे बाळासाहेब केदार, बाळासाहेब एरंडे यांसह सर्वांना विनंती केल्याने सांगोला शहर विकास आघाडीने समन्वयाची भूमिका घेतली. त्यामुळेच या बिनविरोध निवडी शक्य झाल्या आहेत. त्यामुळे शहाजीबापू पाटील यांनी या जागांचे श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करू नये तसेच भविष्यातही आमची आघाडी अभेद्यच राहणार आहे असे स्पष्टीकरण आ.डॉ.बाबासाहेब देशमुख आणि माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांनी दिले. नागपूर येथील हिवाळी अधिवेशन संपवून आम्ही सांगोला शहर विकास आघाडीतील नेतेमंडळींना एकत्रित घेऊन लवकरच सांगोला येथे सविस्तर पत्रकार परिषद घेऊन आमची भूमिका स्पष्ट करणार आहोत असेही यावेळी आ.डॉ.देशमुख व माजी आ.साळुंखे पाटील यांनी सांगितले. सध्या ते दोघेही हिवाळी अधिवेशनासाठी नागपूर येथे उपस्थित आहेत.



### अल्पवयीन मुलीवर अत्याचार; ६५ वर्षीय आरोपीस १० वर्ष सक्तमजुरी


**बार्शी, दि.११ डिसेंबर -**




करमाळा तालुक्यात आई-वडील, भाऊ रुग्णालयात गेले असताना तसेच बहीण शेतामध्ये कामाला गेल्याचा फायदा घेऊन एकाने राहत्या घरी अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी जिल्हा सत्र न्यायाधीश पी. डी. सुभेदार यांनी पोक्सो कायद्यान्वये दहा वर्षे सक्तमजुरी व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. अर्जुन लक्ष्मण पाडुळे (वय ६५) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. अल्पवयीन मुलीच्या पालकांनी २८ ऑक्टोबर २०१६ रोजी फिर्याद दिली होती. अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची घटना २७ ऑक्टोबर २०१६ रोजी दुपारी घडली होती. सहाय्यक पोलीस निरीक्षक शुभांगी ढगे यांनी तपास करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. या खटल्यामध्ये सरकार पक्षातर्फे सहा साक्षीदार तपासण्यात आले. आरोपीच्यावतीने एक साक्षीदार तपासण्यात आला. पीडित मुलगी व तिच्या आईची साक्ष महत्त्वपूर्ण ठरली. करमाळा उपविभागाच्या सहायक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा, पोलीस निरीक्षक रणजीत माने यांनी मार्गदर्शन केले. सरकारतर्फे ॲड. आनंद गोरे, ॲड. दिनेश देशमूख यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी पोलीस हवालदार नितीन ताकभाते यांनी काम पाहिले.

### पंढरपूर-तिरुपती रेल्वे गाडी शनिवारपासून सुरू होणार? भाविकांतून समाधान; ही गाडी साप्ताहिक असणार

**पंढरपूर, दि.११ डिसेंबर -**



पंढरपूर-तिरुपती रेल्वेगाडी सुरू करण्यात यावी, अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून होत होती. याची दखल रेल्वे प्रशासनाने घेऊन पंढरपूर-तिरुपती रेल्वे गाडी सुरू केली आहे. याचा शुभारंभ शनिवार दि.१३ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. ही गाडी साप्ताहिक आहे. पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे येथून लांब पल्ल्याच्या गाड्या सुरू करण्यात याव्यात, अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून होत होती. याची दखल घेऊन रेल्वे प्रशासनाने पंढरपूर-तिरुपती रेल्वे गाडी सुरू केली आहे.

ही गाडी साप्ताहिक असून १३ डिसेंबर रोजी ४ वाजून ४५ मिनिटांनी ही गाडी तिरुपती येथून सुटणार असून ती रविवारी १४ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता पंढरपुरात पोहोचणार आहे. यानंतर पंढरपूर येथून ही गाडी रात्री ८ वाजता निघणार असून सोमवार १५ डिसेंबर रोजी रात्री साडेदहा वाजता तिरुपती येथे पोहोचणार आहे. या रेल्वे गाडीमुळे भाविकांची सोय झाली असल्यामुळे भाविकातून समाधान व्यक्त होत आहे.

### अरण येथे जागतिक दिव्यांग दिन समता सप्ताह

**मोडनिंब,दि.११ डिसेंबर-**

अरण (ता.माढा) येथील राऊतवस्ती येथे जागतिक दिव्यांग दिन समता सप्ताह गटशिक्षणाधिकारी विकास यादव यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाला. पालक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीमध्ये लुई ब्रेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मान्यवरांच्याउपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत, शैक्षणिक साहित्य वाटप, खाऊ वाटप करण्यात आले. विद्याध्यर्थ्यांची प्रभात फेरी काढून, विविध स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. पालक सुधाकर राऊत यांच्याकडून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आली.केंद्रीय विशेष शिक्षिका दिपाली माळी यांच्या विशेष प्रयत्नाने सर्व कार्यक्रम संपन्न झाले. मुख्याध्यापिका पौर्णिमा जगताप, उपशिक्षिका ज्योती कांबळे, शा.व्य.स. अध्यक्ष श्रीकांत शिंदे, विष्णू शिंदे, किशोर राऊत, भागवत राऊत, सागर गायकवाड, पालक व विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते. प्रास्ताविक शिक्षिका माळी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांबळे यांनी केले. उपस्थितांचे आभार जगताप यांनी मानले.

## अबब...पाडी संकर्गातील गाय अडीच लाखाला?

### निमगाव(टें)एबीएस आरमाडा जातीच्या पाडीची (गाय) तब्बल २ लाख ५५ हजाराला विक्री

#### हौसी पशुपालकांची पाहण्यासाठी तोबा गर्दी

**तभा वृत्तसेवा । सोमनाथ शिंदे**
**कुर्डूवाडी,दि.११ डिसेंबर-**

निमगाव (टें) (ता.माढा) येथील प्रदीपकुमार भागवत पाटील यांच्या फार्मवर तयार झालेल्या एबीएस.आरमडा या उच्च प्रतीच्या जातीच्या पाडीला तब्बल २ लाख ५५ हजार रूपये अशी विक्रमी किंमत मिळाली आहे. माढा तालुक्यात या जातीची एकही गाय कोणत्याही फार्मवर नसल्याने या पाडीला पाहण्यासाठी हौसींनी गर्दी केली होती.



उत्कृष्ट संगोपन, उत्तम पोषण आणि शास्त्रीय पद्धतीने तिसऱ्या जनरेशनमध्ये तयार करण्यात आलेली ही पाडी पूर्ण साईजमध्ये विकसित झाली असून ती दररोज ३५ लिटरपर्यंत उच्च दर्जाचे दूध उत्पादन देण्यास सक्षम आहे. पाडीचा दर्जा, आरोग्य आणि उत्पादनक्षमता पाहता खरेदीदारांकडून मोठी मागणी होती. या यशामागे माजी आमदार बबनदादा शिंदे, माजी आमदार संजयमामा शिंदे, जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजीतसिंह शिंदे, आदर्श सरपंच यशवंत शिंदे, सुनील खापरे, तसेच कुर्डू गावचे नामांकित गाई व्यापारी व वस्ताद अण्णासाहेब ढाणे यांचे मार्गदर्शन लाभले असल्याची माहिती देण्यात आली. या विक्रीमुळे परिसरातील पशुपालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून उच्च उत्पादकतेच्या दुभत्या जनावरांच्या संगोपनासाठी ही प्रेरणादायी घटना ठरली आहे.



ब्रीडवर सातत्याने काम करणे ही काळाची गरज आहे. उत्कृष्ट व्यवस्थापन व योग्य पोषणामुळे कमी खर्चात अधिक उत्पादन घेता येते. जनावरांचे आरोग्य, जनरेशन सुधारणा आणि योग्य निवड यामुळे ब्रीडची किंमत आपोआप वाढते. अशा यशस्वी उदाहरणांमुळे ग्रामीण भागातील युवकांना प्रेरणा मिळते. या कामात वस्ताद आण्णासाहेब ढाणे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. उच्च उत्पादकतेकडे लक्ष दिल्यास पशुपालन क्षेत्र आर्थिकदृष्ट्या अधिक मजबूत होऊ शकते.
**- प्रदिपकुमार पाटील**
**तरूण उद्योजक, पशुपालक, निमगाव टें ता. माढा**



## सकारात्मक बदलासाठी युवा उद्योजकांना योग्य संधीची गरज

**इशिता मोहिते-पाटील : खासदार युवा उद्योजक कार्यक्रमांतर्गत गुजरात अभ्यास दौरा निवड प्रक्रिया संपन्न**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.११ डिसेंबर-**

खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित खासदार युवा उद्योजक विकास कार्यक्रमांतर्गत गांधीनगर, गुजरात येथे १५ ते १८ डिसेंबर २०२५ दरम्यान अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या दौऱ्यासाठी उद्योजक तरुणांची निवड करण्याकरिता उद्घाटन व निवड प्रक्रिया कार्यक्रम दि. ११ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता, शिवरत्न नॉलेज सिटी, शंकरनगर येथे संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन कु इशिता धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. याप्रसंगी युवा उद्योजकांना योग्य संधी मिळाल्यास ते समाजात सकारात्मक बदल घडवू शकतात. या अभ्यास दौऱ्याच्या संधीचा फायदा घ्यावा असे मनोगत त्यांनी व्यक्त केले. यावेळी तरुण उद्योजकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

इच्छुक उमेदवारांची लेखी परीक्षा तसेच मुलाखत प्रक्रिया पार पडली. या अभ्यास दौऱ्याच्या माध्यमातून सहभागी तरुणांना उद्योग-व्यवस्थापन, नवकल्पना, सहकार क्षेत्रातील यशस्वी मॉडेल्स, तसेच स्टार्टअप इकोसिस्टम यांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. या दौऱ्यामुळे जिल्ह्यातील आणि परिसरातील तरुण उद्योजकांना नव्या प्रेरणा आणि प्रगतीचा मार्ग खुला होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

याप्रसंगी शिवामृत दूध उत्पादक संघाचे व्हाइस चेअरमन दत्तात्रय भिलारे, शिवरत्न शिक्षण संस्थेचे सचिव धर्मराज दगडे, हरिश्चंद्र मगर, डॉ. विश्वनाथ आवड, नितीन बनकर, अनिल जाधव, श्रीकांत राऊत, वनिता कोरटकर, रवीराज इनामदार, अश्रफ शेख व इतर मान्यवर उपस्थित होते.

## बार्शीत होमगार्ड संघटनेच्या वर्धापनानिमित्त वृक्षारोपण अन् स्वच्छता मोहीम



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.११ डिसेंबर-**

बार्शी होमगार्ड पथकाच्यावतीने होमगार्ड संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त शहर पोलीस स्टेशन आवारात स्वच्छता व साफसफाई तसेच वृक्षारोपण करण्यात आले.

पोलीस लाईन भवानी पेठ येथे समादेशक अधिकारी जालिंदर देवकर यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. येथील मेन हॉलमध्ये होमगार्ड वर्धापन दिनानिमित्त समारंभ घेण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते सुरेशभाऊ हालमे तर अध्यक्ष म्हणून बार्शी शहर पोलीस ठाण्याचे एपीआय झालटे होते.

पोलीस हवालदार सागर सुरवसे, माजी होमगार्ड शंकर चौगुले हेही उपस्थित होते. समादेशक अधिकारी देवकर यांनी संघटनेच्या कार्याची माहिती दिली. सूत्रसंचालन सुधीर बोकेफोडे यांनी केले. नितीन मांजरे यांनी आभार मानले. अशोक मुळे गिराम सुशील बंगाळे, अश्विनी ताटे, संध्या शिंदे यांनी परिश्रम घेतले.



## १५ मराठा लाईट इन्फंट्री (बुर्ज) चा ५४ वा वर्धापन दिन सांगोल्यात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.११ डिसेंबर -**

१५ मराठा लाईट इन्फंट्री (बुर्ज) चा ५४ वा वर्धापन दिन सांगोला येथील रामकृष्ण गार्डन व्हिला येथे साजरा करण्यात आला. यासाठी रिटायर ब्रिगेडियर ए.के गुप्ते, सी.के.रमेश, एम.एम.विटेकर, कर्नल.मनोज चतुर्वेदी, ए.बी.जाधव, मोन्ट्रीया, एम.एस.राव तसेच कर्नल.एम.डी.मुथप्पा, प्रसाद पुरोहित, मयंक व १५ मराठा बटालियन मधील १९७१ च्या लढाईतील वीर हिरो उपस्थित होते. त्यांचा सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सर्वांना विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती भेट देण्यात आली. जवळा येथील शाहीर सुभाष गोरे यांनी शहीद जवान पांडुरंग साळुंखे यांच्यावरील पोवाडा सादर केला. त्यांना अक्षय चंदनशिवे यांनी साथ दिली. याप्रसंगी ए.के गुप्ते यांनी मनोगत व्यक्त केले. कॅ.रावसाहेब साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सुभेदार विजयकुमार सावंत यांनी केले. आभार हवालदार आक्रुर शिंदे यांनी मानले. या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून आजी-माजी सैनिक, ऑफिसर्स उपस्थित होते.

## दहा दिवसांसाठी विठुरायाचे व्हीआयपी दर्शन आणि पाद्यपूजा बंद

### विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचा महत्त्वपूर्ण निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ डिसेंबर -**

दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या शेवटी आणि नववर्षाच्या सुरुवातीला सुट्ट्यांचा हंगाम असतो. त्यामुळे, भाविकांची राज्यातील सर्वच तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी देवदर्शनासाठी मोठी गर्दी होत असल्याचं पाहायला मिळतं. महाराष्ट्रातील श्रद्धास्थान असलेल्या शिर्डी, तुळजापूर, अक्कलकोट, कोल्हापूर आणि पंढरपुरातही देवदर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असते.

**दहा दिवस पाद्यपुजा देखील बंद**

२१ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त भाविकांना विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घडविण्यासाठी देवाच्या पाद्यपूजा देखील दहा दिवसांच्या या कालावधीमध्ये बंद ठेवण्याचा निर्णय विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडून घेण्यात आला आहे.

सध्या डिसेंबर महिना सुरू झाल्यापासून पंढरपुरात दररोज तोबा गर्दी होऊ लागली आहे. त्यातच आता नाताळाच्या सुट्ट्या देखील सुरू होणार असल्याने भाविक आणि पर्यटकांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे भाविकांच्या वाढत्या गर्दीचा अंदाज घेऊन पंढरपूर मंदिर समितीने २१ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत विठ्ठलरुक्मिणीमातेचे व्हीआयपी दर्शन, टोकन दर्शन आणि ऑनलाइन दर्शन पूर्णपणे बंद केले आहे. त्यामुळे भाविकांना २१ ते ३१ डिसेंबर म्हणजेच पुढील दहा दिवस मंदिराच्या गाभाऱ्यात जाण्यासाठी केवळ दर्शनरांगेतूच जावे लागणार आहे. मंदिर समितीने हा निर्णय घेतला असून या निर्णयाचे सध्या सर्वत्र स्वागत होत आहे. विठ्ठल दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांना गर्दीच्या कालावधीतही कमीत कमी वेळेत दर्शन मिळणे शक्य होणार आहे, या निर्णयामुळे भाविकांना दिलासा मिळणार आहे.

## बार्शी तालुक्यात गांजाच्या व्यसनाचा कहर; प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

### तरूणांसह अल्पवयीन मुलेही व्यसनाच्या विळख्यात

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.११ डिसेंबर-**

बार्शी तालुक्यात विशेषतः वैराग आणि परिसरांत गांजा व्यसनाचे प्रमाण चिंताजनक स्थितीत आहे. या गंभीर समस्येने तालुक्यातील तरुण पिढीला पूर्णपणे आपल्या विळख्यात घेतले आहे, ज्यामुळे अनेकांचे भविष्य धोक्यात आले आहे. या वाढत्या व्यसनामुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडत असून, स्थानिक नागरिक आणि पालकवर्गामध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे. याबाबत पोलीस प्रशासनासह राजकीय, सामाजीक कार्यकर्ते मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याने यावर कधी उपाय निघणार हे न उलगडणारे कोडेच आहे.

गेल्या काही महिन्यांपासून बार्शी आणि आजूबाजूच्या ग्रामीण भागांमध्ये गांजाचे सेवन करणाऱ्या तरुण-तरुणींची संख्या मोठी आहे. शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन तरुण आणि बेरोजगार युवक या व्यसनाच्या जाळ्यात मोठ्या प्रमाणात अडकत आहेत. व्यसनामुळे अनेक कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटली आहे, तर गुन्हेगारी प्रवृत्ती आणि घरगुती हिंसाचारात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. पूर्वी हे व्यसन एवढे उघड नव्हते, पण आता सहजपणे आणि मोठ्या प्रमाणावर गांजा उपलब्ध होत आहे. आमच्या मुलांचे भविष्य उद्ध्वस्त होत आहे आणि प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे अशी पालकातून ओरड आहे. त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वैराग शहर व परिसरात जनजागृती रॅली काढून आम्ही अवैध व्यवसायांना थारा न देण्याचा निर्धार केला असून, यापुढेही जनजागृतीच्या माध्यमातून व्यसनाधीन तरुण पिढीला सावध करून व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न करू.
**- कुंदन गावडे, पोलीस निरीक्षक, वैराग पोलीस ठाणे.**

बार्शी तालुक्यात गांजाचा हा अवैध धंदा इतक्या मोठ्या प्रमाणावर सुरू असताना, तो कधी आणि कसा बंद होणार असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. या समस्येसाठी स्थानिक प्रशासन आणि पोलीस यंत्रणा जबाबदार आहेत असा थेट आरोप केला जात आहे.

**पुरवठा साखळी कोण तोडणार?**

गांजाचा पुरवठा करणारे मोठे रॅकेट तालुक्यात सक्रिय आहे. स्थानिक पोलिसांना याची माहिती असतानाही प्रभावी कारवाई का होत नाही? विक्रेते आणि तस्करांवर कठोर प्रतिबंध लावण्यात प्रशासनाला अपयश आले आहे. प्रशासनाने वेळोवेळी कठोर भूमिका घेतली नाही, त्यामुळे व्यसनाचे हे लोण पसरले आहे. अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असणाऱ्या यंत्रणा निष्काळजीपणा दाखवत आहेत का? काही अवैध धंद्यांना राजकीय वरदहस्त मिळत असल्याची चर्चा असल्याने कारवाई थंडावली आहे का? याची कसून चौकशी होणे आवश्यक आहे.

गांजाच्या व्यसनाधीनतेतून तरुण पिढीला वाचवण्यासाठी तातडीने आणि कठोर उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. गांजाचा पुरवठा करणाऱ्या तस्करांवर आणि विक्रेत्यांवर मोठा गुन्हा दाखल करून त्वरित अटक करावी अशी मागणी होत आहे. वैराग आणि इतर संशयित भागांमध्ये पोलीस आणि उत्पादन शुल्क विभागाने नियमित तपासणी मोहीम राबवावी. प्रशासनाने व्यसनमुक्ती केंद्र आणि समुपदेशन शिबिरे आयोजित करून तरुणांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावेत अशीही मागमी होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी आणि सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षकांनी या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन, बार्शी तालुक्यातून गांजा व्यसनाचा विळखा कायमस्वरूपी संपवावा, अन्यथा याचे मोठे सामाजिक आणि राजकीय परिणाम दिसू शकतील.